साप्ताहिक

# माणूस

१८ डिसेंबर १९८२ दोन रुपये



## गडकऱ्यांचा विनोद जहरी विखारी 'ब्लॅक' का झाला?

## मराठी विनोद लेखमाला

## दिल्लीतील कॉलेज विद्यार्थी झोपडपट्ट्यातून

## दीनदयाळ संस्थेचा यशस्वी उपक्रम

साप्ताहिक
# माणूस

¤

वर्ष : बाविसावे

अंक : सत्ताविसावा

¤

१८ डिसेंबर १९८२

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

सुभाष अवचट

## सप्रेम नमस्कार

¤ माणूस दिवाळी अंकाचे संपादकीय फार आवडले. खरोखर विचार करायला लावणारे आहे.

सावरकरांचे रत्नागिरीपर्व, पाब्लो पिकासो हे लेख फारच आवडले. दरवर्षी-प्रमाणे वेधक मुखपृष्ठापासून अंकाचे वैशिष्टय कायम टिकविण्याच्या यशस्वी प्रयत्नाबद्दल मनःपूर्वक धन्यवाद.

२३ नोव्हेंबर — **रा. भ. गौरकर**
वार्शी

¤ आपला यंदाचा दिवाळी अंक आवडला. सर्वच लेख वाचनीय, मननीय असे आहेत.

'डॉ. आयडा स्कडर–एक धर्मकन्या' हे श्रीमती वीणा गवाणकर यांनी लिहिलेले कादंबरीमय चरित्र वाचले. ही कादंबरी प्रसिद्ध कधी होणार आहे? लेखिकेचे अभिनंदन.

२३ नोव्हेंबर — **डॉ. वं. वि. साठये**
अहमदनगर

¤ आपला ४ डिसेंबर १९८२ चा अंक पाहिला. अंकाचे बाह्यस्वरूप पाहून अत्यंत निराशा झाली. माणूसच्या दिवाळी अंकाचे मुखपृष्ठ गेल्या वर्षीच्या दिवाळी अंकाची आठवण करून देत होते. पण दीपावलीच्या कव्हरची खुमारी यात नव्हती. दिवाळी अंकाच्या आधीचे काही अंक 'माणूस' अंतर्बाह्य सुधारला असा दिलासा देणारे होते.

या दोन अंकांनी आमची निराशा झाली, याचा विचार आपण करावा अशी विनंती आहे.

५ डिसेंबर — **शरद कटके**
पुणे

¤ मी गेल्या १५–१६ वर्षांची आपली वाचक आहे. या मुदतीत आपण नेहमीच उत्कृष्ट आणि वाचनीय अंक सादर केले आहेत. प्रत्येक वेळेस पत्र लिहावे असे वाटते; पण पसंतीचे पत्र पाठविणे कठीण जाते. या वर्षीचा 'दिवाळी' अंक वाचून मात्र काही तरी लिहिलेच पाहिजे आणि इतके उत्कृष्ट लिखाण वाचावयास मिळाल्याची किमान कृतज्ञता व्यक्त करावी म्हणून अखेरीस आज लिहिले. अंक हातात घेतल्यावर पुरा केल्या-खेरीज खाली ठेववत नाही.

सावरकर, 'रत्नागिरी पर्व', 'आयडा' फारच सुंदर. रत्नागिरी पर्वासारखी स्वातंत्र्य-वीरांच्या आयुष्यातील आणखीन प्रकरणे वाचावयास मिळतील का? एक विनंती आहे, जमल्यास 'आयडा स्कडर' माणूस-मध्ये क्रमशः प्रकाशित करावे.

सर्वांगसुंदर अंकाबद्दल धन्यवाद. असेच अंक नेहमी मिळावेत ही अपेक्षा.

८ डिसेंबर — **सौ. फडणीस**
वांद्रा, पूर्व

¤ फारुक अब्दुल्ला आता संघावर बंदी घालायला निघालेले आहेत, जिथे देवदूतही जायला घाबरत असतात, तिथे मूर्ख लोक पुढेपुढे घुसू पाहातात; पण गम्मत अशी की, पाकिस्तान्यांना मुक्त प्रवेश देणारा फारूक हा इथे देशभक्त ठरतो नि देशासाठी प्राणार्पण करणारा, कोणत्याही आपत्तीत धावून जाणारा संघ हा या देशात 'नकोसा' असतो. दुर्दैव! दुसरे काय?

या देशात एकूण गम्मत गम्मतच चाल-लेली आहे. पाकिस्तान्यांनी या देशात घुसावे, येथील अल्पसंख्याकांना भडकावून पद्धतशीर दंगली घडवून बहुसंख्य समाजाची होरपळ उडवावी नि परत अल्पसंख्य–नेत्यांनी मोठ्या साळसूदपणे पंतप्रधानांची भेट घेवून, आमच्यावर कसे अत्याचार होतायत याचा गळा काढावा .. आणि मग तथाकथित पुढारी – वृत्तपत्रे – मंत्री यांनी मग बिचाऱ्या असहाय्य बहुसंख्य समाजाला झोडपून काढावे... वा! उत्तम चालू आहे.

**सु. ह. जोशी**
शिरूर

# दीनदयाल शोध संस्थान, दिल्ली

# रचनात्मक कर्मपथपर युवक

आजच्या तरुण पिढीवर निष्क्रियतेचा आरोप सदोदित करण्यात येतो ही पिढी श्रद्धा-शून्य आहे सिनिक आहे. तिची मनोवृत्ती विध्वंसक आहे. तिच्यात सक्रिय कार्य करण्याची जिद्दच नाही. म्हणूनच समाजातील समस्या तरुणाना नीट समजू शकत नाहीत आणि समजल्या तरी त्या सोडवण्यासाठी त्याना योग्य मार्ग उमजत नाही आणि मग डोकवतो पलायनवाद, निष्क्रियता, निराशा व निरुत्साह. अशी ओरड नेहमी ऐकू येते; परंतु या सर्व टीकेला व आरोपाना आपल्या कृतीने सडेतोड उत्तर दिलय दिल्ली विश्वविद्यालयातील १९ कॉलेजातील मुलांमुलींनी या युवा-शक्तीनं योग्य मार्गदर्शनाखाली उत्कृष्ट व भरीव स्वरूपाची कामगिरी करून त्याच्यातील सचोटी व चिकाटीचे दर्शन घडविले.

दिल्लीतील दीनदयाल शोध संस्थान या अ-राजकीय संस्थेनं लोकनायक जयप्रकाश नारायणजयती समारोहानिमित्त पं. दीनदयाल स्मृतिस्पर्धेचे प्रथमच आयोजन केले. स्पर्धेचे नाव होते ' रचनात्मक कर्मपथपर युवक.'

या स्पर्धेची तीन ठळक वैशिष्टये होती—(१) विद्यार्थीवर्गात सामाजिक जागरूकता निर्माण करणे (२) त्याना मागासवर्गीयाच्या सामाजिक व आर्थिक समस्यांची जाणीव करून देणे (३) त्याच्यात अशा लोकाच्या सामाजिक व आर्थिक उद्धारासाठी रचनात्मक काम करण्याची इच्छा निर्माण करणे. ही उद्दिष्टे समोर ठेवून या संस्थेनं दिल्ली विश्वविद्यालयातील कॉलेजांकडे रीतसर प्रवेशपत्रिका पाठविल्या. एकूण २१ कॉलेजानी त्या भरून पाठविल्या. प्रत्येक कॉलेजातर्फे ५ विद्यार्थी व विद्यार्थिनी घेतल्या होत्या. संस्थेनं दिल्लीतील पुनर्वसाहती व झोपडपट्टयाची यादी तयार केली स्पर्धकांना यातून एक निवडून तेथील किमान ५० परिवाराचे सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण करायचे होते. कुठल्याही शैक्षणिक संशोधनाप्रमाणेच स्पर्धकांना आपल्या सर्वेक्षणाचा 'रिपोर्ट तयार करायचा होता.

या रिपोर्टसचे एक वैशिष्टय हे होतं की, बहुतेकानी त्या त्या वस्तीच्या समस्या सुधारण्यासाठी काय केले पाहिजे हे सुचविले होते. युवकानी समस्याचे अवलोकन करावे, त्या सोडवण्याचा मार्ग शोधावा व त्यावर दीनदयाल शोधसंस्थेचे मार्गदर्शन घेऊन कागदोपत्रीचे हे सर्वेक्षण प्रत्यक्ष रूपात अमलात आणावे, हाच या स्पर्धेचा मुख्य हेतू होता. किंबहुना या अटीवरच स्पर्धकानी तीत भाग घेतला.

जवळजवळ सर्व विद्यार्थ्यांनी एक प्रश्न संयोजकाना विचारला की, 'आमच्या सर्वेक्षणानंतर तुम्ही पुढे काय करणार? आम्ही ज्या स्लमस किंवा पुनर्वसाहतीत जातो तेथील लोक आम्हाला एकच विचारतात, 'नुसती विचारपूस करून काय होणार? काही करणार असाल तर बोलतो! आणि 'हो करू' असे कोरडे आश्वासनही नको!'

स्पर्धेचे परीक्षक होते सर्वश्री डॉ. श्रीधरन (सचालक, विश्व युवक केंद्र) प्राध्यापक पी.एल. गोविल (रीडर, दिल्ली स्कूल ऑफ सोशल वर्कस्) डॉ. आर. एल. पटनी (संचालक, रूरल डेव्हलपमेंट) प्राध्यापक एल. आर. शाह व ए. के. दवे. स्पर्धेत शेवटी एकूण १९ गट राहिले होते.

या सन्माननीय परीक्षकांनी इन्स्टिटयूट ऑफ होम इकॉनॉमिक्सला फिरती ढाल व ५०० रु. रोख हे प्रथम पारितोषिक दिलं. दुसरे पारितोषिक जानकीदेवी महाविद्यालय (रु.३००) व तिसरे पारितोषिक किरोडीमल कॉलेज (रु. २००) याना देण्यात आलं.

स्पर्धेच्या आयोजकापैकी एकाने सागितले की, विद्यार्थ्यांनी या स्पर्धेसाठी भरपूर उत्साह दाखवला; पण विद्यार्थ्यांच्या निष्क्रियतेबद्दल सर्वांत जास्त ओरड करणाऱ्या शिक्षकानी मात्र या बाबतीत कमालीची उदासीनता दर्शवली! शिक्षणाव्यतिरिक्त अवातर पण रचनात्मक अशा या कार्यात त्यानी अवस्था दाखवली. एका परीक्षकाने म्हटले की. 'आज आपले जे बांधव दुर्दैवाने अत्यंत खडतर आर्थिक व सामाजिक परिस्थितीत खितपत आयुष्य रेटीत आहेत, त्याच्या सुखदु:खात सामील होण्याची संधी या स्पर्धेने आजच्या शिक्षित युवकाना दिली, ही खरोखरच प्रशसनीय बाब आहे '

स्पर्धेत भाग घेणाऱ्या कुठल्याच गटाला संशोधनक्षेत्राचे त्याचा रिपोर्ट लिहिण्याचे वगैरे प्राथमिक प्रशिक्षण असं नव्हतं. काहीचा तर हा पहिला-वहिलाच प्रयत्न होता. तरी पण परीक्षकाच्या मते त्याचा प्रयत्न कौतुकास्पद होता. सर्वांनीच मिळालेली माहिती, तिची माडणी व तिचं interpretation अतिशय मेहनतीनं केल होत टीमस्च्या कामाच्या सचोटीची तपासणी करण्याकरता, त्यानी निवडलेल्या क्षेत्रामध्ये, संस्थेतर्फे पाहणी-तुकडया पाठवण्यात आल्या होत्या. सर्वांच्या मते विद्यार्थ्यांमधील कामाची तळमळ वादातीत होती.

विद्यार्थ्यांनी काढलेले निष्कर्ष बोलके आहेत. इन्स्टिटयूट ऑफ होम इकॉनॉमिक्सनं दिल्लीतील साधारण ५०० घरं असलेल्या पीलंगी या गावाचे सर्वेक्षण केले. जवळजवळ ८० वर्षांपूर्वी हे एक खरखुरं खेडं होतं; पण या खेडयाच्या शेजारीच एक पॉश कॉलनी निर्माण झाल्यामुळ त्याचं रूपातर एका शहरी झोपडपट्टीत झालं. येथील लोकसख्या १०,००० च्या वर आहे. इथे प्रामुख्याने दोन जाती आहेत: गुजर व वाल्मिकी. बहुतेक लोक अल्प मिळकत वर्गाचे किंवा गरीब मध्यम वर्गाचे आहेत. सर्वेक्षण केलेल्या ५० परिवारापैकी ८६% परिवाराकडे स्लममध्ये किंवा त्याच्या खेडयात घरे आहेत ६६% परिवाराना महिन्याचा खर्च उधारीवर करावा लागतो. या स्लममधील रहिवाश्याच्या चार प्रमुख समस्या आहेत-पाणी, वीज, नगर-स्वच्छता (साडपाण्याची व्यवस्था, शौचालय वगैरे) व स्वच्छता.

या गावात सेवा योजने (NSS) खाली

ही इन्स्टिट्यूट काही काम करीत आहे; पण ती मुख्यत: सेवा-कार्येच आहेत. त्याव्यतिरिक्त सर्वेक्षणात आढळलेल्या या समस्यांचे निराकरण करावे, त्यासाठी कोणते कार्यक्रम हाती घ्यावेत किंवा कोणती योजना आखावी ते मात्र या टीमने सुचविले नाही. अर्थातच तो यानंतरचा टप्पा आहे.

जानकीदेवी महाविद्यालयाने कंझावाला या विकासखंडातील 'मुण्डका' या हरिजन वस्तीची सर्वेक्षणासाठी निवड केली होती. विद्यार्थ्यांनी या वस्तीची निवड तीन कारणांमुळे केली :(१) येथील समाज पददलित व खालच्या वर्गाचा आहे. (२) समाजात कुरीती व अंधविश्वास बोकाळलेला आहे व (३) समाजातील सर्वांत मागसलेली वस्ती आहे. अशिक्षित वर्गही खूप मोठा आहे. या वस्तीत एकूण ५८ परिवार आहेत. अजूनही इथे मुलींचा विवाह लहान वयातच करण्यात येतो व यामुळेच साधारणत: त्या अशिक्षितच राहतात. येथील ९०% लोक दिल्ली महानगरपालिकेत स्वच्छता-कर्मचारी आहेत, ५०% मजूर आहेत व ३ टक्के हस्तकलाव्यवसाय करणारे आहेत.

येथील लोकांच्या उत्तरोत्तर ढासळत चाललेल्या आर्थिक परिस्थितीचे प्रमुख कारण म्हणणे दारू (कदाचित जीवनाच्या वैफल्यातून हे व्यसन जडले असेल). एशियाडच्या धामधूमीत झगमगत असलेल्या दिल्ली शहराच्या बाहेरील परिसरात, घरामध्ये आजतागायत वीज व पाणीपुरवठा नाही. गावाच्या जवळच एक तलाव आहे. पाण्याव्यतिरिक्त यात बऱ्याच गोष्टी सापडतात. उदाहरणार्थ माती, कचरा, डास. या सर्वांत भर पडते ती डुकरांची. शौचालये अद्यापही पुरेशी नाहीत, त्यामुळे वातावरण दूषित होते व म्हणून रोगराई मोठ्या प्रमाणात आहे.' औषधपाण्यासाठी गावकऱ्यांना बरेच लांब गावाबाहेर जावे लागते. गावात प्रसूतिकेंद्रे, चिकित्सालये किंवा खासगी दवाखान्यांची सोय अगदीच अपुरी आहे. बँक असूनही लोक सावकाराकडेच जातात !

शिक्षणासाठी दहावीपर्यंत मुला-मुलींसाठी वेगवेगळ्या शाळा आहेत; पण एक तर शिक्षणात रुची नाही आणि दुसरे म्हणजे दहावीनंतर शिकायचे म्हणजे लांब जाणं आलं. त्यामुळं आधीच ओढगस्त असलेल्या परिस्थितीत जाण्या-येण्याच्या खर्चाची भर पडते. म्हणूनच उच्च शिक्षणासाठी कुणी पुढे येत नाही. मुण्डकाहून कॉलेजात जाणारी फक्त दोनच मुलं आहेत. **सर्वेक्षणात असे आढळले की, या सर्व परिस्थितीला विकास-योजनांची कमतरता जबाबदार नसून, आहेत त्या योजना व्यवस्थितपणे अंमलात आणल्या जात नाहीत ते खरे कारण आहे** विकासयोजना ज्यांच्यासाठी आहेत त्यांना त्याबद्दल माहितीच नाही. महाविद्यालयाने इथे एक महिला प्रशिक्षण केंद्र सुरू केले आहे. त्यांना इथे काय काम आहे, काय करायचे आहे याची कल्पना आली आहे. दीनदयाल शोधसंस्थेने मार्गदर्शन केल्यास याबाबतीत पूर्ण योजना राबविण्याची त्यांची तयारी आहे.

तिसरे पारितोषिक मिळवणाऱ्या किरोडीमल कॉलेजने राणा प्रताप बागेतील 'कबीरनगर' ही वस्ती सर्वेक्षणासाठी निवडली होती. हे नगर १९६०-६७ च्या दरम्यान वसले. येथील लोकांचा अल्पउत्पन्नवर्ग आहे. ६०% लोक अनुसूचित जातीतील आहेत. लोकांचा मुख्य व्यवसाय हस्तकला व दुसरा म्हणजे मजुरी.

या वस्तीमध्ये शिक्षणाची कुठलीच सोय नाही. थोड्याफार प्रमाणावर मुलं दुसरीकडे शाळेत जातात; पण तिथे शाळेतील पक्षपाती धोरणामुळे त्यांची भयंकर कुचंबणा होते. त्यांच्याच वस्तीतील काही मुलांना (ज्यांचा थोडाफार वशिला आहे) पुष्कळशा सवलती मिळाल्या आहेत. २४ परिवारातील १०५ जणांनी असा आरोप केला की, शाळेतील अध्यापक भ्रष्ट आहेत व ते विद्यार्थ्यांच्या निधीचा सर्रास दुरुपयोग करतात!

येथील अधिकांश लोक संपूर्ण राशन घेतात. काही पैशाअभावी पूर्ण राशन घेऊ शकत नाहीत, तर काहींना दुकानदाराच्या दंडेलीमुळे (शिवीगाळ, मारामारी इत्यादी) ते मिळत नाही.

करमणुकीसाठी किंवा मनोरंजनासाठी इथे कशाचाच पत्ता नाही. पार्क नाही, क्रीडांगण नाही, क्लब नाही, टी व्ही. नाही, सिनेमागृह नाही, काही काहीच नाही! ५० घरामध्ये ११ रेडिओ व ११ ट्रांझिस्टर आहेत. गेल्या चार वर्षांत इथे एकदाही मलेरियानाशक औषधाचा फवारा झालेला नाही. घरात विजेचे कनेक्शन देण्यासाठी आठ वर्षांपूर्वी दिल्ली वीज प्राधिकरण (DESU) तर्फे पैसे गोळा करण्यात आले. अजून एकालाही घरी वीज मिळालेली नाही. रस्त्यांवर दिव्यांची सोय आहे त्यात १० पैकी तीन ठिकाणी दिवे असतात. कबीरनगरमधील लोकांकडे शक्ती आहे पण स्फूर्तिकेंद्रे नाहीत. हक्क आहेत पण ते मागण्याची हिंमत नाही, मुलं आहेत पण शाळा नाहीत! सारंच कसं गतिशून्य ! साचलेल्या डबक्यासारखं आहे.

किरोडीमल कॉलेजच्या टीमने कबीरनगरला गतिशून्य विकासाचे केंद्र म्हटले आहे. राजकारण्यांच्या फसव्या आश्वासनांमुळे व सपशेल थापांमुळे कुंठित विकासाला चालना देण्यासाठी हे विद्यार्थी कृतसंकल्प आहेत. त्यांच्या मते कबीरनगरच्या लोकांची मदत त्यांच्या पातळीवर येऊन करावी लागेल. ही टीम स्वत:ला प्रत्यक्ष विकासकार्याशी जोडू इच्छित नाही; पण कबीरनगरवासी आपल्या या तुंबून पडलेल्या अल्प विकासाबाबत जागरूक व्हावेत आणि याची कारणे त्यांची त्यांना उमगतील यासाठी, जरूर तो हातभार लावायची तिची तयारी आहे.

या चमूचे म्हणणे असे आहे की, 'आम्ही त्यांना त्यांच्या शक्तीची जाणीव करून देणार व त्यांना स्वसामर्थ्यावर उभे करणार मलेरिया विभाग व DESU ला जर कबीरनगरचा विसर पडला असेल तर आम्ही त्यांना वठणीवर आणू हे सर्वेक्षण म्हणजे आमच्या कार्याचा पहिला टप्पा आहे. दुसऱ्या टप्प्यात आम्ही समस्यांचं निराकरण करण्यासाठी व्यवस्थित कार्यक्रमाची आखणी करू. त्यासाठी आम्हाला कबीरनगरशी आणखी संपर्काची गरज वाटते.'

### दारूचे व्यसन

या स्पर्धेत पहिली तीन स्थाने मिळवणाऱ्या टीम्सच्या कार्याची ही वानगी आहे. स्पर्धा म्हटली की, कुणी तरी जिंकणार व कुणी तरी हरणार हे तर आलंच; पण इतर स्पर्धकांनी केलेली कामगिरीही तुल्यबळ होती. म्हणूनच परीक्षकांनी एकूण स्पर्धेवर चांगला अभिप्राय दिला. त्यांच्या अभिप्रायात असे म्हटले आहे की, 'स्पर्धकांच्या रिपोर्टस्‌मधील काही निष्कर्ष खूपच सूचक आहेत.

उदाहरणार्थ– बऱ्याच दिवसांपासून आपण सर्वजण–साक्षर व सर्वांना प्राथमिक शिक्षण देण्याच्या गोष्टी करत आहोत; पण अद्यापही शाळेत जाणाऱ्या मुलांमध्ये जेमतेम अर्धा टक्का मुलं व एकतृतीयांश टक्का मुली आहेत. अर्ध्यावर शिक्षण सोडणाऱ्यांची संख्या खूप जास्त आहे. एका टीमने म्हटले आहे की, त्यांनी केलेल्या सर्वेक्षणात ३५००० च्या लोकसंख्येत फक्त ४८ मुलं–मुलीच कॉलेजात जातात !

'आणखी एक गोष्ट अशी की, सर्वसाधारणपणे जिथे बऱ्यापैकी मासिकप्राप्ती आहे, तिथे पुरुषांच्या दारूच्या व्यसनापायी घरातील इतरांना खूपच गरिबीत दिवस काढावे लागतात. मध्यम मिळकतीचे लोक १०% ते ६०% आहेत. अल्प उत्पन्नवर्ग साधारणतः कर्जात बुडालेला आहे.

'अर्थात काही रिपोर्टस्‌मध्ये त्याची वाचनीयता व निव्वळ मुद्द्यांच्या मांडणीत चांगला समतोल साधला आहे, तर काहींनी माहिती वढा चढा के दी है. असे असले तरी आजच्या युवा–शक्तीची रचनात्मक कार्यात रुची वाढवण्याचा आपला मुख्य उद्देश स्पर्धेनं यशस्वीपणे साधला आहे; पण जोमदार रचनात्मक प्रक्रियेची ही सुरुवात ठरावी, शेवट नव्हे. आता त्या दिवसाची वाट पाहू या जेव्हा दिल्लीतील सर्व कॉलेजं येथील सर्व स्लमस् व मागासलेल्या वस्त्या दत्तक घेऊन त्यांच्या विकासासाठी कटिबद्ध होतील !'

हा अभिप्राय पुढील मार्गदर्शनाची बीजे पेरणारा होता.

पुरस्कार–वितरण–सोहळ्यात अतिशय उत्साहजनक वातावरण होते. कार्यक्रमाची सुरुवात कालिन्दी कॉलेजच्या मुलींच्या एका मधुर व अर्थपूर्ण गीताने झाली. गीत होते –

" यह छात्रशक्ति है राष्ट्रशक्ति
उद्‌घोष सुनाएंगे
तरुण कर ज्योती उठाएंगे "

बक्षिसे दिल्ली स्कूल ऑफ सोशल वर्कचे प्राचार्य श्रीयुत रानडे यांच्या हस्ते देण्यात आली. दीनदयाल शोधसंस्थेचे अध्यक्ष नानाजी देशमुखांनी विद्यार्थ्यांना संपूर्ण सहकार्याचे व मार्गदर्शनाचे आश्वासन दिले. त्यांनी सांगितलं की, सत्ता किंवा पदावाचून रचनात्मक काम करून दाखवलं पाहिजे. समाजकार्य समाजाकरता पाहिजे, सर्टिफिकेट मिळवण्याकरता नाही ! समन्वय–समिती लवकरच विद्यार्थ्यांनी सुचविलेल्या पद्धतीने कामाची व्यवस्थित आखणी करणार आहे. नंतर प्रत्यक्ष कामाचा श्रीगणेशा करण्यात येईल.


असा हा सोहळा. त्याचे संचलन केले दीनदयाल शोधसंस्थेचे संचालक देवेन्द्रस्वरूप यांनी, मार्गदर्शन केले माजी खासदार नारायण शर्मा, इन्स्टिटयूट ऑफ अॅग्रिकल्चरचे सहसंचालक डॉ. प्रसाद, विश्व युवककेंद्राचे श्री. श्रीधरन् यांनी. प्राचार्य रानडे म्हणाले की, "मी असल्या कोणत्याच समारंभांना जात नसतो; पण नानाजींनी हा अभिनव उपक्रम केला. विद्यार्थीही उत्साहाने त्यात सामील झाले. युवाशक्तीचे खरे प्रदर्शन येथे घडेल म्हणून मी आलो. तुम्ही हे कार्य प्रत्यक्ष योजना राबवून पुढे न्यालच. त्यासाठी लागणारी मदत करण्याचे मी आश्वासन देतो !"

आणि हे खरेच होते. युवाशक्ती योग्य मार्गदर्शन मिळाल्यास काय करू शकते याचे हा सर्व उपक्रम एक प्रतीक होता. विशेषतः ज्या कॉलेजांच्या युवकांवर टवाळखोरीचा आरोप करण्यात येतो, अशा कॉलेजांची मुलंमुली या उपक्रमात तळमळीने सामील झाली, हे युवाशक्तीने अशा आरोपांना परभारे दिलेले उत्तर होय. हा कार्यक्रम म्हणूनच लक्षात राहण्यासारखा व देशातील सर्व कॉलेजांनी नोंद घेण्यासारखा होता.

–सुनीता तपस्वी

गांधींच्या सहवासातून शिररला दिसला ख्रिस्ताशी साधर्म्य सांगणारा एक महात्मा...आणि त्या महात्म्यात दडलेला माणूस. त्या महात्म्यालाही या माणूसपणाची जाणीव होती. अनेकदा तसं तो जाहीरपणे बोलूनही दाखवायचा....

**राजहंसचे आगामी प्रकाशन**



# महात्मा आणि माणूस

**लेखक : विल्यम शिरर । स्वैर रूपांतर : निखिल वागळे**

**लवकरच प्रसिद्ध होत आहे !**

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०

# भ्रष्टाचार

## शेवटी किमान गुणवंत व्यक्ती हे सर्व सामाजिक व्याधींवरचे सार्वजनिक उत्तर व अखेरचा इलाज आहे.

प्रा. गोपाल दत्त कुलकर्णी

भ्रष्टाचाराची अवस्था दंतकथेतील तीन माकडासारखी दिसली, तरी तिची प्रचीती ज्याला येते, म्हणजे विशेषतः भ्रष्टाचाराचा जोडा ज्याच्या दुखऱ्या किंवा दणकट पावलाना चावतो, त्यांना हटकून माहिती आहे की, भ्रष्टाचाराची अवस्था इंग्रजी स्पेलिंगप्रमाणे आहे ! शब्दाचा उच्चार व आचार (स्पेलिंग) यांच्यात दरी आहे. देशोदेशीच्या वेगवेगळ्या हवामानाप्रमाणे, देशकालस्थितीप्रमाणे त्यात फरकही आढळतो. कुठे स्त्रीदेहाचा वापर, कुठे अन्नपदार्थांचा वापर, कुठे प्रत्यक्ष धनाचा खुराक, कुठे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मेहेरनजर अशी भ्रष्टाचाराची अप्सरेसारखी मोहिनी–रूपे भ्रष्टासुराला नष्ट करण्याऐवजी त्याच्या वासना व भ्रष्टाचारानुषंगिक निर्माण होणारे सामर्थ्य वाढवीत राहतात. बायबलमध्ये उल्लेखिलेल्या पापाप्रमाणे भ्रष्टाचार हे माणसाचे ओरिजिनल सिन (sin=जन्मदत्त पाप) आहे. ऑस्कर वाइल्डने म्हटल्याप्रमाणे 'प्रतिस्पर्ध्याचा वध गळा दाबूनच नव्हे, तर मिठी मारूनही करता येतो, विष पाजून नव्हे, तर चुंबन घेऊनही करता येतो !' भ्रष्टाचार विषकन्येचे चुंबनच नव्हे, तिच्यात रत होणे असते !

भ्रष्टाचार हा पिरॅमिडसएवढा तरी प्राचीन व तेवढाच उत्तुंग आणि अवजड प्रकार आहे. पिरॅमिड-बांधकामासाठी सिमेंट वापरले नव्हते, तरीही फारोहाकडे भ्रष्टाचाराच्या तक्रारी येतच राहात. कंत्राटदाराकडून चेपॉसने (राजाचे अधिकारी) यानी किती दशलक्ष हडप केले, अशा अर्थाची प्राचीन ग्रीक कविता आहे. संस्कृतात तर 'मृदंगो मुखलेपेन करोति मधुरध्वनिम्' हे सुभाषित भ्रष्टाचाराला दोन्ही हातांनी तिंबून वाहिलेली आदरांजली आहे !

ला प्ले या फ्रेंच विचारवंताने समाजात होणारे बरे–वाईट राजकीय बदल यांच्यात कार्यकारणभावनिदर्शक साखळी असल्याचे मानले आहे तेव्हा समाजाला नेतृत्व पुरविण्याचे कार्य करणाराच जर भ्रष्टाचारात रत होऊ लागला, तर त्यामुळे होणाऱ्या आर्थिक व इतर नुकसानीपेक्षा समाजाचे साध्य (GOAL) गाठण्यात जी अडचण पैदा होते, ती चिंत्य बाब ठरते. भ्रष्टाचारात गुंतलेला पैसा ही त्यामानाने गौण बाब आहे, म्हणजे भ्रष्टाचाराच्या मीमांसेत आध्यात्मिक अधःपतन–सदसद्विवेकबुद्धीचे पतन–ही शोककारक गोष्ट आहे. ऋषि–मुनी–वेदान्तीनी शरीरपापापेक्षा मनसिज पापे अधिक खोल व गंभीर मानली याचे कारणही नेमके तेच आहे. भ्रष्टाचाराने गोळा केलेला पैसा (वाम, दाम, साम मार्गांनी) त्याच्याकडून दामदुप्पट वसूल करणे अवघड बाब नसते. प्रसंगी इस्लामिक देशात दिला जाणारा मृत्युदंडाचा धाक खाल्लेला सर्व पैसा ओकायला भाग पाडण्यास पुरेसा ठरतो. इसापनीतीतल्या चोरून खाल्लेल्या अजिरासारखा !

भ्रष्टाचार म्हणजे काय ? स्वत.च्या अधिकाराचा (मग तो चपराशाचा असो की, मुख्यमंत्र्याचा किंवा वॉटरगेट–प्रकरणातील राष्ट्रपतीचा किंवा लॉकहीडमधील पंतप्रधानांचा) स्वतःच्या, कुटुंबियाच्या, जमातीच्या (कम्युनिटी) खाजगी सुखासाठी (तीही पुन्हा शारीरिक स्वरूपाची) वापर करणे. भ्रष्टाचार होतो कोणाकडून ? जी व्यक्ती स्वतः नियत कार्यासाठी अकार्यक्षम आहे, (भले, इतर क्षेत्रात ती बुद्धिसागर असेल !) किंवा जी व्यक्ती नेमून दिलेले कार्य अकार्यक्षमरीत्या पार पाडते तिच्याकडून. भ्रष्टाचार म्हणजे छोट्या किंवा मोठ्या सत्तेचा गैरवापर. गैरवापर म्हणजे तरी काय ? तर खाजगी स्वार्थाला सार्वजनिक स्वार्थापुढे मोठे मानणे ! आणि हे सर्व करत असता, जर ऐहिक लाभ उठवत राहिले तर भ्रष्टाचाराच्या वर्तुळाचे 'वाटोळे' पूर्ण होते. हॅम्लेट म्हणतो त्या अर्थाने आपल्या सर्वांना भ्रष्टाचाराच्या सूक्ष्म अर्थाने वागणूक देण्याचे ठरले, तर चाबकाचे फटके कोणालाच चुकविता येणार नाहीत. 'Nobody will escape whipping !

### चाणक्य लिहितो . . .

कौटिल्याने अर्थशास्त्रात भ्रष्टाचाराची केलेली मीमांसा पाणिनीच्या वैयाकरणी बारकाव्याने केली आहे. चाणक्याने दिलेले दृष्टांत कालिदासाला हेवा वाटायला लावतील असे आहेत फरक एवढाच की, ते दृष्टांत कालिदास सौंदर्यविश्लेषणासाठी वापरतो, तर कौटिल्य भ्रष्टाचारवर्णनासाठी. कौटिल्य लिहितो, (भ्रमराला) ज्याप्रमाणे फुलावरील मधाचा थेंब जिभेच्या टोकावर हलकेच टिपून घेण्याचा मोह अनावर होतो, त्याप्रमाणे शासकीय अधिकाऱ्याला (मंत्री, मुख्यमंत्री व पंतप्रधानालाही जर त्याना संथानम कमिटीच्या अहवालानुसार सार्वजनिक सेवक मानले तर !) राजाच्या (लोकशाहीत लोकाच्या) धनाचा मधु चाटून 'लपकावासा' वाटणे – म्हणजे भ्रष्टाचार ! ज्याप्रमाणे पाण्यात राहणारा मासा पाणी किती पितो वा पीत नाही याचे गणित (की अ–गणित) करणे कठीण त्याप्रमाणे 'शासनाशी संबंधित व्यक्ती किती खातात वा पितात याचा ठाव घेणे अवघड आहे !' ही चाणक्यकालीन अवस्था होती. त्यानंतर सुमारे दोन हजार वर्षे उलटली. तेव्हा भ्रष्टाचाराचे अक्षय्य–अगणित फक्त 'क्ष' हातचा घेऊनच मांडता येईल !

चाणक्य जुनाट म्हटला तरी अगदी १५८३ साली फिलिप स्टब्बसने ऑक्सफोर्ड विद्यापीठात ट्यूटर, प्राध्यापक, प्रोक्टर याचे पैसे खाण्याचे दर दिलेले वाचून कॅपिटेशनफी हा फारच सपक भ्रष्टाचार मानायला लागेल ! भारतात इंग्रज राजवटीतील न्यायनिष्ठुर व भ्रष्टाचारविरहित राजवटीची हुंदके देत आठवण काढणाऱ्या बौद्धिक विध-

वाची संख्या अफाट आहे! त्या ब्रिटिश राजवटीच्या आद्य भारतीय सस्थापकांपैकी रॉबर्ट क्लाईव्ह व वॉरन् हेस्टिंग्ज् याच्या भ्रष्टाचारापुढे बॅ. अंतुले यांना भ्रष्टाचार्य म्हणणे, म्हणजे हेस्टिंग्ज् व क्लाइव्ह याचे आत्मे थडग्यातून तळमळून कण्हून उठत असतील! कारण ते तर भ्रष्टेश्वर होते!

तेव्हा भ्रष्टाचाराचा नि.पात राहोच, भ्रष्टाचाराशी लढणेही अवघड आहे. कारण पडशाप्रमाणे भ्रष्टाचार प्रत्येकाला संधी मिळताच चिकटणारा रोग आहे – तोही कॉमन! ज्या जपानचे अनुकरण करण्यात अमेरिकेला (वॉटरगेटफेम) धन्यता वाटते, त्या जपानी शासनाला, १९१४ साली व नंतर लॉकहीड लाचप्रकरणातील – म्हणजे ६०–६५ वर्षांत अॅटमबॉबपेक्षा मोठी भ्रष्टाचार-धक्का-प्रकरणे पचवावी लागली. आजच्या जगात विकसनशील देश व विकसित देश याच्यात साम्य असेल तर ते फक्त भ्रष्टाचाराचे बाबतीत आहे भाडवलशाही, लोकशाही, कम्युनिस्ट, हुकुमशाही या सर्वांना रेशमी धाग्याप्रमाणे साधणारा दुवा आहे एकच – भ्रष्टाचार! भ्रष्टाचार ही अशी मानसिक रोगाची साथ आहे की जिची लक्षणे सर्वांना अति–परिचित आहेत, तिचे परिणाम पूर्ण ज्ञात आहेत, मात्र त्या रोगावरचे उपाय मात्र अज्ञात आहेत. फाशी द्या, फटके द्या, सत्ता काढून घ्या, बदनाम करा, ब्लॅकलिस्ट करा, कोणतेही अँटीबॉयोटिक वापरा, भ्रष्टाचाराची हरळी सतत आपली हिरवीशार तरारलेली! भारतीय समाजरचनेतून एक वेळ जाती जातील, भ्रष्टाचार जाणार नाही! कारण जातीचा जन्म व शिक्का किंवा अग्निकंकण जन्मल्यानंतर चिकटते, भ्रष्टाचाराचे तसे नाही. तो माणसाबरोबर वेगवेगळ्या तीव्रतेच्या तापाप्रमाणे किंवा व्रणाप्रमाणे वाढतो. जातीत निदान 'आपुलकी' आहे, भ्रष्टाचारी सब घोडे बारा टक्के मानून सर्वांकडून या ना त्या रूपाने लाच देत–घेत राहतो. लाच, लालच, मेहरबानी, विशेष वागणूक, सोयिस्कर दुर्लक्ष किंवा विशेष लक्ष ही भ्रष्टाचारी असत्यनारायणाची वेगवेगळी त्रिरूपे आहेत!

भ्रष्टाचारासाठी समाज विकसनशील असला तरी चालतो, विकसित असला तरी चालतो. बॅ. अतुले याचे ट्रस्टस् व सिमेंट जेव्हढे बदनाम, तेवढेच निक्सन यांचे वॉटरगेट व रीगन याच्या सेक्रेटरींनी सौ. रीगन यांची मुलाखत ठरविण्यास मदत केल्याबद्दल जपानी मुत्सद्द्याकडून स्वीकारलेला 'बंद लिफाफा' (१० हजार डॉलर्स की, एक हजार डॉलर्स?) बदनाम!

## सामाजिक व्यसन

वास्तविक कमी-अधिक भ्रष्टाचारी असणारी बहुसख्य लोकसंख्या राजकारण्यांच्या व नेत्यांच्या भ्रष्टाचाराचे बाबतीत विशेष जागरूक (की जळाऊ?) असते. पाच रुपये लाच खाणारा तलाठी त्यांना किरकोळ वाटतो; पण कोटयवधीचे ट्रस्ट्स् सात्त्विक संतापजनक वाटतात. जर भ्रष्टाचार नैतिक व सामाजिक, कायदेशीर व न्यायालयीन गुन्हा आहे, तर पाच रुपये खाणारा वा पाच कोटीचे सिमेंटसारखे भक्कम ट्रस्ट्स् उभारणारा दोन्हीही सारखेच निंद्य वाटायला नकोत का? की, साधा ज्वर जवळचा व विषमज्वर नकोसा असा हा प्रकार आहे? वास्तविक भ्रष्टाचाराची अळी व भ्रष्टाचाराचा अजगर या दोन्हीविषयी समाजाला सारखीच तिडिक-तिटकारा हवा त्याचबरोबर शासक, मंत्री भ्रष्ट म्हणून नोकरशाही भ्रष्ट हे तर्कशास्त्रही परमार्थाने बापुडे आहे. उद्या चबळखोऱ्यात सर्वच दरोडे घालतात, म्हणून तेथील सर्वच सुजाण नागरिक बंदुकाच्या फैरी झाडू लागले तर खपेल का? **तेव्हा कोटचवधी रुपये पैसे खाणाऱ्या भ्रष्टाचाऱ्याविरुद्धचा राग आणि अनेक स्त्रियांशी संबंध ठेवणाऱ्या पुरुषाच्या विरुद्धच्या संतापात नैतिक वा सात्त्विक सतापापेक्षा षंढ सामाजिक हताश तळतळाट अधिक असतो असे कोणी म्हणाले तर?**

एका भ्रष्टाचारतज्ज्ञाने (म्हणजे भ्रष्टाचाराच्या तात्त्विक अभ्यासूने) म्हटले आहे की, नोकरशाही (सिव्हिल सर्व्हिस) ची नीतिमत्ता शासनाच्या नीतिमत्तेहून वरची पातळी का गाठू शकत नाही? व्यसनी बापाची सताने सज्जन निघत नाहीत. म्हणजे शेवटी जनमानसाचा–मध्यववर्गीयाचा सताप, (स्वत.चे सर्व फायदे येन केन प्रकारेण मिळविणाऱ्याचा–त्यात लाच खाणे आलेच उदा. धुळे जिल्ह्यातील रोजगारहमीतील भ्रष्टाचार!) भ्रष्टाचाराच्या क्वाटिटीवर असतो, 'क्वालिटीवर' नसतो. लाच खाण्याला शासकीय यंत्राचे 'ग्रीज' म्हणणारा प्राध्यापक मध्यमवर्गीयच असतो आणि वर्गात प्रामाणिकपणे न शिकविणे किंवा एखादा पीरियड चुकविणे यात व ५–५० रुपये खाण्यात फार तर सख्यात्मक (व गुणात्मकही) फरक असू शकतो; पण तोही भ्रष्टाचारच असतो. म्हणजे शेवटी पातिव्रत्याच्या कल्पनेप्रमाणे भ्रष्टाचाराची 'नॉर्म' (नियमन) लवचिक आहे. पत्नीकडून पातिव्रत्य अपेक्षिणाऱ्या पुरुषावर जसे 'पत्नीव्रती' राहण्याचे आपोआप बंधन येत नाही, तद्वत् भ्रष्टाचाराचा निषेध करणारा, स्वत: भ्रष्ट नसायला हवा हाही नियम बहुतेक भ्रष्टाचार–टीकाकाराना मान्य नसतो.

भ्रष्टाचार हे सामाजिक व्यसन आहे, रूढार्थाने व सस्कृत अर्थानेही! जोवर ह्या व्यसनाचे अनेकाना हस्तेपरहस्ते लाभ होतात तोवर सर्वजण अळीमिळी–गुपचिळी करतात. बॅ. अतुले याच्या सिमेंटचा व ट्रस्टचा भोपळा वृत्तपत्रे व न्यायालयानी फोडला; पण त्यांच्यासमोर विरोधक म्हणून बसणारे आपल्या पित्यासाठी दारूच्या दुकानांचे परवाने व लागणारे सिमेंट यासाठी त्याच अतुल्याकडे हेलपाटे घालत, हे निसर्गाएवढे उघडे गुपित आहे! जसे रडणाऱ्याला खरे मित्र नसतात तसेच उघडकीस आलेल्या भ्रष्टाचाराला समर्थक नसतात. सथानम समितीने मंत्री, मुख्यमंत्री याना 'जनतेचे सेवक' (पब्लिक सर्व्हंट) मानावे अशी केलेली सूचना केवळ इंदिरा कॉंग्रेसलाच रुचत नाही असे नाही, ती जनता पक्षालाही रुचली नव्हती आणि त्याना 'पब्लिक सर्व्हंट' मानले म्हणजे त्याचा भ्रष्टाचार तात्काळ थांबणार असा थोडाच आहे? फार तर ऊठसूट कोणालाही कोणावर भ्रष्टाचाराची फिर्याद ठोकता येईल! शिष्ट तत्त्वाचा बडेजाव माजवून पक्ष फोडणे हा भ्रष्टाचार नाही? तो जेवढा भ्रष्टाचार आहे तेवढाच पक्षासाठी दबाव आणून पैसे गोळा करणे हाही भ्रष्टाचार आहे! काही सज्जनाना (?) आपण भ्रष्टाचारावर टीका केली, की आपण त्यातून सुटलो अशी आपोआप भावना होते; पण ती धूर्तपणाची आहे. शालीनपणे खाली मान खालून, अंगभर चादर लिपून चालणारी ललना एखादे वेळी त्या गावातील सर्वात चवचाल बाई असण्याची शक्यता असते! काही वेळा

पेशवे जसे गारदी बाळगत, त्याप्रमाणे भ्रष्टाचारी माणसे झटपट कामे उरकण्याकरिता सज्जनाना पाळावी-पोसावी लागतात जसे नेहरूंनी प्रतापसिह कैरॉंना पाळले होते ! आणि इंदिराजी झैलसिगाना जेव्हा कैरॉंएवढा पंजाब घडविणारा कर्तबगार मुख्यमंत्री म्हणून प्रमाणपत्र देतात तेव्हा ते भूषण मानायचे की दूषण ? की इंग्रजीतला 'लेफ्ट हँडेड काँप्लिमेंट' मानायचा? की कालमानाप्रमाणे समाजपरिवर्तन करणाऱ्याच्या भ्रष्टाचाराला भ्रष्टाचार म्हणायचे नाही ? इंदिरा काँग्रेसच्या सर्वच मुख्यमंत्र्याना भ्रष्टाचारी म्हणण्यात आत्मगौरव मानणारे, पं. शेख अब्दुल्ला, वसू व एम जी. रामचंद्रन कोणापेक्षाही काकणभरही (किंवा केसभरही) कमी भ्रष्ट नाहीत याचा सोयिस्कर विसर पडू देतात !

व्यापक समाजहिताच दृष्टीने विचार करता बाबा आमटे म्हणतात त्याप्रमाणे भ्रष्टाचाराला शिष्टाचाराची पदवी देऊ नये; परतु जर सर्वच 'शिष्ट' कमीअधिक प्रमाणात भ्रष्ट असतील तर मग भ्रष्ट कोण? धर्मराजाला शोधून 'दुष्ट' सापडत नव्हता, दुर्योधनाला शोधून सुष्ट दिसत नव्हता ! तेव्हा पुन्हा भ्रष्टाचार हा एकूण कमालीचा ( subjective ) गुतागुतीचा प्रकार आहे की काय? तो थोपविता किंवा नियंत्रित करता येत नाही, असे नाही; पण त्यासाठी एक तर तैवानमध्ये भ्रष्टाचाऱ्याला गोळी घालतात तसा जालीम उपाय तरी हवा किंवा लोकशाहीत शक्य असणारी प्रखर सामाजिक जाणीव हवी. हमरस्त्यावर घडलेल्या अपघातात अर्धमृत व्यक्तीला कोर्टाचे हेलपाटे व पंचनामे नकोत म्हणून "सहनौ टरवतु, सहवीर्यं टरकावहै" या मर्ढेकरी उक्तीप्रमाणे वागणाऱ्यानी भ्रष्टाचार निपटण्यासाठी आपण काय भरीव कृति करतो किंवा करू शकू किंवा केली याचे एखादे टिपण बसच्या तिकिटामागे किंवा पोस्टाच्या स्टॅम्पमागे केले तरी चालेल ! आपल्याला भ्रष्टाचार तर जायला हवा आहे, शिवाय तोही आपण हातपाय न हलविता ! मतदानासारखा लोकशाही हक्क पाच वर्षातून निव्वळ तुच्छ हट्टापायी न बजावणारे भ्रष्ट नाहीत की त्यांना एक समाधान मिळावे म्हणून ते मतदानकेंद्राकडे फिरकत नाहीत ? ते वांझोटे समाधान असे की हे जे काही भ्रष्ट शासन आहे, त्याला मी मत दिले नव्हते ! पण ती व्यक्ती हे विसरते की त्याने मला हे शासक नकोत असा अल्पमताचा का होईना, क्षणिक का होईना कसलाच आवाज उठविला नव्हता !

## सदसद्विवेकबुद्धीचा आवाज

भ्रष्टाचाराला दृष्टान्त देताना नैतिक कॅन्सर म्हटले जाते; परंतु कॅन्सरपीडित रुग्णाना कॅन्सर-जतु वेगवेगळ्या ठिकाणी ग्रासत असले तरी कॅन्सर जतु एकाच प्रकारचे असतात. भ्रष्टाचाराचे तसे नाही. शारीरिक आजाराना 'कॉजल' नाते, कार्यकारणभाव असतात. भ्रष्टाचाराला तोही नाही. Power corrupts, absolute power corrupts absolutely हे फार साधे कारण झाले भ्रष्टाचाराचे ! कारण भ्रष्टाचाराचा संबंध पॉवर-सत्तेशी असतोच असे नाही. भ्रष्टाचार सोसणारा समाज पॉत्ररहीन ( एवल ) असून शिवाय भ्रष्ट असतोच कारण भ्रष्टाचाराकडे दुर्लक्ष करणे किंवा मान तुकविणे यापलीकडचा आध्यात्मिक भ्रष्टाचार नाही !

मग काय भ्रष्टाचार परमेश्वराप्रमाणे सर्वव्यापी व सर्वसामर्थ्यवान् मानून गप्प राहायचे की बंड करायचे त्याविरुद्ध ? हेही अर्थात् त्या त्या समाजाच्या नैतिक कुवतीवर अवलंबून आहे ! एखाद्या राष्ट्राच्या सदसद्विवेकबुद्धीचा आवाज जेवढा बुलद, सामाजिक जाणीव जेवढी प्रखर त्या प्रमाणात भ्रष्टाचाराशी सामना करणे शक्य होणार असते गाधीसारखा एक माणूस 'काळाचा आवाज' बनून व्यासाप्रमाणे दोन्ही बाहू उभारून आवाहने करू शकतो; पण अखेर ती आवाहने पेलण्याची कुवत समाजात हवी ती समाजात निर्माण होण्यासाठी नागाप्रमाणे फणा उभारणारा, प्रसगी डंख मारून भ्रष्टाचाराचा निःपात करणारा समाज हवा. तो समाज म्हणजे आपण आहोत का ? अन्यायाची शाब्दिक चीड येण्यापलीकडे आपण कधी 'सत्याग्रह' धरतो का ? 'चलता है' हे आपले ब्रीदवाक्य आहे ! अशा नामर्द समाजाला भ्रष्ट लोकाविरुद्ध बोलण्याचा अधिकार किती ? भ्रष्टाचार हा प्रदूषणासारखा आहे–नव्हे कार्बन-मोनोक्साइड आहे! हे प्रदूषण तुडविणारे पर्यावरण तयार करण्याची आमची कुवत कोठे आहे? उलट आम्ही सत्प्रवृत्तीच्या वृक्षवेली तोडून भ्रष्टाचार, प्रदूषणाला वाढता वाव देत आहोत. प्रत्येक समाजात भ्रष्टाचार आहे व तो निपटता येणार नाही, ही वृत्तीही क्लीबाची (षंढाची) आहे ! लॉबी, पुतणेगिरी, जातीयवाद, पंथवाद, आश्रय किंवा उत्तेजन, सकुचितपणा याना आपण प्रतिष्ठित संस्थाचे स्वरूप दिले आहे जोवर समाजातील एक व्यक्ती भ्रष्ट आहे व तिला आपण विद्ध करण्यास धजत नाही, तोवर भ्रष्टाचार राहणार ! देवीच्या रोगाचे निर्मूलन करण्यासाठी, देवीचा शेवटचा रोगी शोधून दवाखान्यात डाबण्यासाठी शेकडो 'इन्व्हेस्टिगेटर्स' त्याचा पाठलाग करत होते. रोग नष्ट झाला–शेवटची देवीची लागण निःपात करण्यात यश आले, तेव्हा हा देश देवी-रोगापासून मुक्त झाला ! भ्रष्टाचार देवीपेक्षा वाईट आहे, कारण तो रोग वा त्याची लागण शरीरावर दिसत नाही. A man may smile and smile and be a villain or currupt !

भ्रष्टाचाराविरुद्ध सर्वांत सुदर दृष्टात जसा चाणक्याने दिला आहे, तद्वत भ्रष्टाचार निर्मूलनविषयक उत्कृष्ट उपाय युरोपच्या चाणक्याने–मॅकिआव्हेलीने दिला आहे. तो ४५० वर्षांपूर्वी लिहून गेला आहे की : माणसाच्या दुष्टप्रवृत्ती ह्या कच्च्या अनगड चिखलाप्रमाणे आहेत. त्यांना योग्य–(समाजहितकारक) साच्यात घालण्यासाठी थोर नेतृत्व तरी हवे किंवा चिरेबंदी समाजसघटना हवी. हे नेतृत्व वा सघटन एवढे निष्ठुर किंवा ताठ हवे की ते कोणत्याही सबबीखाली, कारणासाठी भ्रष्टाचार माफ करणार नाही! युद्धासारखी आणीबाणी उद्भवली तरच राष्ट्रहितासाठी किरकोळ गोष्टी माफ करण्यात याव्यात'. मॅकिआव्हेली सागतो की, भ्रष्टाचाराला फक्त एकच उत्तर आहे : Highest aim should be GLORY !' सर्वांत मोठे ध्येय व श्रेय असावे ते कीर्तिमान् सद्गुण ! जेव्हा प्रत्येक व्यक्ती विशिष्ट सद्गुण हेच प्रथम व अंतिम ध्येय मानू लागते तेव्हा त्या समाजाला भ्रष्टाचाराची समस्या भेडसावत नाही. शेवटी किमान गुणवत व्यक्ती हे सर्व सामाजिक व्याधीवरचे सार्वजनिक उत्तर व अखेरचा इलाज आहे. शिक्षा, न्याय, चौकशी-समिती, मालमत्ता जप्त हे उपाय भ्रष्टाचार 'निर्मूलन' करत नाहीत, फक्त तेवढ्यापुरते, तेवढ्या भ्रष्ट व्यक्तींना 'दडपून' टाकतात. दडपून टाकलेला रोग यथावकाश उफाळतो हे नव्याने सागण्याची गरज आहेच काय ? □



आता भटकंतीला सुरुवात !
पण 'हिमालय की गोद में' शिरण्याआधी नीट माहिती करून घेतली पाहिजे एका अनोख्या आंदोलनाची—
—'चिपको' आंदोलनाची.
'चिपको' आंदोलनाचा उगम, प्रवाह, प्रेरणा, विचारधारांची माहिती ऐका प्रत्यक्ष आंदोलनाच्या प्रवर्तकाकडून—चंडीप्रसादजींकडून !
आणि अनुभवा एक 'गिरकी' घेत चढत जाणारा प्रवास !


# प्रेरणा चिपकोची, भटकंती उत्तराखंडाची !

**जगदीश गोडबोले**

**लेखांक — तिसरा**

डेहराडूनला वन—संशोधन संस्था बघण्याबरोबरच टेहरी—गढवालच्या वन—अधिकाऱ्यांना पण भेटायचे होते. टेहरी—गढवालच्या अरण्य-पालांचे वनसंरक्षक (conservator) कार्यालय इथेच आहे. या वेळेस त्यांची भेट होऊ शकली नाही. मात्र प्रथम इथे आलो होतो तेव्हा सहाय्यक—अरण्यपालांच्या भेटीपासूनच 'चिपको यात्रेला' सुरुवात केली होती. आंदोलनाची एकूण पार्श्वभूमि, वनखात्याची बाजू समजून घेण्याचा प्रयत्न केला होता. ऐकीव अथवा वाचीव माहितीने एकदम सरकारला—वनखात्याला न झोडपता, एखादा माणूस आपलीही बाजू समजून घेण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करतो याचे त्यांना खूप अप्रूप वाटले होते. आता मध्ये काही काळ गेला असला तरी माहितीमध्ये काही विशेष फरक पडणार नव्हता. हिमालय की गोद में शिरण्याआधी ही माहिती सांगितलीच पाहिजे !

मध्यहिमालयातील हा गढवाल—कुमाऊँ अथवा उत्तराखंड या नावाने ओळखला जाणारा विभाग डेहराडून, उत्तरकाशी, टेहरी, पौडी, चामोली, अलमोरा, पिथोरागड आणि नैनीताल या आठ जिल्ह्यांनी मिळून बनला आहे. डेहराडून—हरिद्वार—हृषिकेशचे मैदान सोडले तर बाकी पहाडी प्रदेशात त्रिशूळ, कामेत, नीळकंठ, नंदादेवीची उत्तुंग गिरिशिखरे आकाशाशी स्पर्धा करतात. गिरिराजाच्या अंगा—खांद्यावरून भारताच्या जीवनदायिनी गंगा—यमुना या प्रमुख नद्या व पिलंगना, भिलंगना, मंदाकिनी, अलकनंदा या त्यांच्या उपनद्या उगम पावतात. भारतभूमीचे ऐहिक जीवन संपन्न करणाऱ्या या नद्यांबरोबरच पारमार्थिक जीवनही पावन करणारी गंगोत्री—जम्नोत्री, केदारनाथ—बद्रीनाथ आदि अनेक तीर्थक्षेत्रे इथे आहेत; पण त्रिलोकीचं ऐहिक—पारमार्थिक जीवन संपन्न करणारी उत्तराखंडाची ही भूमी स्वतः मात्र पार रंजली—गांजली आहे. प्रत्यही गांजली जात आहे.





एक जमाना असा होता की, चीड–देवदार–बाझ–बुरांझच्या वृक्ष–राजीचे महासागर इथे पसरले होते. भगवान शंकराच्या घनघोर जटातून अवतरलेले अगणित ओढे–नाले अवघी सृष्टी सुजलाम्–सुफलाम् करीत होते. चराचर तृप्त मनाने त्याच्या कल-रवाला प्रतिसाद घालीत होते. निसर्ग आणि चराचर जीवन यांचा सुरिला प्रवाह युगानेयुगे वाहात होता. या नादब्रह्माचा आनद अनुभवण्यासाठी देशोदेशीचे साधक–तापस इथे येत होते गंगा–यमुनाच्या सासरी तख्तं आली आणि गेली! माहेर मात्र शांत–निरामय होते एका गोऱ्या साहेबाचे आगमन होईपर्यंत.

## इथेही कस्तुरीमृग

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास फ्रेडरिक विल्सन नावाचा एक शिकारी इथे आला आणि या शांत–निरामय प्रवाहात भोवरे उठू लागले. गगोत्रीजवळील मुखबा या गावी विल्सनसाहेबाने मुक्काम ठोकला– कस्तुरीमृगाची शिकार करण्याच्या निमित्ताने. गढवालच्या राजाला त्याने अतिशय प्रेमभराने चारशे रुपयाचा नजराणा अर्पण केला. नंतर विनम्रभावाने कस्तुरीमृगाच्या शिकारीचे एकाधिकार मागितले. या 'सोनेरी' माणसाचा विनय व दानत पाहून राजानेही संतुष्ट होऊन 'तथास्तु' म्हटले. पुढे 'ईस्ट इंडिया' कपनीकडून रेल्वेकरिता लाकडी 'स्लीपर्स'ची मागणी आली आणि चीडचे जंगल तोडून स्लीपर्स बनविण्याचे कंत्राट नेमके विल्सनसाहेबाने मिळविले. भागीरथीनदीमधून चीडचे ओडकेच्या ओडके वाहून येऊ लागले !

फ्रेडरिक विल्सन केवळ एक निमित्त होता. गोरासाहेब नफा कमवायला या देशात आला होता. साता समुद्रावर पसरलेल्या आपल्या वसाहती आणि औद्योगिक साम्राज्याची गरज भागविण्यासाठी त्याला मोठ्या प्रमाणावर वन-संपत्तीची गरज होती. जंगलाचे स्वामित्व त्याने हळूहळू आपल्याकडे घेण्यास सुरुवात केली. १८६१ साली वन–खात्याची स्थापना केली. स्थानिक वनवासी–आदिवासी जनतेच्या वन-अधिकारांवर बंधने घालण्यास सुरुवात केली. सहाजिकच जंगलाचे व्यापारी दोहन करणारे इंग्रज सरकार आणि जंगलावर सर्वस्वी निर्भर असणारे जंगलचे अनिभिषिक्त राजे यांचा संघर्ष अटळ होता. गोरासाहेब हुशार होता, घोरणी होता. आदिवासी–वनवासीचा असंतोष शमविण्यासाठी १८६५ साली प्रथम घोषित झालेल्या 'राष्ट्रीय वन–धोरणान्वये' त्यांनी वन–संपत्तीवरील स्थानिक लोकांचे काही अधिकार मान्य केले; पण कागदावरचे हे अधिकार परिणामकारकपणे प्रत्यक्षात येईनात तेव्हा आपल्या हक्कांसाठी आदिवासी–वनवासीनी वेळोवेळी सरकारविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला. राचीच्या बीरसा मुडाच्या नेतृत्वाखालील लढा व यमुना–तीरीच्या तिलाडीचा सग्राम तर इतिहास–प्रसिद्ध आहेत ! (तिलाडी संग्रामाला गढवालचा 'जालियनवाला बाग' म्हणून ओळखले जाते. जंगलावरील आपल्या हक्कासाठी झालेल्या या लढ्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी ३० मे ते ६ जून 'स्मृति–सप्ताह' पाळण्याची परंपरा 'चिपको' आदोलकानी सुरू केली आहे.) सरकारच्या अन्यायी धोरणाविरुद्ध वनवासीयांनीच नाही तर मि. डालयेलसारख्या गोऱ्या साहेबानेही प्रखर टीका केली होती; पण तराजूत वन, वन-संपत्ती तोलणाऱ्या साहेबाला असल्या टीकेची, लोकाच्या असतोषाची पर्वा नव्हती ! वन–विद्येत ( forestry ) तो पारंगत होता. त्याची त्याला चागली जाण होती; पण स्थानिक लोकाच्या भाव–भावनाची, सुख–दुःखांची एका मर्यादेपलीकडे त्याला किंमत नव्हती, कदर नव्हती. सहाजिकच त्याने वन–संपत्तीचे मनसोक्त दोहन केलेच, शिवाय वन–विद्येच्या नावाखालीही चीड–देवदार आदि व्यापारीदृष्ट्या महत्त्वाच्या सूचिपर्णी प्रजातीना उत्तेजन देता–देता स्थानिक लोकाच्या आत्यंतिक गरजेच्या बांज, बुरांश, पमनी, मोहरू, खुरसु आदि रुंदपर्णी प्रजातीकडे पद्धतशीर दुर्लक्ष केले. लोकाचा विरोध साम–दाम–दंड–भेदाने मोडून काढला !

साहेब गेला, साहेबाचे राज्य गेले ! स्वातंत्र्य आले; पण दुर्दैवाने उजाडले नाही ! जगलाचे व्यापारी-दोहन सुरूच राहिले. जंगले भराभर साफ होऊ लागली. अफाट वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येनेही त्यात भर घातली. पोटाची खळगी भरण्यासाठी लोकानी जगल तोडून शेती करण्यास सुरुवात केली. वनसंपत्ती झपाट्याने नष्ट होत होती; पण उत्तराखंडाच्या पहाडी भागात दळण–वळणाची साधने अभावानेच असल्याने त्यालाही काही मर्यादा होती; परंतु १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले आणि 'हिमालयाला जाग आली.' सीमाभागात मोठ्या प्रमाणावर रस्तेबाधणीची, विकास–प्रकल्पाची कामे सुरू झाली. याबरोबर काही जगल साफ होणे अपरिहार्यच होते. तसेच या रस्त्यावरून आपली 'आधुनिक संस्कृति' उत्तराखंडाच्या अंतर्भागात पोहोचणेही क्रमप्राप्त होते. अशा परिस्थितीत इतरत्र जे घडले व घडते तेच इथेही घडले. आपल्या 'संस्कृती'च्या अग्रदूतांनी जगल–ठेकेदार–व्यापाऱ्यानी क्षणाचाही विलब न लावता उत्तराखंडात आतवर मुसडी मारली! कस्तुरी–मृगापासून–वनौषधिपर्यंत सर्व गोष्टी झपाट्याने खाली होऊ लागल्या ओकचे लाकूड पाण्यात बुडते, त्यामुळे जल–मार्गाने त्याची वाहतूक होत नसे. आता रस्ते झाले आणि ओकवृक्षाचे महासागरही रिते होऊन मैदानाकडे जाऊ लागले. आपल्या विश्वात रममाण झालेल्या गरीब–अडाणी–पहाडी माणसाला या झझावाताने पार चक्रावून सोडले. हिमालयातील साधन–संपत्ती लुटून त्याच्या अंगणातून वाहणारी झटपट सुख–समृद्धीची ही गंगा




खालच्या मैदानात आपले भांडार रिते करीत होती; पण या वाहत्या गंगेत हात धुऊन घ्यायचे ज्ञान या पहाडी माणसाला नव्हते आणि भानही नव्हते. एका बाजूला वसाहतवादाचाच वारसा सांभाळणाऱ्या चुकीच्या वन–विषयक धोरणामुळे व्यापारी वृक्ष-लागवडीचे-निरर्थ्या गरजेच्या जंगलावरचे आक्रमण चालूच होते. दुसऱ्या बाजूला प्रतिदिनी तुटणाऱ्या जंगल–आच्छादनाबरोबर आधीच तुटपुंज्या असलेल्या शेतीतील उपजाऊ–मिट्टीही ( top-soil ) खाली मैदानाकडे वाहात होती. अशा कठीण परिस्थितीत पहाडात राहून पुऱ्या कुटुंबाचे पोट पोसणे अशक्य होते. अखेर मानवी पर्यावरणाच्या ( Human Environment ) सिद्धान्ताप्रमाणे उपजाऊ मातीबरोबरच ही पहाडी माणसही खाली मैदानाकडे वाहून येऊ लागली. त्यांच्या अंगणातून वाहून आलेली ही माती गंगा–यमुनेच्या खोऱ्यात सोने पिकवीत असता, या लोकांच्या नशिबी मात्र माती–मोल जिणे येऊ लागले! नशीबवान होते ते लष्करात भरती झाले. कम–नशिबी होते ते मुंबई–दिल्ली–कानपूरच्या घरा–हॉटेलातून कप-बशा विसळू लागले, प्रासादाची राखण करू लागले.

चंडीप्रसाद भट आणि त्यांचे साथीदार ही अशीच चामोळी जिल्ह्यातील 'प्रवाह–पतित' माणसे! रोजगारासाठी वणवण भटकणारी, परिस्थितीच्या भोवऱ्यात सापडलेली; पण सुदैवाने जयप्रकाशजी नारायण, सरलादेवी आदि सर्वोदयी कार्यकर्त्यांच्या प्रभावाखाली आल्याने संवेदना–हिंमत न हारलेली. चिनी आक्रमणानंतरच्या व्यापक रस्ते–बांधणी–कार्यक्रमाचा फायदा घेऊन स्थानिक रोजगार निर्माण करण्यासाठी त्यांनी 'मल्ला नागपूर सहकारी मजूर समिति'ची स्थापना केली. आठ–दहा इयत्ता शिकलेले हे तरुण इतर मजुरांबरोबर तासन तास रस्त्याच्या कामावर राबू लागले. सक्त मेहनत आणि चोख व्यवस्थापनाच्या बळावर बऱ्यापैकी मुनाफा कमवू लागले. सुरुवातीला या स्थानिक लोकांच्या धडपडीचे कौतुक झाले; पण लौकरच या मजूर–संघाची वाढती कमाई व लोकप्रियता बाहेरच्या धंदेवाईक ठेकेदारांना व त्यांच्या जिवावर चैन करणाऱ्या भ्रष्ट सरकारी यंत्रणेला खुपू लागली. त्यांनी समितीला हरतऱ्हेने नामोहरम करण्याचे प्रयत्न सुरू केले. वनौषधि पुरविण्याचे काम समितीने हाती घेतले; पण इथेही व्यापाऱ्यांनी नाकेबंदी सुरू केली. लोकांकडून नाममात्र किंमतीत वनौषधि विकत घेणारे व्यापारी त्याच वनौषधि औषधांच्या कारखान्यांना विकून भरपूर नफा कमवत असत; पण लोकांनी जरा भाव वाढवून मागताच, व्यापाऱ्यांनी मालच विकत

पृष्ठ २० वर



# मराठी विनोद

साहित्य परिषद व्याख्यानमाला । पुष्प दुसरे : सोमवार १८ ऑक्टोबर १९८२

**प्रा. स. शि. भावे**

**गडकऱ्यांना एक उच्चभ्रू गृहस्थ भेटले. गडकऱ्यांनी त्यांना नमस्कार केला. ते म्हणाले : " मी तुमच्यासारख्या भडभुंज्याला नमस्कार करीत नसतो ! " गडकरी हळू आवाजात म्हणाले : " पण मी करतो ना ! "**

□

# अतिशय दुर्मिळ असा लखलखीत, जळजळीत क्रूरपणा !

[ शासकीय ग्रंथालयात ' मराठी विनोद ' या विषयावर व्याख्यानमाला सुरू असताना, माईकने चालवलेला गोंधळ हा परिस्थितिजन्य विनोदाचा उत्तम नमुना आहे, असे सांगून स. शि. भावे यानी आपल्या भाषणास सुरुवात केली. ]

गडकऱ्याचा विनोद हा खूप चर्चा झालेला व लिहून झालेला विषय आहे. तरीही मी यावर बोलण्यास प्रवृत्त झालो याची कारणे दोन. त्यातील पहिले खाजगी स्वरूपाचे आहे. १९२० मध्ये राम गणेश गडकरी यांचे निधन झाले. त्यानतर अवघ्या चार–पाच वर्षांनी माझे वडील शिवराम गोविंद भावे यानी ' गडकऱ्याचा विनोद ' या नावाचा प्रबंध लिहून प्रसिद्ध केला. तेव्हापासून गडकऱ्याच्या विनोदाची परखड चिकित्सा सुरू झाली. यात अतिशयोक्ती नाही. तेव्हा तेच कार्य आपल्याला वेगळ्या पद्धतीने करता येईल का ? हा प्रयत्न हे पहिलं कारण; पण केवळ या खाजगी कारणासाठी मी सभेचा वापर करत नाही व तो तसा करणे इष्टही नाही. दुसरे कारण नवीन विवेचन शक्य झाले नाही' तरी जुन्या आठवणी काढण्यातही आनंद असतो. सुखाच्या तशाच दु:खाच्याही. कारण त्यापासून सबंधित लोकांना आनद मिळतो.

शाळा–कॉलेजमधील आवडलेले विनोद आपण पुन्हा पुन्हा आठवतो आणि आपल्या लक्षात येते की, त्यातील हसण्याची तीव्रता मुळीच कमी झालेली नाही. किंबहुना विनोदाचे वैशिष्ट्य असे मानले जाते की, चुटक्यासारखा अगर कोटीसारखा विनोद पुन्हा पुन्हा ऐकला तरी प्रथम ऐकल्याइतकेच हसू आले पाहिजे किंवा त्यातील गंमत तितकीच जाणवली पाहिजे. असे जर जाणवले तर तो खरा विनोद आणि गडकऱ्याच्या विनोदाची जी अनेक रूपे आहेत, त्या रूपाविषयी, एक सर्वसाधारण असे विधान करता येईल की, गडकऱ्याच्या विनोदातील ताजेपणा कधीही हरवत नाही. त्याचे कोणतेही पुस्तक उघडून वाचायला सुरुवात केली आणि त्यात गडकऱ्याचा खास विनोद आला की, आपले जे हसणे सुरू होते, ते आपण ते पुस्तक पहिल्यांदा वाचत असलो किंवा अनेकदा वाचून झाले असले तरी देखील, हसताना आपल्याला तीव्र गंमत जाणवते. याचे रहस्य काय याचा विचार मी गंभीरपणे करणार आहे. व्याख्यान ' विनोदा ' वर असले तरी ते विनोदी होईल असे नाही. विनोदाचे विश्लेषण प्रत्येक वेळी विनोदी असेलच किंवा असावेच असे नाही. गडकरी फार चागला विनोद करतात आणि त्या विनोदाचे विश्लेषण जर मला चांगल्यापैकी करता आले तर माझे काम झाल्याचे समाधान मला मिळेल.

गडकरी हे कवी, नाटककार आणि स्वतंत्रपणे विनोदकारही होते. त्याकरता त्यानी वेगवेगळी नावे घेतली आहेत. कवी–गोविंदाग्रज नाटककार–राम गणेश गडकरी आणि विनोदी लेखासाठी बाळकराम याच्या कवितेत विनोद आहे, नाटकात विनोद आ आणि स्वतत्र विनोदी पुस्तकात अगर लेखातही आहेच. विनोदाचे जे तीन प्रकार सांगितले जातात आणि विनोदाचा विचार करताना ते उपयोगीही आहेत, ते म्हणजे शब्दनिष्ठ, प्रसगनिष्ठ व स्वभावनिष्ठ. या तिन्ही प्रकारचे विनोद गडकऱ्यानी विपुल प्रमाणात केले आहेत.

' वेड्याचा बाजार ' हे त्याचे पहिले नाटक. त्यातील देशपांडे हे पात्र त्यानी शब्दनिष्ठ विनोद करण्यासाठी निर्माण केले आहे त्या पात्राला नाटकात इतर काहीही काम नाही. नाटकभर हे पात्र केवळ शाब्दिक कोट्या करीत असते. त्या वेळी गडकऱ्याचा विनोद किती बाल्यावस्थेत होता हे यावरून दिसते. त्याची प्रतिभा तेव्हा अपरिपक्व स्वरूपात होती; पण अशा वेळीसुद्धा शाब्दिक विनोदाचा हव्यास त्यांना सोडवला नाही. विनोद हा गडकऱ्याच्या प्रतिभेचा अविभाज्य भाग होता आणि त्यासाठी हे एक उदाहरण मुद्दाम दिले आहे.

गडकऱ्याच्या कवितेत फार मोठ्या प्रमाणात विनोद नाही; पण विनोद नाही असेही नाही. ' विहिणीचा कलकलाट ' या एका कवितेचा उल्लेखही पुरे. येथे थोडे विषयातर करून असा प्रश्न विचारावासा वाटतो की, या मालेत १० विनोदकारावर भाषणे आहेत; पण त्यात एकही स्त्री विनोदकार नाही. स्त्री कादंबरीकार, कथाकार, आत्मचरित्रकार, कवयित्री आहेत; पण उत्तम विनोद लिहिणाऱ्या लेखिका का नसाव्यात ? तर ' विहिणीचा कलकलाट ' या कवितेत जगातील सर्व आवाजाची मोजदाद केली आहे आणि हे आवाज एकत्र केले तर याही आवाजाना बुडवून टाकणारा आवाज असू शकतो, तो म्हणजे विहिणींचा कलकलाट ! अशी कल्पना आहे. तेव्हा गडकऱ्यांच्या कवितेतही विनोदाची चुणुक आपल्याला दिसू शकते;

पण गडकऱ्यांचे जे दोन 'अरुण' आहत तिकडे विशेष लक्ष वेधायचे आहे. त्यातील दुसरा—भडक अरुण आहे तिकडे बालकवींनी अरुण लिहिला आणि गडकऱ्यानी त्याच्यावर ताण करण्यासाठी दोन प्रकारचे 'अरुण' लिहिले एक 'अरुण' बालकवींसारखाच नाजुक असा 'अरुण' लिहिला आणि दुसरा मर्ढेकरानादेखील कुतूहलाने मागे वळून पाहायला लागावे असा लिहिला. त्यानी अशी कल्पना केली आहे की, सूर्यनारायणाने सध्यादेवीच्या सणसणीत मुस्काटीत मारली आहे त्यामुळे तिचा चेहरा लालभडक झाला आहे. 'टाग मारते कादेवाडी' लिहिणाऱ्या मर्ढेकराच्या किनी तरी वर्षे आधी त्यानी हे लिहिले आहे. अशा भेसूर कल्पना (इग्रजीत bizarre अशा अर्थाच्या) करणे हा त्याच्या कल्पकतेचा महत्त्वाचा विशेष होता. त्याच्या 'घुबडास', 'स्मशानातील गाणे', 'फुटकी तपेली' या सर्व कवितामध्ये आजच्या अस्तित्ववादी तत्त्ववेत्त्याना पुन्हा मागे वळून पहावे लागेल अशा प्रकारचा अस्तित्ववाद माडला आहे आणि त्याकरता आपल्या स्वत च्या बेलगाम कल्पनाशक्तीला भेसूरपणाच्या प्रागणात मोकळेपणाने वावरायला त्यानी परवानगी दिली आहे. आपल्या सर्व विनोदकाराना विनोदातसुद्धा औचित्याचे बधन पाळावे असे वाटते. चि. वि. जोशी घ्या किंवा श्रीपाद कृष्ण घ्या, हे विनोद करता करता आपल्या कल्पनाशक्तीला विशिष्ट ठिकाणी थांबवतात आणि सास्कृतिक व सामाजिक औचित्याची बधने ते आपल्या कल्पनाशक्तीला घालतात. गडकरी हा मराठीतला 'एकमेव' म्हटल तर अतिशयोक्ती होऊ नये, असा विनोदकार आहे की, ज्यान आपल्या कल्पनाशक्तीला कुठेही मर्यादा घालण्याचे नाकारले आहे.

## भेसूरपणा का ?

इथे भेसूरपणाच्या प्रातामध्ये कल्पकता जेव्हा जाते तेव्हा त्या कल्पकतेचे स्वागत कसे करायचे हा एक प्रश्न असतो आणि म्हणून त्याच्या या भेसूरपणाचे थोडे विश्लेषण मला करावेसे वाटते गडकऱ्याची नाटके जर आपण पाहिली तर त्यामध्ये अशा तऱ्हेचे भेसूर प्रसग त्यानी घातले आहेत. 'पुण्यप्रभाव'मध्ये कालिंदी, जिने आपला मुलगा बळी दिला आहे ती, चोरून आपल्या मुलाला स्मशानात पुरायला आली आहे असा प्रसग आहे आणि तिथे ती आपल्या मुलाच्या शवासाठी खड्डा खणत आहे, तेव्हा तिच्या तोडी गडकऱ्यानी एक गाणे घातले आहे, तिच्या तोडी एक स्वगत घातले आहे तिच्या मनातील उत्कट भावमयता आणि स्मशानातील भेसूरता याचा छायाप्रकाशात्मक असा प्रसंग गडकरी उभा करतात गडकऱ्याचा हा भेसूरपणा का ? असा जेव्हा प्रश्न येतो तेव्हा या प्रसगाच्या आधारे असे दिसेल की, भावमयता ही काही वेळेला भेसूरपणाच्या पार्श्वभूमीवर किंवा भेसूरपणाच्या वातावरणामध्येच जास्त व वेगळेपणाने खुलत असते. त्या भावमयतेची तीव्रता ही आनदी किंवा प्रसन्न वातावरणात जितकी आपल्याला भिडत नाही, तितकी भेसूर वातावरणात भिडते. सबंध वातावरण भेसूर आणि त्यात धारदार अशी कोवळीक हे गडकऱ्याना फार आवडते.

त्याचे दुसरे नाटक 'प्रेमसन्यास'. त्यात दुमन नावाची जी बालविधवा आहे, तिने गळफास लावून आत्महत्या केली आहे आणि गडकऱ्यानी, गळफास लावून लोंबत असलेले प्रेत असा प्रत्यक्ष प्रसग दाखवला आहे. तेव्हा, भेसूर दृश्य हे नाटकात दाखवायचे व भेसूर वर्णन कवितेत करायचे हा गडकऱ्याच्या प्रतिभेचा छद होता, असे म्हणण्यास हरकत नाही त्याच्या प्रतिभेला हे भेसूर दर्शन घडविणे अत्यत आवश्यक वाटत होते असे आपण म्हणू आणि या भेसूरपणाच्या पार्श्वभूमीवर त्याची सर्व साहित्यदृष्टी आणि विशेषत. त्याचा विनोद आपण समजावून घेतला पाहिजे माझ्या वडिलानी गडकऱ्याचा विनोद फार क्रूर आहे, अशी टीका केली आहे. तसेच, विनोद हा जर श्रोत्याना आनददायक वाटायचा असेल तर त्याला सहृदयतेची पार्श्वभूमी हवी आणि ती तशी नसेल तर तो क्रूरपणा असून त्याने रसवत्ता निर्माण होऊ शकत नाही असे त्यानी प्रतिपादन केले आहे. त्यानी असे प्रतिपादन केले असले तरी मला ते पटलेले नाही आणि म्हणून गडकऱ्याच्या भेसूरपणाचे रहस्य हे अधिक खोल जाऊन शोधावे असे मला वाटले. श्री. रा. शं. वाळिंबे यानी काही वर्षांपूर्वी व्याख्याने देताना असे विधान केले होते की, गडकऱ्याचे खलनायक हेच त्याच्या नाटकाचे खरे नायक आहेत.

त्याच्या नाटकातील विनोद जर आपण पाहिला तर तो क्रूरतेच्या अतिशयोक्तीला जातो हे आपल्याला कबूल करावे लागेल. इदू—बिंदूचा 'भावबधना तील विनोद जर आपण पाहिला तर त्याच्या काळेपणावर गडकऱ्यानी ज्या काही कल्पना केल्या आहेत, उदा. — त्या दोघीना पाढरी पातळे नेसवून दिवसभर उन्हातून हिंडवावे आणि दुसरे दिवशी ती पाढरी पातळे काळया चद्रकळा म्हणून खुशाल विकावीत, अशा तऱ्हेचा विनोद गडकऱ्यानी इदू—बिंदूबद्दल केला आहे आणि हा विनोद काळेपणावर म्हणजे व्यंगावर आधारलेला आहे म्हणून तो क्रूर आहे असे म्हटले जाते आता यात क्रूरतेची छटा नाही का ? तर आहे.

पण हा क्रूरपणा गडकऱ्यामध्ये का येतो ? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. खलनायकामध्ये तो गंभीरपणे येतो आणि गडकरी काही विनोदी उपनायक योजतात, त्याच्यामध्ये तो विनोदी पद्धतीने येतो. थोडे विस्ताराने उदाहरण द्यायचे झाले तर 'पुण्यप्रभावाचे' देता यईल. पुण्यप्रभावाची रचना कशी केली आहे, तर त्यात प्रेमाचा एक वरचा त्रिकोण आहे आणि एक खालचा त्रिकोण आहे. या दोन्ही त्रिकोणाची छायाप्रकाशात्मक रचना आहे वसुधरा हा वरच्या त्रिकोणाचा केंद्रबिंदू आहे. भूपाल, ईश्वर आणि वृदावन तिघाचे वसुधरेवर प्रेम आहे भूपालाबरोबर ती लग्न करते आणि इतर दोघाना नकार देते ईश्वराची प्रतिक्रिया ही उदात्त तर वृदावनाची सूडाची. भूपाल, ईश्वर, वृंदावन आणि मधे वसुधरा असा हा प्रेमाचा, वरच्या दर्जाचा उदात्त असा त्रिकोण आहे; पण गडकऱ्याचे एवढ्याने समाधान होत नाही. त्याना असे वाटते की, काही माणसे कमी दर्जाची असतात, त्यानी यासाठी अनेकदा 'हलकट वृत्तीची' हा शब्द वापरला आहे हलकट म्हणजे नीच नव्हे, तर ज्यांच्या प्रतिक्रिया या हलक्या पातळीवरच होतात अशी — मग तो प्रेम, द्वेष कोणताही अनुभव असो. जशी काही मोठ्या मनाची माणसे असतात, त्यांचा लोकाच्या चागुलपणावरच विश्वास असतो आणि काही माणसे अशी कुजकी असतात की, ज्याचा दुसऱ्याच्या वाईटपणावरच विश्वास असतो. तर ही जी हलक्या मनाची माणसे असतात, त्याचा एक त्रिकोण रंगवावा असे गडकऱ्याना वाटते, म्हणून ते वसुधरेला प्रति-

नायिका म्हणून किंकणी उभी करतात आणि मग कंकण, नूपुर आणि सुदाम हा त्रिकोण किंकिणीच्या भोवती ते निर्माण करतात आणि वरचा त्रिकोण आणि खालचा त्रिकोण असा फरक दाखवतात. वरचे प्रेम उदात्त आहे आणि खालचे प्रेम उपहास्य आहे, हे गडकरी दाखवतात

**आता हे ते कशाकरता करत असतात ? तर जीवनाचा हा जो कुरूप, नीच, घाणेरडा भाग आहे, याच्याविषयी गडकऱ्यांच्या मनात विलक्षण चीड होती; जळजळीत अशी चीड होती. ही चीड 'सपूर्ण बाळकराम'मध्ये, सपूर्ण विनोदी लेखांमध्ये मुख्यत: दिसते.**

विनोदाचा सहृदय किंवा निखळ आविष्कार गडकऱ्यांना येत नाही असे नाही. काही उदाहरणेसुद्धा देता येतील. मगच या क्रूरतेकडे वळणे अधिक योग्य होईल 'भाववधना'तील घुडीराज, महेश्वर आणि 'प्रेमसंन्यासा'तील गोकुळ याची जर तुलना केली, तर हे चटकन स्पष्ट होईल. स्वभावनिष्ठ विनोद म्हणजे घुडीराजाच्या स्वभावासारखा विनोद, गोकुळच्या स्वभावासारखा विनोद नव्हे. विनोदासाठी माणसाचे एखादे व्यंग शोधायचे, त्याचा अतिरेक करायचा आणि त्या अतिरेकात हसायला लावायचे ही पद्धत गोकुळच्या व्यक्तिरेखाटनात दिसते. हा स्वभावनिष्ठ विनोद नाही. घुडीराजाचे मात्र स्वभावविशेषच असे आहेत की, जे एका बाजूने गुण आहेत आणि दुसऱ्या बाजूने आपल्याला मनमुराद हसायला लावणारे असे गबाळग्रथी विशेष आहेत. गुण वेगळा, हुषारी वेगळी, नीचपणा वेगळा आणि याच्यामध्ये गबाळपणा असतो. आपल्यापैकी प्रत्येकात हा गबाळपणा (clumsiness) या किंवा त्या क्षेत्रात असतोच. आपण एकमेकाना त्यासाठी हसतो. म्हणजे प्रत्येकाचा गबाळपणा आपण समजून घेतो. तू या क्षेत्रात तर मी त्या क्षेत्रात आहे, असे म्हणून आपण परस्पराशी गोडी करतो. तर हा गबाळपणाचा विनोद आरोग्यदायक आहे असे आपण म्हणू आपले मानसिक आरोग्य कायम ठेवणारा असा हा विनोद असतो. हाही विनोद गडकऱ्यानी केला आहे.

सपूर्ण बाळकराममधील 'सकाळचा अभ्यास' हे प्रहसन पहा. यात तीन लहान मुले आहेत. त्यातील दोन मुले अभ्यास करीत आहेत, म्हणजे त्याचे अभ्यास सोडून इतर सर्व काही चालले आहे. म्हणजे भाडणे, शाई साडणे वगैरे. थोरला भाऊ मधेच आत जातो आणि तोड मिटून गाल फुगवून बाहेर येतो. धाकटा त्याला विचारतो, 'काय रे, आत जाऊन काय खाल्लंस ? ' याचे उत्तर फार गमतीदार आहे गडकरी सहृदय विनोद कसा करू शकत होते याचे हे उदाहरण आहे. तो म्हणतो, 'मी आत गेलो नाही, आईने मला लाडू दिला नाही, मी तो खाल्ला नाही. ' आता ही जी भाषा आहे, त्यात लहान मुलाची एकमेकाबद्दलची प्रतिक्रिया एवढाच विषय आहे आणि त्यातला खेळकरपणा टिपला आहे

दुसरे प्रहसन प्रो. कोटिबुद्धे याचे अगदी लहानसे-फक्त दीड पानी. यात लहानगा बाळू रडत असतो आणि प्रोफेसरमहाशय त्याला खाद्यावर घेऊन, येरझारा घालत तारे, आकाशगगा दाखवत असतात; पण बाळचा मात्र केकाटत असतो. शेवटी त्याची आई येते. त्याला अडगुळं–मडगुळं करते आणि मग बाळचा झोपी जातो याच्यात विद्वत्तेच्या अतिरेकाने साध्या साध्या गोष्टीसुद्धा कशा लक्षात येत नाहीत हे दाखविले आहे. न्यूटनची गोष्ट आहे न– त्याच्याकडे असलेल्या माजराला बाहेर येण्यासाठी तो एक मोठ भोक पाडतो आणि त्या माजरीला पिलू झाल्यानतर त्या पिलासाठी लहान भोक पाडतो आणि पहात बसतो न्यूटनसारख्या विद्वानाच्या हे लक्षात येत नाही की, ज्या मोठ्या भोकातून माजर जाऊ शकते त्यातूनच लहान माजरही जाऊ शकेल ! जेव्हा मोठ्या माजरीच्या मागोमाग त्याच भोकातून पिलू बाहेर येते तेव्हा त्याच्या हे लक्षात येते. तीक्ष्ण बुद्धिमत्तेमुळे काही साध्या गोष्टीकडे दुर्लक्ष होते हा स्वभावनिष्ठ विनोदाचा नमुना या प्रहसनात दाखविला आहे.

## जगूचा रिपोर्ट

प्रसगनिष्ठ विनोदाचा फार बहारदार नमुना या पुस्तकात दाखवला आहे. या उताऱ्याचे नाव आहे 'जगूचा रिपोर्ट' हा जगू नाटकमडळीत काम करणारा बालनट असतो आणि त्याने एका लग्नसमारभाचा हा रिपोर्ट लिहिला आहे. हा लग्नसमारंभ म्हणजे जगूला नाटकाचाच प्रयोग वाटतो. त्याने लिहिले आहे, 'मुख्य मडळी नवखी वाटत होती. स्टेजवर लाजत होती मुख्य पाटर्यांच्या नकला पाठ नव्हत्या आणि आश्चर्य म्हणजे भाषण प्रॉम्टरच म्हणत होते. म्हणजे भटजी मत्र म्हणत होते जगलाचा सीन लावला होता, म्हणजे आब्याच्या डहाळचा लावल्या होत्या. प्रेक्षकमंडळी आपल्या जागेवर न बसता स्टेजवरच बसली होती–हा जगूचा रिपोर्ट मुळातूनच वाचण्यासारखा आहे. यामध्ये गडकऱ्याची कल्पनाशक्ती फारच बहरली आहे यात त्यानी एका क्षेत्रावर दुसऱ्या क्षेत्राचे आरोपण केले आहे. लग्नप्रसग आणि त्याच्यावर हे जणू नाटकच चालल आहे असे आरोपण. पु ल. देशपाड्याची हीच पद्धत आहे असे आपल्याला दिसेल तुम्हाला त्याचा 'अंगुस्तान विद्यापीठ' हा लेख आठवत असेल तो संपूर्णपणे शिप्याच्या सस्कृतीवर आहे विद्यापीठातील सगळा तपशील शिप्याच्या परिभाषेत लिहिला आहे त्यातील मुख्य शिप्याचे नावच दाजिबा अण्णा ठिगळे असे आहे. त्याच्या डोक्यात विचार सुरू झाले असे म्हणताना, 'दाजिबाच्या डोक्यात विचाराचे पायमशीन खडखडू लागले ', असे पु ल. नी लिहिले आहे ही गडकरी पद्धत आहे–की, एकदा एका वास्तवक्षेत्रावर काल्पनिक क्षेत्राच आरोपण करायच म्हटल की, त्या वास्तव क्षेत्रातले सर्व तपशील त्या काल्पनिक क्षेत्राशी जोडून द्यायचे आणि त्यातून आपल्याला दोन्ही क्षेत्राचा आनद मिळतो इतकच नव्हे, तर आपल्या मनावर आणखी एक गभीर परिणाम होतो, जो गडकऱ्याना साधावयाचा आहे असं मला वाटतं आणि तो म्हणजे हे जे लग्न वगैरे समारभ असतात, जसं आता हे भाषण हा एक समारभ आहे, हे एक नाटक आहे आणि या नाटकामध्ये नकळत आपण वेगवेगळ्या भूमिका घेतलेल्या असतात. ,जशी मी आता वक्त्याची भूमिका घेतली आहे, आमच्या प्राचार्य गाडगिळानी श्रोत्याची भूमिका घेतली आहे आणि या आपल्या भूमिका प्रत्येकाला पार पाडाव्या लागतात. यातला जो बारिकसा नाटकाचा भाग असतो त्यातून आपल्या नेहमीच्या वागण्यामध्ये एक प्रकारची कृत्रिमता येत असते आणि ती चागली असते. माटचानी

छोटी छोटी वशीकरणे ' असा निबंध लिहून त्याचे चागले वर्णन केले आहे. अशा छोटचा गोष्टी थोडयाशा नाटकी पद्धतीने केलेल्या आपल्याला आवडतात आणि मग वास्तव आणि नाटक यात फार थोडं अंतर उरतं, हे या छोटचा जगूच्या रिपोर्टमध्ये आपल्याला दिसत. आता या विनोदाचा एवढा गंभीर अन्वयार्थ काढायला पाहिजेच असं नाही. त्यातली जी, दोन तपशील एकत्र माडून त्याच्याकडे बघण्याची गंमत आहे, ती गंमत आपण पाहिली तरी पुरे आहे. त्या गमतीच्या पलीकडे समजा आपण गेलो नाही तरी काही हरकत नाही.

परंतु गडकऱ्यांच्या ज्या विनोदाकडे मला विशेषकरून तुमचं लक्ष वेधायचं आहे, त्याच्याविषयी मी आज सविस्तर बोलू इच्छितो— बाकीचे विनोद आहेत ते वाचून दाखविले तर गडकऱ्याइतक्या चागल्या पद्धतीने मला वाचून दाखवता येणार नाहीत, म्हणून तुमच्यापर्यंत ते नीट पोचणार नाहीत. तुम्ही स्वतः हे पुस्तक घ्याव आणि मनमुराद हसावं—एवढाच त्यावर उपाय आहे; पण विवेचनासाठी जेव्हा मी त्याचा विनोद बघतो, तेव्हा मला असं वाटत की, गडकऱ्याचा एक विशिष्ट प्रकारचा जो विनोद आहे, तो मराठीमध्ये फार दुर्मिळ आहे. कदाचित मराठी मनाला तसा विनोद झेपत नसावा असं आपण म्हणू; पण याबद्दल थोड अधिक विवेचन करायला पाहिजे.

## ब्लॅकनेस—काळोख

थोडचा शब्दसंहितेत मी असं म्हणेन की, गडकऱ्याच्या नाटकांमध्ये ज्याप्रमाणे अनेकदा black comedy पाहण्यास मिळते तसा हा गडकऱ्याचा black humour आहे आणि तो मराठीमध्ये फार दुर्मिळ आहे आता ब्लॅक ह्यूमर म्हणजे काय ? तर विनोद करणाऱ्याच्या मनामध्ये विलक्षण कडवटपणा साचलेला पाहिजे आणि तो व्यक्त करण्यासाठी त्याने अत्यंत तीव्र खवटपणा करून असा काही विनोद उत्पन्न केला पाहिजे की, वाचकाच्या मनामध्ये तो उतरला पाहिजे. त्याला हसू येता कामा नये, तर त्याच्या रसिकतेला, संवेदनक्षमतेला विलक्षण पीळ पडला पाहिजे अशा तऱ्हेची गडकरी विनोदाची पद्धत दिसते. म्हणून या सर्व पद्धतीला मिळून मी ' ब्लॅक ह्यूमर ' असे नाव दिले आहे. असा ब्लॅकनेस हा काही मराठी लेखकामध्ये आढळतो. चि. त्र्यं खानोलकराच्या कादंबऱ्यामध्ये असा काळोखाचा भाग आपल्याला दिसतो; पण एकूण या सबंध मराठी वाङ्मयात हा ब्लॅकनेस आपल्याला फारसा आढळत नाही.

वाचकाला आपल्या मनातला कडवटपणा अधिक कडवटपणाने सागणारा हा विनोद आहे. त्याला बरं वाटावं म्हणून केलेला हा विनोद नाही उलट वाचकाला बरं वाटत असेल तर ते कमी व्हावं, त्याचं मन अस्वस्थ व्हावं, अंतर्मुख व्हावं, त्याला स्वत च्या मनातल्या मनात चार-दोन फटके बसावेत, असा उद्देश मनामध्ये ठेवून केलेला हा विनोद आहे या संदर्भात दोन वर्षांपूर्वीच्या दिवाळीतले एक उदाहरण मला आठवतं. ' परिक्रमा ' या सदरामध्ये कमलेश्वरानी ऐन दिवाळीच्या सणाच्या दिवशी एक कार्यक्रम सादर केला होता. तो होता आपल्या घरी काम करणाऱ्या मोलकरणीच्या जीवनावर. त्या मोलकरणीना त्यानी असे काही प्रश्न विचारले की आपली मने अतर्मुख होऊन, आपल्या जीवनातला आनंद कमी व्हावा, थोडासा कडू व्हावा. ते असं म्हणाले की—

' तुम्हाला महिनाभर रोज पोटभर जेवायला मिळतं का ?'

' नाही मिळत. '

' तुमच्या मुलाना तुम्हाला पोटभर जेवायला घालता येतं का ?

' नाही घालता येत. '

' मग अशा वेळी, जेव्हा जेवायला नसतं, तेव्हा तुमची मुलं काय करतात ?'

' आमच्या मुलाना सवय झालेली असते. पाणी पिऊन ती झोपतात. कुरकुर करत नाहीत ! '

—आता हे सगळ कसं भेदक आहे पहा. एका लहान मुलाल जेवण मिळत नाही, जेवण न मिळण्याची त्याला सवय झाली आहे आणि म्हणून ते त्याबद्दल कुरकुरही करेनासं झालं आहे. आता ह समजूतदारपणा आहे असं आपण म्हणायचं का ? त्या कार्यक्रमाच्य शेवटी कमलेश्वर असं म्हणाले होते की, दिवाळीचा दिवस आहे आणि तुमच्यापैकी अनेकाचं तोंड इतकं कडू झालं असेल की, तुमच घास तुम्हाला गोड लागणार नाही हे मला माहीत आहे; परंतु या दिवाळीत तुमचा एक घास कडू व्हावा या हेतूनंच मी हा कार्यक्रम इथे घडवून आणला आहे. त्यामुळे तरी ज्याच्या मुखात गोड काय अन् कडू काय, घासच पडू शकत नाही त्याची स्थिती आपल्याला कळू शकेल !

गडकऱ्यांच्या मनात समाजातल्या आणि व्यक्तीच्या बाबतीत अशा अनेक वाईट गोष्टीबद्दल भरपूर कडवटपणा साचलेला होता. तो त्यानी आपल्या ह्या ' ब्लॅक ह्यूमर 'मधून व्यक्त केला आहे. गडकऱ्याच्या नावावर ज्या काही आख्यायिका सागितल्या जातात, त्याच्यातही हा ब्लॅकनेस आहे किर्लोस्कर नाटक मंडळीचा गडकऱ्याना फार अभिमान ! ती फुटून गंधर्व नाटक मंडळी निर्माण झाली. त्यातील काही मंडळी परत आली. गडकऱ्याना त्याचा फार राग आला होता. त्यानी विचारले, ' का, परत का आलात ?'

' नाही आमचे जोडे विसरलेत ! '

गडकरी म्हणाले, ' बाहेर ते खूप मिळतील ! '

गडकऱ्याच्या मनातला तळतळाट व्यक्त करणारी ही आख्यायिका आहे. समाजात जी उच्चभ्रू मंडळी असतात, अशाचा गडकऱ्याना फार तिटकारा होता— इथे गडकऱ्याच्या मनाचा आपल्याला परिचय करून घ्यावा लागणार आहे—याची एक आख्यायिका सागतात—

गडकऱ्यांना एक उच्चभ्रू गृहस्थ भेटले. गडकऱ्यांनी त्याना नमस्कार केला. ते म्हणाले, ' तुमच्यासारख्या भडभुजाला मी नमस्कार करीत नसतो ! '

गडकरी हळू आवाजात म्हणाले, ' पण मी करतो ना ?'

हा जो उत्तराचा भाग आहे, त्यात या उच्चभ्रू लोकांच्या उच्चभ्रूपणाचा पोकळपणाचा, दाभिकपणाचा गडकऱ्यांना आलेला राग, व्यक्त झाला आहे इथे गडकरी आणि इतर विनोदकार याच्यात थोडासा फरक पडतो इतर विनोदकार आपल्याला दांभिकपणाच्या या सर्व छटा दाखवतात व हसायला लावतात. गडकऱ्यांची ही इच्छा असते की, या दांभिकपणाबद्दल आपल्याला राग यावा आणि राग

त्यावा या हेतूनं जेव्हा ते लिहितात, तेव्हा त्याच्या पद्धतीचा हा खास विनोद तयार होतो. त्याचं जे प्रसन्न विनोदाचं दालन सागितलं जातं त्यामध्येदेखील हा कडवटपणा आहे.

'स्वयंपाकघरातील गोष्टी' असा त्याचा एक फार रम्य लेख आहे. 'बर्फीची चटणी'. – सहज दिसेल अशा ठिकाणी एक-सव्वाशेर बर्फी आणून ठेवावी. येता–जाता ती थोडी थोडी खात जावी. थोडयाच वेळात बर्फीची चटणी उडते, अशा तऱ्हेच्या स्वयंपाक-घरातील गोष्टी त्यांनी सागितल्या आहेत; पण हे सागताना पुन्हा त्याना आपला कडवटपणा विसरता आला नाही. काही पदार्थ त्यानी फार चांगले दिले आहेत – अकलेचा कादा, गुळाचा गणपती, संसाराचे खोबरे वगैरे. नेहमी पदार्थांच्या कृतीत शेवटी असते की, हा पदार्थ गरम गरम खायला चागला लागतो किंवा झटपट होतो. तसे 'संसाराचे खोबरे' या पदार्थाच्या खाली टीप दिली आहे, 'हा पदार्थ जन्मात एकदाच करता येतो!'

त्याना ही चीड आहे की, बहुतेक प्रत्येक कुटुंब आपल्या घरातील एका तरी मुलाला 'कांदा' नाही तर 'गणपती' करीत असते. हा जो चिडखोरपणा आहे तो गडकऱ्यानी किती साधेपणाने व्यक्त केला आहे पहा. त्याचे जे भाषाप्रभुत्व आहे, ते तुम्ही आवर्जून लक्षात घ्यावे असे मला सुचवायचे आहे 'अकलेचा कादा'– आपलेच एक लहानसे पोर घ्यावे. त्याचे शक्य तितके लाड करावेत. त्याला कधीही रागावू नये. त्याला वाटेल ते बोलू द्यावे. पाहुणे आले तर त्यानाही त्याला बोलू द्यावे–शेवटी गडकरी आपल्या त्या खास धारदारपणाकडे येतात आणि ते असं सागतात, 'कादा चिरताना जसे आपल्या डोळयातून पाणी येते, तसे या अकलेच्या कादयाच्या बोलण्यानेही कधीकधी आपल्या डोळयातून पाणी येईल; परंतु तो या पदार्थाचा गुण आहे. तो सहन करायलाच पाहिजे!' आता यामध्ये 'आपलेच एक लहानसे पोर घ्यावे', यात परकेपणाही आहे, गडकऱ्याच्या मनातील टीकाही आहे हा शैलीचा भाग. म्हणजे, विनोद तर करायचा, तो धारदार ठेवायचा आणि ते कापलं गेलेलं आहे हे आपल्याला कळू नये अशा प्रकारची व्यवस्था करायची.

एक उदाहरण आठवलं म्हणून पटकन् सागतो – जुन्या काळी टायरन पॉवर (Tyrone Power) हा एक मोठा तलवारबाजी करणारा नट होता. त्याचा खलनायक म्हणून बेसील राथबोन (Basil Rathbone) हा काम करायचा. त्याचं द्वंद्व एका चित्र-पटात होतं. यात प्रत्येकजण आपल्या तलवारबाजीचं प्रात्यक्षिक दाखवितो. एका मोठया चर्चमध्ये दोघे तलवार-युद्ध खेळतात. त्या वेळी बेसील राथबोन आपल्या एकाच तलवारीत तीन मेणबत्त्या न पाडता विझवतो आणि विजयानं टायरन पॉवरकडे पाहतो. आता आपल्या मनात असं कुतूहल येतं की, टायरन पॉवर याच्यापेक्षा जास्त असं काय करणार? टायरनची तलवार फिरते, त्याचा क्लोजअप् येतो, तीन मेणबत्त्या विझलेल्या नसतात. काहीच झालेलं नसतं. आपल्याला वाटतं, नायक हरला. बेसील राथबोन कुत्सितपणे हसतो. 'तुला काही जमलं नाही' म्हणतो. आपला नायक त्या मेणबत्त्याकडे जातो आणि कापलेल्या पण न विझलेल्या मेणबत्त्या उचलून दाखवतो. म्हणजे त्याने तिन्ही मेणबत्त्या न विझवता कापलेल्या असतात! याचा जो घाव आहे तो जास्त धारदार, जास्त नाजुक, न ओळखता येणारा; पण ओळखल्यावर घायाळ केल्या-खेरीज न सोडणारा असा दाखवला आहे आणि गडकऱ्यांचा विनोद जेव्हा अशा तऱ्हेचा असतो, तेव्हा तो अशा प्रकारे चरचरा कापून टाकणारा असतो!

## नाटक कसे पहावे?

गडकऱ्यांनी विनोदाचे विषय तरी किती घेतले आहेत? फारच थोडे. एक तर 'लग्नसराई' ही एक लेखांची माला आहे. नंतर 'नाटक कसे लिहावे?' आणि 'नाटक कसे पहावे?' असे दोन लेख आहेत. 'कवीचा कारखाना' असा एक लेख आहे. म्हणजे एका मर्यादित विश्वात ते आहेत, असे म्हणण्याचा मोह माझ्यासारख्या मराठीच्या प्राध्यापकाला होईल यात शंका नाही. ही विषयांची मोजदाद १०–१२ विषयांच्या पलीकडे जात नाही; पण त्यानी विषयाची जी खुलावट केली आहे, त्यामध्ये त्यांनी जे तपशील आणले आहेत, ते पाहिले तर आपला भ्रमनिरास होतो की गडकऱ्याचे विषय हे मर्यादित आहेत. त्याचे विषय, इंग्लंडमध्ये त्या वेळेला असलेल्या भारतमंत्र्यांपासून ते पुण्यात असलेल्या ओंकारेश्वरापर्यंत व्यापक आहेत. कल्पनाशक्तीचा वापर करताना कोणत्या कोणत्या तऱ्हेचे दृष्टात द्यावेत हे गडकऱ्याचे खास तंत्र आहे. त्या तंत्रातून त्याची ही व्यापकता लक्षात येते आणि त्याच्यातून आपण त्याच्या काळेपणाकडेदेखील वळू शकतो. एकदा कल्पना त्याना सुचू लागल्या, म्हणजे कल्पनाचा विस्तार ते कोणत्या पातळीपर्यंत जाऊन करीत असत ते पहा.

'वरसशोधन' या नाटकातील हा छोटासा दोन–तीन वाक्याचा उतारा पहा – 'वरील शेवटल्या शेवटल्या शब्दावरून मी हुडयाच्या चालीला उचलून धरणारापैकी आहे हे वाचकाच्या लक्षात आलेच असेल. याची अनेक कारणे आहेत. यातील एकच इथे दिले असता वाचकाचे समाधान होईल. हिंदुस्थानसारख्या कमी व्यापाराच्या देशात लोक स्थावर मिळकतीला पिढयान्पिढया चिकटून बसतात आणि अशा प्रकारे संपत्तीचे एकच स्थायित्व अर्थशास्त्राच्या दृष्टीने देशाच्या समृद्धीला मोठे घातक आहे. आता मुलीचा हुंडा देण्यासाठी दरसाल हजारो लोकाना घरेदारे विकून मोकळे व्हावे लागते ही गोष्ट महशूर आहे आणि यामुळे आमच्या देशातील पैसा या हातातून त्या हातात खेळत राहतो. यात अगदी आयत्या वेळी सौदा केल्यामुळे व्यक्तिशः प्रत्येकाचा थोडा तोटा होत असेल हे खरे; परंतु देश-कल्याणासाठी स्वार्थत्यागाला तयार असणे हे प्रत्येक देशभक्ताचे कर्तव्य आहे.' आता कुठल्या पातळीपर्यंत त्यांनी हा हुंडयाचा विषय नेला आहे हे स्पष्टपणे आपल्या लक्षात आले असेल.

याच्यामध्ये राजकीय म्हणून जो कल्पनाशक्तीचा भाग काढला आहे, तो मी तुम्हाला मुद्दाम वाचून दाखवितो. 'नाटक कसे पहावे' यामध्ये त्यांनी नाटक फुकट पाहू इच्छिणाऱ्याचे अनेक भाग केले आहेत. त्यातील मुख्य म्हणजे, त्यांच्या काळात राजकारण्याचे जे जहाल आणि मवाळ हे प्रकार होते, हे प्रकार त्यानी नाटक पाहणाऱ्यांच्यामध्ये केले आहेत. त्याचा तपशील त्यांनी कसा खुलवला आहे हे पाहण्यासारखे आहे त्यात ते असे म्हणतात–'निःशस्त्र प्रतिकाराचा मार्ग स्वीकारणारे नाटयसृष्टीतील जहाल लोक येतात ते

कोण ? पोस्टमन, म्युनिसिपालटीतील नोकर, रेल्वेकडील अधिकारी, गावातील ठिकठिकाणच्या अड्ड्यातील प्रमुख वगैरे लोकांचा या जहाल वर्गात समावेश होतो. अप्रत्यक्ष प्रतिकार करण्याच्या बाबतीत हे पूर्णपणे वाकबगार असतात. आपल्याला आजच्यासुद्धा परिस्थितीत काही जहाल लोक डोळ्यापुढे येतील. कलकत्त्याच्या राष्ट्रसभेपासून गाजत असलेले, मवाळांना थरथर कापविणारे आणि अधिकाऱ्यांच्या डोळ्यात सलणारे राष्ट्रीय पक्षाचे चार कठाळी ठराव या नाटकी जहालांजवळ वेडयावाकडया रूपात हजर असतात. नाटकवाल्यांनी आपल्याला नाटकाला फुकट सोडलेच पाहिजे, ही यांची स्वराज्याची कल्पना. गावच्या गडबडया लोकांचा घुमाकूळ, ही यांची स्वदेशी चळवळ लोकांना नाटकाची तिकिटे न घेण्याचा उपदेश करणे, हा यांचा बहिष्कारयोग आणि नाटक चालले असता दंगाधोप्यांना उत्तेजन देणे हेच यांचे राष्ट्रीय शिक्षण. क्वचित्प्रसंगी नाट्यगृहाभोवती लोकांना येऊ न देण्याचे पिकेटिंगसुद्धा अमलात येते याच्या अप्रत्यक्ष प्रतिकाराचे काही नमुने नमूद करतो. नाटक सुरळीत चालले असता मध्यंतरी वन्समोअर–नोमोअरचा घुमाकूळ घालणे, पोस्टमनने नाटक मंडळीची पत्रे उशीरा आणणे किंवा आंजबात फाडून टाकणे, म्युनिसिपालटीच्या लोकांनी नाटकमंडळीच्या राहत्या घरी किंवा नाट्यगृहात पाण्याची टंचाई करून सोडणे, रेल्वेकडील लोकांनी पार्सले अडकवून ठेवणे ,सामानाचे डबे मध्यंतरी फस्त करणे किंवा चुकीच्या स्टेशनवर रवाना करणे–वगैरे वगैरे–हे किंवा यासारखे अडवणुकीचे मार्ग राजकीय जहालांच्या प्रयत्नापेक्षा शतपट फलदायक असतात, हे इथे नमूद करणे केवळ आवश्यक आहे. या नाटकी जहालांनासुद्धा पीटामध्ये बसण्यासारखे वसाहतीचे स्वातंत्र्य नको असते इंग्लिशमनप्रमाणे, पैसे खर्च करणाऱ्याप्रमाणे नाटकगृहात निर्भेळ स्वराज्य मिळविणे हे यांचे अंतिम साध्य असते.

–आता हा सबंध उतारा आपण पाहिला, तर यात नाटक फुकट पाहणाऱ्यावर टीका नसून, ही जहालातल्या ढोंगी लोकांवर टीका आहे आणि ही करण्यासाठी गडकऱ्यांनी जहालाचा दृष्टांताप्रमाणे उपयोग केला आहे विनोदाचा हा जो प्रकार आहे, जो अलीकडच्या विनोदी लेखकामध्ये पु ल. यशस्वीपणे वापरतात, तो प्रकार मला अतिशय महत्त्वाचा वाटतो. इथे जे वर्णन केलेले असते ते आणि ते वर्णन करण्यासाठी जे दृष्टांत वापरलेले असतात ते यांना सारखेच महत्त्व असते. एक साध्य आणि दुसरे साधन असे गौण–प्रधान महत्त्व नसते. हे जरा अवघड होतं आहे किंवा वर्गातल्यासारखं होत आहे याची मला जाणीव आहे; पण हा विनोदाचा खास प्रकार आहे हे कळणे आवश्यक आहे.

अनेक लोक दृष्टांताचा उपयोग गौण साधन म्हणून करतात. गडकऱ्यांसारखे, ज्याचं वर्णन करायचं आहे त्याला दृष्टांताइतकेच महत्त्व आणि दृष्टांताला त्या परिस्थितीइतकेच महत्त्व देतात आणि अशा दुहेरी धारेनं दुहेरी उपरोध साधतात हा जो विनोदाचा भाग आहे. त्यामुळे हा विनोद बुद्धिनिष्ठ, बुद्धीला आवाहन करणारा आहे मी तर असं म्हणेन, आपली बुद्धी जागरूक करून अधिक धारदार करणारा हा विनोद आहे. आता यातले जे दोन क्रूर असे नमुने आहेत, त्याकडे मी आपले लक्ष शेवटी वेधणार आहे. कवी हा किती त्रासदायक असतो किंवा किती मूर्ख असतो याच्याबद्दलचे गडकऱ्यांचे जहाल भाष्य वाचण्याजोगं आहे

## कोऱ्या पानाचा उपयोग

'कवीचा कारखाना' या नावाचे तीन लेख गडकऱ्यांनी लिहिले. त्यातल्या एका लेखातील सुप्रसिद्ध अतिशयोक्ती आपल्याला माहीत आहेच. 'मंडईत एकदा कवीने मला गाठले. त्याच्या काखेतील बाड पाहून मी बेशुद्धच पडलो; पण त्याची तमा न बाळगता कवीने मला म्हणजे बाळकरामला– घरी नेले आणि सांगितले, माझी सतरा कडव्यांची कविता आहे मी तुम्हाला शेवटचं म्हणजे फक्त सतरावं कडव वाचून दाखवतो. त्याच्या आग्रहाला बळी पडून गडकऱ्यांनी ते ऐकलं आणि मग त्याचा कावा त्याच्या लक्षात आला. तो म्हणाला, 'आता सतरावं समजण्यासाठी सोळावं आणि ते समजण्यासाठी पंधरावं !' आता गडकरी त्याच्यावर कशा कल्पना रचतात ते पहा ते म्हणतात 'शेवटी मी बेशुद्ध पडलो. बेशुद्ध पडण्याचं सोंग करणं हे बरं आहे. मग प्राणायामाचं महत्त्व माझ्या लक्षात आलं मग कवीनं पहिल्या कडव्यापर्यंत कविता म्हटली आणि आपल्यावर भलतं-सलत बालंट यायला नको म्हणून तो तिथून पळून गेला !' अशा तऱ्हेचं अतिशयोक्त वर्णन गडकऱ्यांनी केलं आहे

आता इथे कवीला नावे ठेवण्याचा गडकऱ्यांचा उद्देश नाही. कवीचं विडंबन गडकऱ्यांना करायचं नाही. गडकऱ्यांचा जो स्वभाव आहे, त्या स्वभावाचं विश्लेषण इथे होते असे मला वाटते. समाजामध्ये अशी– इंग्लिश शब्द वापरतो, म्हणजे तो फार लागणार नाही आपल्याला मराठी शब्द फार लागतात. समाजात अशी मीडिऑकर (mediocre) माणसं असतात, की जी बुद्धिवान माणसांना फार छळत असतात आणि हा जाच गडकऱ्यांना फार होत असे. कारण गडकऱ्यांची स्वत:ची बुद्धी आणि कल्पनाशक्ती इतकी तीक्ष्ण होती की त्यांना हा मीडिऑक्रिटीचा (mediocrity) भाग जराही खपत नसे. म्हणजे त्यांचा त्रासच होत असे. बर, या तऱ्हेच्या माणसाजवळ इतर काही गुण असतात. ते दीर्घकाळ गोड बोलू शकतात. ते बुद्धिमान माणसांना चिकटू शकतात. ते स्वत:च्या मीडिऑक्रिटीचं स्वत:च खूप कौतुक करू शकतात आणि अशा प्रकारे ते बुद्धिमान किंवा कर्तृत्ववान (excellent) माणसांना घेराव करू शकतात आणि मग अशा बुद्धिवान माणसाचा काही निभाव लागेनासा होतो. ही आयुष्यातील फार मोठी उणीव गडकऱ्यांना सतत जाणवत असे. आता कोणकोणती माणसं त्यांच्या तावडीतून सुटली नाहीत, हे पाहण्यासारखं आहे

त्यांनी एक लेख लिहिला आहे त्यात त्यांचे फर्ग्युसनवरील प्रेम व्यक्त होते. त्या वेळचे प्रिन्सिपॉल रँ.प्रराजपे. गडकरी हे जहालवादी, टिळकवादी असल्याने मवाळ पक्षीयांबद्दल त्यांच्या मनात एक अढी आहे रँ पराजप्यांचे वर्णन करताना त्यांनी रिकाम्या जागेचा उपयोग केला आहे. त्यांच्या बढतीचे ते वर्णन करतात हे प्राचार्य मग नामदार शिक्षणमंत्री झाले होते त्या वेळची गोष्ट आहे. हे पराक्रम नोंदून खाली कोरे पान सोडून त्याखाली तळटीप दिली आहे की, 'यांच्या यशाच्या पुढच्या पुढच्या पायऱ्या वाचकांना त्या त्या वेळी आपल्या हाताने लिहिता याव्यात म्हणून ही कोरी जागा सोडली आहे.' म्हणजे, परांजपे मवाळपणे यशाच्या पायऱ्या चढत होते, हे त्यांना सहन झाले नाही. याचा त्यांना निषेध करायचा होता, तो त्यांनी अशी कोरी जागा सोडून केला आहे. कोऱ्या जागेचा मराठी

विनोदकारानी इतका चागला केलेला उपयोग आपल्याला फार क्वचित सापडेल ! गडकऱ्याच्या मनातले राग हे असे असत.

कवीचा गडकऱ्याना फार राग. हा कुठल्याही प्रसगात कवी म्हणूनच पाहत असतो याच्यात जी अमानुषता आहे, ती गडकऱ्याना निषेधार्ह वाटते या संदर्भात नुकतीच एक कानावर आलेली गोष्ट सागावीशी वाटते. एक लेखिका होत्या. त्याचा मुलगा अपघाताने मरण पावला. हे समजल्यावर त्या घटनास्थळी पोहोचल्या तेव्हा पोलीस त्याना म्हणाले, 'तुम्ही पाहू नका. तुम्हाला ते सहन होणार नाही!' मी अस ऐकतो की,यावर लेखिका म्हणाल्या, 'मी काही नुसतं आई म्हणून पाहणार नाही काही, मी एक लेखिका म्हणून त्याला पाहणार आहे !' आता एका आईने असे उद्‌गार काढलेले ऐकून आपलीही गडकऱ्यासारखीच प्रतिक्रिया होईल अस मला वाटतं. तर कवीची अशा तऱ्हेची प्रतिक्रिया असते की, जीवनातील प्रत्येक अनुभव तो साधन म्हणूनच वापरत असतो, याची गडकऱ्याना फार चीड येते आता याच्यावर लेख कसा लिहायचा ? तर त्यानी, एका गावात भावुराव नावाचा कवी होता अशी कल्पना केली आहे. हा भावुराव कोणताही प्रसग घडो, कविता रचायचा. याची फजिती दाखविण्यासाठी गडकऱ्यानी जी क्रूर कल्पनाश्रेणी रचली आहे, ती मला तुम्हाला सागायची आहे. त्यानी असं म्हटलं आहे की, आमच्या गावात एक गृहस्थ राहत होते. त्याना एक बालक झाले; पण ते मृतावस्थेतील होते आणि इथून ही कल्पना त्यानी कशी क्रूरपणाच्या मार्गाने नेली, हे पाहण्यासारखे आहे.

–प्रथमच भावुराव बुचकळयात पडला. कारण त्या गृहस्थाना पुत्रलाभ झाला म्हणून त्याचे कवितेत अभिनंदन करावे की, ते मूल जन्मत च मृत आहे म्हणून शोक व्यक्त करावा, हे त्याला कळेनासे झाले. पण एवढ्यावरच गडकरी थाबत नाहीत. हे कळेनासं झालं म्हटल्यावर त्यानी आपली कल्पनाशक्ती स्वैर सोडली आहे. ते पुढे म्हणतात–'गावात सगळीकडे हर्षाच उत्फुल्ल वातावरण निर्माण झाल. सगळे लोक त्रिबकरावाच्या घरी येऊ लागले, त्याना धन्यवाद देऊ लागले त्या मुलाची प्रेतयात्रा काढण्याचे गावाने ठरविले. शाळाना सुट्ट्या मिळाल्या. मुलं कवायतीसारखी चालू लागली.' इथे गडकऱ्याचा आणखी एक वळसा येतो– 'मुल कवायतीसारखी चालत असताना त्यानी कवायतीची गाणी सुरू केली आणि त्याच्या शिक्षकानी त्याना तिथल्या तिथे गळे दाबून गप्प केले–कविता नको. इतक त्या गावाला कवितेच वावडं होतं आणि भावुरावाला कविता करता येत नाही असा क्षण निर्माण झाला होता, म्हणून सर्व गावाला आनद झाला होता जत्रेचं वातावरण निर्माण झालं होतं. अशा रीतीने स्मशानात मिरवणूक आल्यावर तिथल्या वयोवृद्ध गृहस्थानी भाषणाला सुरुवात केली– 'ईश्वराच्या कृपेन आपल्याला हा चागला दिवस दिसला. कशासाठी तर ज्यामुळे भावुरावाला कविता करता आली नाही. प्रसंग आला, पण कविता करता आली नाही.,– तोच तिथून भावुराव येताना दिसला आणि त्याने एक कागद आणला आहे म्हटल्यावर सगळीकडे पळापळ सुरू झाली' कारण आता कविता ऐकायला लागणार ! त्याच्यापुढे गडकऱ्यानी कळस केला आहे की, 'पटकन त्या मेलेल्या मुलाने आपणहून त्या खणलेल्या खड्डयात उडी घेतली !'

## दीडपानी नाटक

आता ही जी सबंध कल्पनाशक्तीची श्रेणी गडकऱ्यानी लावली आहे ती अत्यत निर्दय आहे, अमानुष आहे आणि केवळ स्वत च्या कल्पनेचं समाधान करण्यासाठी गडकऱ्यानी ती केली आहे असं वाटेल; पण मला स्वत ला याचं वेगळं विश्लेषण करावसं वाटतं. खरोखरीच जगामध्ये ढोगी, मतलबी आणि मीडिऑकर लोकाचा फार त्रास होतच असतो आणि त्याच्याबद्दल काय करायचे असा एक फार मोठा अगतिकतेचा प्रश्न बुद्धिमान लोकाना पडत असतो. हे लोक आपल्याला सहनशील म्हणतात, काहीही म्हणतात; परतु आपल्याला हे कळत असतं की, हे आपल्याला वापरत आहेत. आपल्याला एक्स्प्लॉइट् (exploit) करताहेत हे नेहमीच जगात घडते. The mediocre always exploit the excellent. They always hate the excellent, and that's why they also exploit the excellent to their own advantage. आणि याच्यासाठी मग वेगवेगळी तत्त्वज्ञानं तयार केली जातात. मग आम्ही काय कमी आहोत ? वगैरे. आता हे जे सगळे आहे ते सहन करायचे असते. याचा सूड उगवता येत नाही. काही माणसं फटकळ असतात, ती फटकळपणानं हा सूड उगवतात; पण तो योग्य मार्ग नव्हे असा असहिष्णुतेनं हा सूड उगवण्यापेक्षा गडकरी ब्लॅक ह्यूमरनं हा सूड उगवतात आणि हा मार्ग अधिक चागला वाटतो. अशा तऱ्हेचा मार्ग अत्यंत बुद्धिमत्ता असल्याखेरीज कोणाला साधणार नाही आणि इथे गडकऱ्याचे व्यक्तिमत्त्व आपल्याला समजावून घ्यायला लागेल.

गडकरी पदवीधर नव्हते. त्यामुळे त्याचा उपहास होत होता. गडकऱ्याच्या करिअरची सुरुवात किर्लोस्कर नाटक मडळीत डोअर-कीपर म्हणून झाली आहे हे लक्षात घ्या ! त्यामुळे गडकऱ्याना ते अव्वल दर्जाचे बुद्धिमान असूनसुद्धा, त्या काळच्या ढोगी धेंडाकडून किती अवहेलना सहन करावी लागली असेल याची आपल्याला कल्पना करता येईल आणि आपण पाहतो, असे लोकच वरच्या श्रेणीवर जाऊन बसतात आणि जे खरे बुद्धिमान–दत्तू बादेकरांसारखे असतात, समाधानाची गोष्ट म्हणजे, या व्याख्यानमालेत त्यांच्यावर व्याख्यान ठेवल आहे, ते खालच्या दर्जावर जाऊन बसतात. या अन्यायाला काय करायच ? गडकऱ्यांना सारख वाटायचं की, आपल्यासारख्या बुद्धिमान आणि कर्तृत्ववान माणसावर अन्याय झाला आहे. हा जो त्याचा दबलेला superiority चा भाग होता तो काही वेळा उदात्त रूपान तर काही वेळा विखाररूपानं बाहेर पडत असे. त्याच्या अनेक विनोदी लेखामध्ये विखाराचे असे फूत्कार आहेत की, जर ते ॲसिडचे बिंदू आपल्या अगावर पडले तर कपडेच नव्हे तर आतली कातडीसुद्धा जळावी आणि हीच गडकऱ्याची इच्छा आहे. यासाठी त्यांनी एक फार थोर असे नाटक लिहिले आहे-'दीड पानी नाटक' अस त्यानी त्याला सबोधलं आहे. त्याच्याकडे मला तुमचं मुद्दाम लक्ष वेधायच आहे किती किती गोष्टीच विडबन त्यानी त्यात केलं आहे आणि त्यातला ढोंगीपणा कसा दाखवला आहे ते पहा.

–'सगीत मूकनायक' याचो सुरुवातच अशी होते. दीड पानी नाटकमाला. त्या वेळेला अशा नाटकमाला निघत असत. हे श्रीपाद कृष्णाच विडंबन आहे अशी कोणाची समजूत होईल म्हणून त्यानी मुद्दाम लिहिलं आहे–भरतवाक्य आधी लिहिलं आहे. 'हे सर्वसाक्षी

भगवान, सर्वमान्य संगीत मूकनायक नाटकाची कुचेष्टा करण्यासाठीच हे लिहिलेलं आहे, असा कोणाचा भलताच गैरसमज मात्र तुझा प्राण गेला तरी होऊ देऊ नकोस !' याच्यामध्ये गडकऱ्यांना कशाचा जळजळीत उपहास करायचा होता? तर संपूर्ण हिंदू परंपरेतल्या जगण्याचाच त्याना उपहास करायचा होता. याचा नायक हा अक्षरश: 'मूकनायक' आहे. हा काहीही बोलत नाही. गडकऱ्याना असं दाखवायचं आहे की, खरोखरीच एखादा मनुष्य जन्माला आला आणि तो काहीही बोलला नाही, म्हणजे तो लोकाचं ऐकत गेला तर तो सुखानं संसार करू शकेल. त्याला स्वत ला काही बोलण्याचं अगर स्वत च्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार करण्याचं काही कारण नाही. आता हे सगळं त्यानी कसं सुरू केलं आहे ते पहा.

—लेखक—दीडशहाणा.

रूढीच्या शिळेचा छापात छापिले. (मनुस्मृतीच्या ॲक्टान्वये.)

या नाटकासंबंधी सर्व हक्क हिंदू समाजासाठी कायमचे राखून ठेवले आहेत.

प्रस्तावना : नाटक हे संसाराचे चित्र आहे.

—आणि मग नाटक सुरू होतं. हे तीन अकी नाटक आहे. त्याचा नायक जो आहे, त्याचे नाव ठेवण्याच्या समारंभापासून ते त्याच्या मृत्यूपर्यंत नाटकाचा कालावधी आहे. यातले काही संवाद मी तुम्हाला मुद्दाम वाचून दाखविणार आहे, ज्याच्यामध्ये गडकऱ्यांची कल्पनाशक्ती आणि त्यांची वृत्ती या दोन्हीचा आविष्कार होतो.

प्रवेश पहिला : संगीत—कुणी गोविंद घ्या, कुणी गोपाळ घ्या.

चाल : हजारो वर्षे चालत आलेली. (खुलासा—ही ओळ 'नाही मी बोलत नाथा' हे जितक्यादा बोलण्याचा प्रघात आहे तितक्यादा प्रेक्षकांना कंटाळा येईपर्यंत म्हणतात.)

विक्रात हे नाव ठेवलं जातं. आता अशा एका माणसाचं चरित्र कसं घडत जातं हे पाहण्यासारखं आहे.

प्रवेश दुसरा :

स्थळ : सरकारी मराठी शाळा.

पात्रे—विक्रातचा बाप, हेडमास्तर आणि हातात लहानशी पाटी घेऊन विक्रात.

विक्रातचा बाप—आपल्या पायावर घातला आहे त्याला आता. जरा लक्ष—

हेडमास्तर—बिगरीत नेऊन बसवा त्याला. (जातो)—(पडदा.)

अशा तऱ्हेने हे प्रवेश होत जातात. त्याचे लग्न होते. लग्नानंतरचा एक प्रवेश पाहण्यासारखा आहे.

प्रवेश दुसरा.

स्थळ : विक्रातच्या घरातील एक खोली.

पात्रे : विक्रात, वय १७.

खोलीच्या बाहेर जरा कुजबुज. थोडा वेळ गेल्यावर बाहेरून कोणी तरी ढकललेली सरोजिनी प्रवेश करते.

सरोजिनी : मुळूमुळू रडते.

विक्रात : गोंधळून जातो. — (पडदा).

या प्रवेशातील उपरोध स्पष्ट करण्याची आवश्यकता नाही. याचा संबंध शेवटच्या प्रवेशाशी आहे.

अंक ३.

प्रवेश तिसरा.

स्थळ : मसणवटी

पात्रे : ताटीवर बांधलेला विक्रात, इतर मंडळी.

इतर मंडळी सरण पेटवतात.

मंडळी नं. १ : चला झाले, सपला त्याचा नि आमचा ऋणानुबंध!

मंडळी नं. २ : एक चागला मनुष्य गेला ! कोणाच्या अध्यात ना मध्यात. कधी कडवट नाही की, ठकठक नाही उभ्या जन्मात याच्या हातून कोणी काही नावे ठेवण्यासारखे झाले नाही — तेवढ्या आठ मुलांखेरीज !

आता गडकऱ्याची जी शब्दकळा आहे, त्याच्यासाठी आधीचा प्रवेश आता नतर वाचतो —

अंक २.

प्रवेश पहिला.

स्थळ : दिपोटीचे कार्यालय

पात्रे : विक्रात, दिपोटी.

दिपोटी विक्रांतची परीक्षा घेत आहेत.

दिपोटी : वादीवासची लढाई कधी झाली ?

विक्रात : बुचकळ्यात पडतो.

दि. : काळीचा वसूल करण्याची अकबराची रीत काय होती ?

वि. : काळा पडतो.

दि. : छट्टू कधी मेला ?

वि. : त्याला मेल्यापरिस मेल्यासारखे होते.

दि. : पेशवाई बुडवल्याचे खापर कोणाच्या माथी फुटते ?

वि. : डोके खाजवतो.

दि. : पिवळा समुद्र कुठे आहे ?

वि. : समुद्रात बुडाल्याप्रमाणे गुदमरतो.

दि. : पाणलोट कशाला म्हणतात ?

वि. : डोळ्यातून घळघळा पाण्याचे लोट वाहू लागतात

दि. : (काही लिहीत) आपल्या जागेवर जाऊन बसा !

विक्रात मटकन खाली बसतो.

विक्रातचा बाप : (हेडमास्तरास एकीकडे) काय झाल ?

हेडमास्तर : (हळूच) नापास !

विक्रातचा बाप : हन् दळभद्र्या ! (पडदा).

हे दीड पानी नाटक वाचताना वाटत की, खरोखरच जीवनावर आणि विशेषत: hierarchy मध्ये बदिस्त झालेल्या आपल्या जीवनावर इतक्या कमी शब्दात इतकी कठोर टीका दुसऱ्या कोणी केली नसेल ! तेव्हा हा जो सबंध गच्च बसवलेला समाज आहे, त्यातल्या एका माणसाचं काय होतं हे गडकऱ्यानी मूकनाट्य दाखवून चागल्या प्रकारे दाखवलंय; पण हे वाक्यच शेळपट झालं. गडकऱ्यांच्या विनोदाला शोभेल असं वाक्य मला उच्चारता येईल, असं मला वाटत नाही. याच कारण त्यांच्या विनोदाच जर वर्णन करायच असेल तर पुन्हा एकदा गडकऱ्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या विशेषत्वाकडे वळावं लागेल.

गडकऱ्यासारख्या 'ब्लॅक ह्यूमर'ची (विखारी विनोदाची) आयुष्यात गरज काय आणि त्याचे स्थान काय ? विनोद हा कशा-

साठी असावा ? आपण म्हणतो, विनोद हा खुलवण्यासाठी असावा; पण विनोद हा दुखवण्यासाठीदेखील असावा, हे जर आपण मान्य केलं तर गडकऱ्याच्या विनोदाचं महत्त्व आपल्या लक्षात येईल. पु. लं.नी विनोदाबद्दल असे म्हटले आहे, व्हावी तर गुळगुळीत, पण रक्ताचा ओरखडा निघू नये. गडकरी त्याच्याही पुढे जाणारे आहेत म्हणजे ते बाहेर रक्त काढत नाहीत; पण ते रक्ताचा अत स्राव करतात अशा तऱ्हेचे ते विनोदी लेखक आहेत आणि असे–गंभीरपणे काय किंवा विनोदी पद्धतीने काय, अंत.स्राव करणारे लेखक विरळाच ! आपल्या मेंदूमध्येच रक्तस्राव व्हायला लागतो, तो होतोय हे आपल्याला कळत, त्याच ठिबकणं आपल्याला जाणवतं आणि तरीही आपल्याला हेही कळतं, याला पर्याय नाही ! आता हे का ? याला कारण अस आहे की, आपली जेवढी बुद्धिशक्ती असते, तिची जी तीव्रता असते, त्या तीव्रतेने आपण जगतच नाही गडकऱ्यांच्या सर्व नाटकातल्या पात्राचे विश्लेषण करून मला हा मुद्दा स्पष्ट करता येईल की, गडकऱ्यानी आपल्या नाटकात अशी पात्रे घातली आहेत की, जी पात्रे अत्यत उत्कटतेने, टोकाला जाऊन जगण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि हा प्रयत्न का आहे ? तर आपल्याला आपल्या मनाप्रमाणे, उत्कटतेने जगता येत नाही.

तुम्ही आपापल्या मनात डोकावून पहा तुमच्यापैकी कोणी जर मला सागितलं की, 'हो. मी लहानपणापासून मला हवं तितक्या उत्कटतेने जगत आलो आहे,' तर मला त्याचा हेवा वाटेल; पण आपला असा स्वानभव आहे, आपल्याला वाटतं तितक्या खरेपणान आपल्याला जगता येत नाही आपल्याला सौजन्याचंही अनेक वेळा नाटक करावं लागतं. पुढे पुढे ते आपल्या अंगी मुरतंसुद्धा. मग त्या नाटकाला आपण उदात्तता वगैरे म्हणायला लागतो; परंतु मनाचं तसं नसत लहानपणी आपण ज्या उत्स्फूर्ततेन जगत असतो ती पुढे कमी होते आणि त्याच दु ख आपल्याला जाणवत असतं. मात्र त्या दुःखाचं करायचं काय हे मात्र आपल्याला समजत नसतं. 'सवेची उसने फेडावे' हे आपल्याला जमत नाही मनातल्या मनात आपण गुदमरत राहतो आणि मग अनेकाना B. P. चा विकार जडतो. पुरुषापेक्षा स्त्रियांना हा अनुभव जास्त येतो. कारण' परिस्थितीचं बधन असत. त्यापेक्षा आपल्या सभ्यतेचं बधन आपल्याभोवती जास्त असतं. हा जो सगळा खोटेपणा आपण स्वतःशी करत असतो, त्याची गडकऱ्यांना फार चीड होती. मला वाटत प्रत्येक थोर लेखकाला ती असते. आपण खोटेपणा का करायचा ? आपण कुणासाठी जगतो ? लोकासाठी जगतो ? आणि त्यासाठी स्वत शी खोटेपणा- करतो ? हा जो काही मूलभूत प्रश्न आहे, त्याचं गडकऱ्यानी स्वत पुरत उत्तर दिल होतं की, काय वाटेल ते होवो, माझी सार्वजनिक प्रतिष्ठा गेली उडत; पण मी अशी स्वतःची कुचबणा कधीही सहन करणार नाही ! आणि जन्मभर त्यानी ती सहन केली नाही–प्रत्यक्षात केली नाही आणि लेखनातही केली नाही. म्हणून गडकऱ्याच्या लेखनात आपल्याला हा दुर्मिळ विशेष दिसतो की, अनेक मराठी लेखक जी सार्वजनिक सभ्यता आपल्या लेखनात पाळतात, तीव्रता व्यक्त करतानासुद्धा जी सभ्यता पाळतात, ती गडकरी पाळत नाहीत. आता हे चागलं म्हणावं किंवा वाईट म्हणावं; पण त्यामुळं गडकऱ्याच्या वाङ्मयामध्ये एक फार चागला गुण निर्माण झाला आहे आपल्या मनातला स्वत वर रागावलेला जो माणूस असतो, त्याला सरळ स्पर्श करण्याचं सामर्थ्य गडकऱ्याच्या वाङ्मयात आलं आहे

घन श्याम हे व्यक्तिमत्त्व पाहत असताना अनेकाना असं वाटून गेलं असणार की, त्याच्यासारखा मी कदाचित वागणार नाही; पण त्याची व्यथा मी समजू शकतो. कारण ती माझी स्वत.ची व्यथा आहे. घन श्याम आपली व्यथा किती काव्यमयतेने मांडतो पहा. तो म्हणतो, 'देशमुख, तुमच्याही आईवडिलाचा पत्ता नव्हता आणि माझ्याही नाही; पण सुदैवानं तुम्हाला घुडीराजासारखा पालक मिळाला आणि मला मिळाला नाही. म्हणून मला वार लावून, श्रम करीत असं मोठं व्हावं लागलं. तुम्ही आयते मोठे झालात !' आता ही व्यथा आपल्यापैकी प्रत्येकाच्या मनात असते की, मीच माझ्यावर सर्वांत मोठा अन्याय केला आहे आपण स्वत. आपल्यावर जेवढा अन्याय करतो किंवा दुसऱ्याला करू देतो तेवढा दुसरा आपण होऊन कधीही करत नाही. या अन्यायानं गांजलेले जे लोक असतात, त्याच्या मनाच्या गाजलेल्या भागाला गडकरी बरोबर स्पर्श करतात. गडकऱ्यांच्या समग्र वाङ्मयात हा वेगळेपणा आहे. विखारी मोठेपणा आहे तो त्याच्या विनोदातही आहे. गडकऱ्याच्या विनोदात असलेल्या क्रूरपणाला, त्याच्यात सौजन्य किंवा सहृदयता नाही म्हणून दूषणं द्यावी असं मला वाटत नाही. अतिशय. दुर्मिळ, लखलखीत, जळजळीत, तेजस्वी असा क्रूरपणा गडकऱ्यानी प्रामाणिकपणे जपलेला आहे आणि या क्रूरपणाचा आलेला आस्वाद त्याच्या विनोदातून आपण घेऊ शकतो, एवढंच फक्त मला शेवटी सागायचं आहे. □

**(शब्दांकन : सौ. शलाका सोमण)**


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावसं वाटल्याशिवाय राहणार नाही.

—डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

# भटकंती उत्तराखंडाची : पृष्ठ ९ वरून

घेण्यास नकार दिला. पहाडातले हे अडाणी लोक जातील कुठे? दोन-चार दिवसांत झक मारत शरण येतील अशी व्यापाऱ्याची अटकळ होती; पण समितीने थेट दिल्ली-मुबईपर्यंत माल नेऊन लोकांच्या मालाला चागला भाव दिला.

## अस्मानी सुलतानी !

आजूबाजूच्या जंगलात असंख्य उद्योग चालले होते; पण जंगल शेजारी असले तरी वन-खात्याचे संबंधित यमनियमच असे होते की; मोठ्या ठेकेदारांशिवाय इतरांच्या आवाक्याबाहेरचे हे उद्योग होते; पण आता यशाबरोबर हिंमत थोडी-थोडी वाढत होती. मजुरी-कामाच्या मर्यादा ओळखून वन-संपत्तीवर आधारित कुटीरोद्योग सुरू करण्याचे समितीने ठरविले. 'दशौली ग्राम स्वराज्य संघा'ची स्थापना करून चीडवृक्षाच्या राळेपासून टर्पेंटाइन बनविणाऱ्या छोटया प्रकल्पाची तयारी सुरू झाली. पैशाची चणचण 'खादी ग्रामोद्योग मंडळा'ने आर्थिक सहाय्य पुरवून दूर केली. चामोली जिल्ह्यातील गोपेश्वरबरोबर इतरही सात ठिकाणी छोटे प्रकल्प उभारायचे ठरले. या प्रकल्पांची जुळवाजुळवी चालू असतानाच १९७० साली अलकनंदेने पुराचा जबरदस्त तडाखा हाणला. पुराच्या लोंढ्यात २१ पूल, ३० बसेस, शेकडो एकर शेत-जमीन आणि गुरं-ढोरं वाहून गेली ! गंगा-कालव्याचा १० कि. मी. लांबीचा मार्ग गाळाने भरून गेला. रुद्र-निसर्गाच्याच कुशीत राहणाऱ्या पहाडी लोकांना आपत्ती नवीन नव्हत्या; पण त्यांची वाढती गति आणि व्याप्ती स्तंभित करणारी होती. नेहमीच्याच सरकारी धोपट-मार्गाने आपदग्रस्तांचे पुनर्वसन चालू होते. आपत्तीची 'ढग-फुटी' (cloud burst) वृष्टी आदि कारणमीमासाही होत होती. तुफान पर्जन्यवृष्टी तर झाली होतीच; परंतु अलकनंदेच्या पाणलोट-क्षेत्रातील (Catchment Area) खेड्यापर्यंत मदत पोहोचविणाऱ्या संघाच्या कार्यकर्त्यांना मात्र या 'अस्मानी' आपत्तीचा वेगळाच अर्थ जाणवू लागला होता. पाणलोट-क्षेत्रातील गौहना-तलाव भागात गेली काही वर्षे बेसुमार जंगल-तोड होत असल्याचे त्यांनी पाहिले होते. आता जास्ती विचार करायला वेळ नव्हता. हाती घेतलेल्या प्रकल्पाचे काम सुरू करायचे होते. कार्यकर्त्यांनी उत्साहाने कामाला सुरुवात केली; पण कुटीरोद्योगाना प्रोत्साहन देण्याची तारस्वराने घोषणा करणाऱ्या सरकारच्या वन-खात्याने वेगळेच धोरण अवलंबिले. आठपैकी पाचच प्रकल्पाना, तोही अपुरा कच्चा-माल (राळ) वन-खात्याने उपलब्ध करून दिला. इतकेच नाही तर बरेलीच्या 'इंडियन रेझिन अॅन्ड टर्पेंटाइन फॅक्टरी' या बड्या कंपनीपेक्षा दर क्विंटलला पन्नास रुपये जास्त दराने घ्यायला लावला. वन-खात्याच्या या अन्याय्य धोरणाविरुद्ध सहाजिकच असंतोष निर्माण झाला. अर्ज-विनंत्यांनी दाद लागेना म्हणून सत्याग्रह-मोर्चांना सुरुवात झाली; पण याने चिडून जाऊन वन-खात्याने आणखी एक दणका हाणला !

'दशौली ग्राम स्वराज्य संघा'चा लाकडी सामान बनविण्याचा एक छोटा कारखाना होता. 'अंगु-वृक्षा' पासून (Ash-tree) शेतीची अवजारे तिथे बनविली जात; परंतु 'पर्यावरण रक्षणा'ची सबब सांगून वन-खात्याने अंगु-वृक्षाचा ठराविक पुरवठा करण्यास नकार दिला. लोकाच्या विनंत्याना न जुमानता 'पाहिजे असेल तर चीडचे लाकूड वापरा' म्हणून वर फर्मावले. 'मायबाप सरकारचा' हा हुकूम ऐकून नांगराचे बैलही फक्कन् हसले असतील ! वजनाने हलके; पण अतिशय मजबूत असे अंगु-वृक्षाचे लाकूड पहाडी लोक पिढ्यान् पिढ्या शेतीच्या अवजारासाठी वापरत होते; पण सामान्य शेतकऱ्यांच्या प्राथमिक गरजाची माहिती वा पर्वा नसलेले अधिकारी आपल्याच गुर्मीत होते. लोकांची न्याय्य मागणी त्यानी झिडकारून टाकलीच, वर आणखी जखमेवर मीठ म्हणून तेच अंगु-वृक्ष अलाहाबादच्या 'सायमन अॅन्ड कंपनी' या खेळाचे सामान बनविणाऱ्या कंपनीला विकून टाकली. वन-खात्याच्या या दुटप्पी धोरणाने लोक हबकूनच गेले. या धडधडीत अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे जरुरीचे होते; पण कसा ? मागील 'राळ-किमती'च्या प्रकरणातील अर्ज-विनंत्या-शिष्टमंडळे-आश्वासने याचा घोळ अजून चालूच होता. त्यातून प्रत्यक्ष पदरात काहीच पडत नव्हते. आता तर झाड तोडायचा परवाना घेऊन कंपनीचे एजट गोपेश्वराच्या वाटेवर रवाना झाल्याचीही खबर येऊन धडकली होती.

गोपेश्वर या छोटया गावी (मार्च १९७२ मध्ये, आता तिथे चामोली जिल्ह्याचे मुख्य ठाणे आहे. मूळची तीनशे घराची वस्ती दूर कोपऱ्यात ढकलली जाऊन, खाजगी-सरकारी इमारतीचे इमलेच्या इमले उठले आहेत !) लॉज वा निवासाची इतर काही सोय नसल्याने सायमन कंपनीचे एजंट संघाच्या अतिथिगृहात रहाण्याची विनंती घेऊन आले. सर्वोदयी तत्त्वाला जागून कार्यकर्त्यांनीही त्यांना दिलदारपणे निवारा दिला. बाहेरून कंपनीचे मजूरही येण्यास सुरुवात झाली इकडे लोकाच्या समांवर सभा सुरू होत्या; पण अन्यायाची तातडीने दाद मागण्याचा मार्ग कोणालाच सुचत नव्हता. 'कंपनीच्या नोकरांना आपण जंगलात जाण्यास प्रतिबंध करू या, लाकूड नेणाऱ्या लॉऱ्यापुढे आडवे पडू या, त्या लोकाच्या अगोदर जगलात जाऊन सर्व झाडे कापून आणू या, झाडे जाळून टाकू या...' प्रत्येकजण आपल्या परीने मार्ग सुचवत होता; पण 'झाडे नष्ट करणे नव्हे, तर त्याचे रक्षण करणे हा आपला उद्देश आहे. आपल्याला नेहमीसाठी त्याची गरज पडणार आहे...' चंडीप्रसाद सर्वांना समजावणीच्या सुरात सागत होता; पण या समजावणीपलीकडे त्यालाही काही सुचत नव्हते. इतक्यात एक कल्पना लखकन् चमकून गेली. भावनावेगाने तो म्हणाला, 'आपली विनती ठोकरून हे लोक जर झाड कापायला आले, तर वाघापासून बचाव करण्यासाठी आई जशी पोराला कवेत घेते, तसे कुऱ्हाडीपासून वाचविण्यासाठी आपणही झाडाला 'चिपकून' बसू या ! 'हम पेडोको 'चिपक' जायेंगे !' सर्व सभा भारावून ऐकतच राहिली. सामान्यातल्या सामान्य माणसालाही समजेल-उमजेल आणि शक्य होईल अशी ही नामी आयडिया वाऱ्या-

सारखी भिरभिरत आजूबाजूच्या गावातून पसरली. मात्र कंपनीच्या एजंटांच्या व संबंधित अधिकाऱ्यांच्या कानी जेव्हा हा शब्द पडला, तेव्हा ते पोट धर–धरून हसले !

हसणाऱ्यांचे लौकरच डोळे उघडले. पहाडी माणसांच्या मनोमनी जाऊन भिडलेली ही कल्पना साकार–रूप धारण करू लागली. २७ मार्च १९७३ रोजी झाड तोडायला कंपनीचे मजूर जेव्हा मंडलच्या जंगलात पोहोचले, तेव्हा शेकडो लोक आपल्या प्राणांची बाजी लावून झाडाच्या रक्षणार्थ धावून आलेले दिसले. कुऱ्हाडी म्यान करून कंपनीचा नोकरवर्ग निमूटपणे माघारी फिरला. मंडलचा विक्री-करार रद्द झाला. त्याऐवजी फाटा जगलातील वृक्षांचा करार झाला; पण तिथेही तोच प्रकार ! सरधोपट निदर्शनाना धोपट मार्गानेच उत्तर देणाऱ्या सरकारी यंत्रणेची मति या अहिंसक पण बिनतोड निदर्शनापुढे चालेना. मग यंत्रणेने शक्तीपेक्षा युक्तीचा वापर करण्याचे ठरविले. 'दशौली ग्राम स्वराज्यसघा'शी सौद्याचा घाट घातला. कंपनीला दहा झाडे तर सघाला एक झाड, पासून समसमान झाडापर्यंत मधाचे बोट लावले; पण सघाच्या छोट्या आर्थिक मागण्यांतून सुरू झालेल्या आंदोलनाने आता तात्कालिक लाभापलीकडे जाऊन वन–संपत्तीवरील स्थानिक माणसाच्या प्राथमिक हक्कापासून ते पर्यावरणाच्या जाणिवेपर्यंत व्यापक स्वरूप धारण केले होते.

टेहरी–गढवालचे सहाय्यक अरण्यपाल श्री. श्रीवास्तवजीशी चर्चा करताना सहाजिकच या सर्व इतिहासाची उजळणी झाली; पण आता अगुवृक्षाच्या घटनेला खूप वर्षे लोटली होती. शिवाय ती घटना दूरच्या चमोली जिल्ह्यातील, त्यामुळे त्याच्या तपशिलाला महत्त्व नव्हते; पण सरकारची एकूण वन–नीती, वन–खात्याची कार्यपद्धती, त्याबद्दल असलेले समज–गैरसमज याबद्दल आमचे बोलणे निघाले होते. सुरुवातीला औपचारिक आणि शासकीय चौकटीतून बोलणाऱ्या श्रीवास्तवजीनी आमच्या हेतूच्या प्रामाणिकपणाची खात्री पटल्यावर आमच्याशी मनमोकळ्या गप्पा मारल्या होत्या कसलाही 'साहेबी' भपका नसलेला हा माणूस करड्या वन–अमलदारापेक्षा एखाद्या मवाळ प्राध्यापकासारखा भासला होता !

उत्तराखंडाच्या पहाडी प्रदेशाचे एकूण क्षेत्रफळ ४३,००० चौ. कि. मी. आहे. त्यापैकी २७,००० चौ. कि. मी. भाग जंगलाने व्यापलेला असून बाकीच्या भागात शेती आहे. या जंगलापैकी फक्त १७,००० चौ. कि. मी. जंगल वन–खात्याच्या अखत्याराखाली असून, बाकीचे १०,००० चौ. कि. मी. जंगल 'सिव्हिल–स्वयम–पचायती वन' आहे. वन–खात्याकडील जंगलापैकी ९८०० चौ. कि मी. जंगल संरक्षित–वन (Reserved Forest) असून, उरलेले उत्पादक–वन (Productive Forest) आहे. संरक्षित वनामध्ये फक्त पुनर्वाढीच्या अथवा सुदृढ वृक्षाना वाव देणाऱ्या दृष्टीनेच तोड होते. उत्पादक–वनातील तोडही अतिशय 'शास्त्रशुद्ध रीतीने आखलेल्या 'कार्य–योजने' प्रमाणे (Working–plans) होते. आपल्या म्हणण्याला आकडेवारीचा आधार देत श्रीवास्तवजींनी कैफियत माडली : 'अहो, आज जी जंगलं साफ झालेली दिसतात ती प्रामुख्याने ही 'सिव्हिल, स्वयम, पंचायती वनं' आहेत. अनेकांना यातील फरक माहीत नसतो व ते उगाच आमच्याच नावाने ओरड करत असतात. एक तर वाढत्या लोकसंख्येच्या दबावाखाली ही जंगलं साफ झाली आणि मुख्यत: जंगलाबद्दल कसलेही ज्ञान-आस्था नसलेल्या महसूल-यंत्रणेच्या ताब्यात ही जंगले होती. त्याचा व्हावयाचा तो परिणाम झालाच. आता आम्ही या ओसाड भागाचे वनीकरण करण्यासाठी खास वन-विभाग उघडले आहेत. जंगलाच्या नुकसानीबद्दल केवळ आम्हालाच दोषी ठरविणारे लोक रस्ते-बाधणी, धरणे, उद्योग-धंदे, शेती, गुरचराई इत्यादि कारणांमुळे किती जंगल साफ झाले याबद्दल चकार शब्दही काढत नाहीत. वन-मजुरीमुळे चाळीस हजार स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होतो व जगलातून निघणाऱ्या ३,५०,००० घनमीटर लाकूडफाट्यापैकी, सुमारे ५०,००० घनमीटर लाकूड-फाटा स्थानिक लोकानाच हक-हकूक (वन-अधिकार) च्या स्वरूपात पुरविला जातो हेही ते पद्धतशीरपणे विसरतात. हिमालयात देशभरचे यात्रेकरू येतात, त्यांना सरपणाची जरुरी असते. एकट्या बद्रिनाथमंदिराचा भोग पकविण्यासाठी मे-नोव्हेंबरपर्यंत एक हजार क्विटल जळाऊ लाकूड लागते. कुठून आणणार आम्ही ही लाकडे ? जंगल तोडूनच ना ?'

तुम्ही म्हणता त्याप्रमाणे तुमची धोरणे-कार्ययोजना इतक्या संवेदनाशील शास्त्रशुद्ध असताना मग लोकात एवढा असंतोष का निर्माण झाला ? –आम्ही.

आमचे कर्तव्य व लोकाचे हितसंबंध यात अंगभूत विरोध आहे. शिवाय काही लोक आपले पुढारीपण मिरविण्यासाठी त्याचा पद्धतशीर फायदा घेत असतात. –श्रीवास्तवजी.

पण 'चिपको' आंदोलनाने स्थानिक माणसाच्या अडचणीची, वन-मजुरांच्या हलाखीची परिस्थिती प्रकर्षाने पुढे आली, असं तुमच्याच कागद-पत्रात लिहिले आहे... –आम्ही.

तेवढी गोष्ट त्यांनी चागली केली. आमच्या सहकार्याने अजूनही किती तरी चागल्या गोष्टी त्यांना करता येतील. आम्हालाही खूप करावेसे वाटते; पण आमचे हात बाधलेले असतात. अनेक दडपणे येत असतात तुम्ही चाद्याच्या जंगलात राहिला आहात. तुम्हाला याची कल्पना असेलच .. –श्रीवास्तवजी.

गृहस्थ तळमळीने बोलत होता बोलण्यात सराईत उडवाउडवी अथवा छापेबाजपणा नव्हता. अजून खूप प्रश्न विचारायचे होते; पण त्याना दौऱ्यावर निघायची घाई दिसत होती. मन.पूर्वक आभार मानून निरोप घेता-घेता सहज म्हटल–

'श्रीवास्तवजी, असं म्हणतात प्रत्येक प्रश्नाच्या तीन बाजू असतात. एक याची, एक त्याची आणि एक खरी .'

'आणि चौथी पत्रकाराची !' माझे वाक्य पुरे व्हायच्या आतच त्यांनी मस्तपैकी टोमणा हाणला ! गृहस्थ खरोखरच पूर्वाश्रमी प्राध्यापक होता की काय !!

¤

५ मार्चला सकाळी-सकाळी डेहराडूनला रामराम ठोकला. आता प्रथम ऋषिकेश. तिथे पथकाची विभागणी होणार. दोन गट भागीरथीच्या खोऱ्यात तर उरलेले तीन अलकनदेच्या आसमंतात. भागीरथीचे खोरे प्रामुख्याने श्री. सुदरलाल बहुगुणाचे कार्यक्षेत्र. तिथे जाणाऱ्या गटाना घेऊन जाणारे कार्यकर्ते आले होतेच. श्री. चंडीप्रसादजीच्या कार्यकर्त्यांचा मात्र अजूनपर्यंत पत्ता नव्हता. निरोप

नव्हता. त्यामुळे अलकनंदेची तुकडी घेऊन मीच गोपेश्वर गाठणार होतो. दोन बसेसची व्यवस्था झाली. सामानाची-साथीदारांची विभागणी झाली. आता दहा दिवस फाटाफूट निरोपा-निरोपी झाली. फिर मिलेंगेचे वादे झाले. जंगल बचाव ऽ मानव बचावाचे नारे झाले. बसेस् निघाल्या. आपापल्या वाटेने. आता पुढची मुशाफिरी हिमालयकी गोदमें. एक अनामिक हुरहूर मनात दाटून आली.

ऋषिकेशचे मैदान ओलांडून बस हळूहळू पहाड चढायला लागली. डावीकडे पहाड, उजवीकडे गंगा. बालपणीच्या मैत्रिणीसारखी क्षणोक्षणी दूर सरकणारी. गंगातीरीचे असंख्य आश्रम आणि मंदिरे मागे पडत होती. गीता मंदीर, हरेकृष्ण मंदीर, स्वर्गाश्रम, लक्ष्मणझुला—कंडक्टर आपल्या परीने माहिती पुरवीत होता. मला यातले काही नवीन नव्हते. सगळंच पाहिलं होतं असही नाही; पण गंगा मात्र नवीन होती. प्रत्येक क्षणी नवीन भासली होती. प्रत्येक वेळी नवीन भेटली होती. अनेक रूपं. अल्लड-अवखळ-थकलेली-भागलेली-निळी-सावळी आणि मळलेली सुद्धा. पण प्रवाही. कारण प्रवाही !


देवप्रयागला भागीरथी—अलकनंदेचा संगम आहे. १९७८ सालच्या दुर्घटनेतून अजूनही भागीरथी सावरलेली नाही. भागीरथीचे गढूळ पाणी आणि अलकनंदेच्या निळ्याशार पाण्याचा संगम म्हणजे अपने मन की गंगा का जिवंत साक्षात्कार. मनातील सत्-असत्च्या संगमाचे अप्रतिम रूपक !

## अपने मन की गंगा

देवप्रयागच्या संगमाचे सुख मात्र आमच्यातील अनेकांना लाभले नाही. ऋषिकेश सोडल्यापासून बसने ज्या गिरक्या घ्यायला सुरुवात केली त्या 'गिरकी घेऊन ऽ गिरकी घेऊन' काही संपेचना. अंतापर्यंत ते संपणारही नव्हते. पुढच्या प्रवासाची ही तर फक्त झलक होती पहिल्या अर्ध्या तासातच गाणारी निम्मी तोडं बंद झाली आणि निसर्ग-सौंदर्य बघण्याचे निमित्त करून मंडळी खिडकीबाहेर माना काढून 'बकाबक' करू लागली. ओकारीची लागण प्लेगपेक्षाही फास्ट असावी. एकाने 'आ' वासला की दुसऱ्याने तंबोरा लावलाच. तरी नशीब ही बस जरा ऐस-पैस होती आणि आत गर्दी नव्हती. माणसांनी खचाखच भरलेली आणि अस्मान ठेंगणं झालेल्या 'पर्वतीय यातायात निगमा'ची (व्वा, काय फिट्ट नाव आहे ! या हिंदीतले किती तरी अनर्थ मराठीत फिट्ट बसतात. उदाहरणार्थ सरकारी लॉटरीचे 'राजकीय लॉटरी, सरकारी पशु-चिकित्सागृहाचे, राजकीय-पशु चिकित्सागृह' (वा, हे तर दोन्हीकडे फिट्ट !) अर्थात आपल्याकडेही 'सरकारी मुली'ची वसतिगृहे असतातच. असू देत. असो.) बस पाहिजे होती. निसर्ग-सौंदर्यात आरपार चिंब व्हायला झालं असतं. आताही विन-ओकारीच्या गोळ्या खाल्लेले साथीदार अजगरासारखे सुस्तावलेले होते आणि ओक ऽ ओक ओकणारे मनापासून ओकत होते. मात्र ओकारीसारखी सच्ची आणि अंतर्बाह्य गोष्ट दुनियेत दुसरी कोणती नसेल ! त्यातून 'ओली' संपून 'सुकी' सुरू झाली की परमानंदम्. शिवाय ओकारी ओळखीचा-पाळखीचा ओळखत नाही. नित्य नेमाने घाटदार प्रवास करणारे भले-भलेही कधी ना कधी 'निसर्ग-सौंदर्य' लुटताना मी पाहिले आहेत. मी स्वत:ही लुटले आहे. बसच्या असल्या या धकाधकीत आचार्य हरिभाऊ पुरोहित मात्र पूर्णपणे शाबूत होते. भगवान रजनीशाच्या या चेल्याने प्रवासाच्या सुरुवातीलाच भक्तगणांना, काय खावे-काय प्यावे, किती खावे-किती प्यावे ( बहुधा चहा-पाणीच ! ) याचा गुरुमंत्र दिला होता. भगवानाची आज्ञा मोडणाऱ्या नाठाळाची मात्र हे तितक्याच दयाबुद्धीने वास्त-पुस्त करत होते. लिंबू सुपारीची चिरीमिरी अथवा फुटाण्याचा तोबरा देत होते. हरिभाऊंच्या सेवाकार्याने असेल अथवा प्रवासाचा पहिला धक्का ( आणि पोटातील अन्न ) ओसरल्यामुळे असेल मंडळी थोडी सावरली आणि सुस्तावलेले काहीजण सोडले तर बसमध्ये परत एकवार चैतन्य पसरले. निसर्ग आणि सौंदर्य दोन्ही जाणवू लागले !

मार्च सुरू झाला होता. आसमंतात ऋतु वसत बहरायला पाहिजे होता. आरुची गुलाबी स्वप्न उमलायला पाहिजे होती. बुरांझच्या लाल परीने खुणवायला हवे होते. चुलु—पुलमचे लाल—सफेद गालीचे उलगडायला पाहिजे होते. फ्योतीची पिवळी—धम्मक फुलं लगडायला हवी होती; पण कुदरतची मिजास बिघडली होती. शिशिराची थंडी संपली नव्हती एवढेच काय तर वर्षाऋतूची भैरवीच अजून सुरू होती; पण कुदरतने मिजास धरायची नाही तर कोणी ? आणि मिजास बिघडली तरी ती कुदरतच. तिचे बिघडणेही सुंदर असते, हवेहवेसे असते. ढगा—धुक्यात हरवणारी दऱ्या—खोरी म्हणजे आधीच एक जीवघेणे प्रकरण. त्यातून हिमालयाच्या अथागतेची गहिरी धार, बर्फाचे भस्म फासलेले उत्तुंग पहाड आणि खोलवर अलकनंदेच्या निळाईची हलकी किनार. बरखावहारचा शिडकावा. कधी मुलायम तर कधी जीव ओतून मुन्नाने जुन्या—जुन्या गझलांचा ठाव घेतलेला तर कुसुम निवलेल्या डोळ्यांनी स्वत:शीच गुणगुणत होती', 'हिमालय असा डोळे भरून पहाण्याची खूप खूप वर्षांची आस होती. असं स्वप्न जगण्यासाठीच निसर्गाजवळ यायच असत आणि अशी स्वप्न जगण्यासाठीच निसर्गाला समजून वागायचं असतं.'

आसमंतात हिरवी—पोपटी शेतं डुलत होती. मात्र काही तुरळक भाग सोडला तर नजरेच्या टप्प्यात भरदार जंगल अभावानेच येत होतं. मला उत्तराखंडातला पहिला प्रवास आठवला आम्ही टेहरीकडे निघालो होतो. हृषिकेशचे मैदान पार झाल्यावर सृष्टिशोभा बघायला आम्ही सरसावून बसलो होतो. सुरुवातीला बऱ्यापैकी झाडी होती. 'वृक्षारोपण कार्य महान, एक वृक्ष दस पुत्र समान' पासून 'देशकी धरती करे पुकार, बच्चे कम हो पेड हजार' पर्यंत वन-खात्याने लावलेल्या पाट्याही जागोजाग अंकुरल्या होत्या. तोपर्यंत सर्व काही सुजलाम्—सुफलाम् वाटत होते; परंतु चंबा ओलांडले मात्र; दुतर्फा बोडक्या डोंगराची कतार सुरू झाली होती. हे असले बोडके डोंगर, त्यातून डोकावणारे निवडुंगाचे भेसूर फणे आणि जीव घुसमटून टाकणारी कुंद हवा याने मनाला भयंकर उदासी आली होती. हिमालयातील जंगल—तोडीच्या समस्येची माहिती घ्यायलाच आम्ही गेलो होतो; पण त्याची झलक सुरुवातीपासून आणि इतक्या मोठ्या प्रमाणावर मिळेल याची कल्पना नव्हती. एखाद्या सुकेशीने बॉबकट काय बॉयकट केल्याचेही समजू शकते; पण सफाचट मुंडन म्हणजे हद्द झाली ! सर्वांत दु:खाची गोष्ट म्हणजे तिच्या इच्छेविरुद्ध जबरदस्तीने झालेले हे मुंडण होते ! पूर्वीच्या काळातील एखाद्या अभागी विधवेसारखं !



गोपेश्वरच्या वाटेवर रुद्रप्रयाग लागते. जिम कॉर्बेटने खतरनाक चित्त्याला खतम केले ती जागा रस्त्याच्या जवळच आहे. हा हकीकत एका फलकावर चितारून ठेवली आहे. पण आता अंधार पडत आला होता. दिवसभरचा प्रवास करून रात्री गोपेश्वर गाठले. श्री. चंडीप्रसादजींना बघताच एकदम हायसं वाटलं. कारण 'दशौली ग्राम–स्वराज्य संघा' चे कार्यकर्ते डेहराडूनला न आल्याने शंका–कुशंकांची पाल मनात उगाचच चुकचुकत होती; पण निरोपाचा काही तरी घोटाळा झाला होता. आमची वाट पहात ते तिथेच थांबणार होते. बाकी काही नव्हतं. संघाच्या अथितिगृहात आमची व्यवस्था होती. आमची सुमारे तीस जणांची सेना. त्यामानाने अथितिगृह छोटेखानी. अगदी साधे; पण संघाच्या जवान कार्यकर्त्यांनी काही उणे पडू दिले नाही. जमेल तेवढी गरम कपडयांची सोय केली. जवळच्या हॉटेलात जाऊन चार घास खाल्ले आणि जीव गोठवणाऱ्या थंडीत एकदाचे अंथरूण गाठले. मग झोपही गिरक्या–गिरक्यांनी चढत गेली !

गोपेश्वर तिबेटच्या सरहद्दीवरील चामोली जिल्ह्याचे मुख्य ठाणे. बद्रीनाथ–केदारनाथांची प्रसिद्ध मंदिरे चामोली जिल्ह्यातीलच. जिल्ह्याचे मुख्यालय प्रथम ऋषिकेश–जोशीमठ या राजमार्गावरील चामोलीलाच होते; पण १९७० साली अलकनंदेने पुराचा तडाखा हाणला आणि धोक्याची टांगती तलवार टाळण्यासाठी मुख्यालय जवळच्या पहाडातील गोपेश्वरला हलवावे लागले. आद्यगोपेश्वरचा जीव लहानसाच. डोंगरउतरणीवर विखुरलेले मूळ गाव आणि सरकारी गाव यांचा मेळ अजूनही बसलेला नाही. मूळ गाव अजून बुजूनच आहे. उलट 'सरकारी गावा'मुळे गावकऱ्यांपुढे चारा–पाणी–सरपणाचे गंभीर प्रश्न उभे केले आहेत.

गोपेश्वरचा दिवस पावसाच्या धुंवाधार धारांनीच उजाडला. मोसम फार खराब होता. तो सुधारण्याची सुतराम चिन्हेही जाणवत नव्हती. रेडिओवरच्या बातम्यातही हिमालयात मुसळधार वृष्टी झाल्याची आणि आणखी होण्याची शक्यता वर्तविली होती. (कुठे ऽ कुठे पावसाच्या तुरळक ऽ तुरळक सरी पडतील वगैरे नाही तर चांगल्या मुसळधार) सतराशेसाठ ठिकाणी कडे कोसळले होते. माणसं दगावली होती. आनंद आहे. म्हणजे आता सगळ्यांच्या घरच्या मंडळींना घोर. आता हिमालय एवढा ऐस–पैस. कुठे तरी कडे कोसळणारच ! काही माणसं मरणारच ! शेवटी ज्याचा त्याचा नियतीशी संकेत ठरलेला असतोच; पण हे तत्त्वज्ञान नंतरचे. आपला माणूस असला की, त्या क्षणाला घोर लागतोच. मी एवढा आडमाप भटकतो; पण कधी नव्हे ते एकदा गीता महाबळेश्वरला गेल्यावर जरा उशीर झाल्याबरोबर पाचगणीच्या घाटात मनाच्या सगळ्या मोटारींचे ब्रेक्स् फेल झाले. टायर पंक्चर झाले ! अर्थात याला इलाज नसतो आणि करण्यासारखं काही नसतं. शेवटी करण्यासाठी हातात काही तरी घ्यावं आणि थंडी–पावसानं गारठलेल्या साथीदारांना जरा खुलवावं म्हणून मी आणि कुसुमने लोकगीतांचा कोरस मांडला. 'या दांड्यावरून नवरा कुणाचा येतो' पासून 'डोंगरी शेत माझं ग' पर्यंत. बघता बघता फेर मोठा झाला. संघाचे जवान कार्यकर्तेही जल्घोषात सामील झाले. शेवटी छप्पर कोसळेल म्हणून घाबरून खालचा दुकानदार वरती आला तेव्हा आमचा दंगा थांबला ! दंगा थांबला; पण हवा तो परिणाम नेमका साधून गेला. मरगळ-विरगळ पार पळाली ! चंडीप्रसादजीही एवढ्यात आले. चिपको आंदोलनाच्या विचाराची रुजवात या इथेच झालेली. प्रणेते चंडीप्रसादजीच. साहजिकच सर्वजण त्यांच्याकडून माहिती घेण्यास उत्सुक होते. आमचा सर्वांचा परिचय करून घेतल्यावर आणि आपल्या साथीदारांचा करून दिल्यावर त्यांनी आपल्या संथ-धीम्या आवाजात बोलायला सुरुवात केली.

## चंडीप्रसाद–एक ठाय लयीतील माणूस

चंडीप्रसाद एक ठाय लयीतला माणूस आहे. धीमे-धीमे भिनतो. मी इतके वेळा त्याना भेटलो आहे; पण प्रत्येक वेळेस सुरुवातीला एक अनोखं संकोचीपण–बुजरेपण अनुभवाला येतं. पहिल्या भेटीची गंमत आठवते. मी प्रथम सिल्याराला सुंदरलालजीना भेटून आलो होतो. सुदरलालजीची वेगळी तऱ्हा. गेल्या-गेल्या ते आपला ताबा घेतात. श्री. बाबा आमटयासारखा. बाबांचा आक्रमक, तर सुदरलालजीचा आर्जवी; पण शेवटी ताबाच! विचार-कल्पना-अनुभवाच्या माऱ्याखाली आपल्या डोक्याचे छप्परच काही काळ हरवून जाते. हा ताजा अनुभव घेऊन मी चंडीप्रसादजीना भेटलो होतो. त्यानी प्रेमाने आगत-स्वागत केले; पण बैठक जमवून चार तास झाले तरी जुजबी गोष्टीपलीकडे बोलणे सटकेना. एके काळी सुदरलालजीचाच चेला असलेला हा भला माणूस काही केल्या खुलत नव्हता. म्हणजे तुटकपणा नाही अथवा उसनी अलिप्तताही नाही मला खूप विचारायचं होतं आणि त्यांनाही खूप सांगायचं होतं; पण समोरचा माणूस खुलला नाही, तर मिळते फक्त ढोवळ माहिती. आम्हाला ती नको होती. आंदोलनाच्या इतिहासाबरोबरच आंदोलनातील विविध व्यक्तिमत्त्वाचे, विचार-धारांचे, कार्यपद्धतीचे, गुण-दोषाचे बारकावे समजून घ्यायचे होते; पण परस्पर विश्वासाचा सूर अजून आम्हाला सापडत नव्हता. मी बोलका आहे. थोडा उतावीळही आहे समोरच्या माणसाला बोलतही करू शकतो; पण अशा ठाय लयीतील माणसाना त्याच्या गतीनंच खुलवावं असं थोडं-फार अनुभवलं होतं. सुरुवातीला जरा कठीण जातं; पण एकदा सूर जमले की मैफिल जमून जाते.

आताही तसंच झालं. चंडीप्रसादजीनी आदोलनाचा इतिहास थोडक्यात सागितला. विविध टप्पे वर्णन केले. जय सागितला, पराजय सांगितला. एकाच विलक्षण अलिप्तपणाने! 'मी 'ला पुढे करण्याचा सोस नाही, उगाच लपविण्याचाही आभास नाही. संघातर्फे आसपासच्या गावात चालणाऱ्या कार्याची माहिती दिली. सघातर्फे चीडच्या राळेपासून टर्पेंटाइन बनविण्याचा व शेतीची लाकडी अवजारे बणविण्याचा कारखाना चालविला जातो, त्याची माहिती दिली. कार्यकर्त्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली आणि बैठक जाणवायच्या अगोदरच संपूनही गेली आमच्यातील काहीजणाचं मात्र यावर समाधान नव्हतं. त्यांनी सभाषणाचा धागा पकडून ठेवला. प्रश्नाचं ओझं मोकळं केलं. प्रश्न जरा आडव असले तरी आंदोलन समजून घ्यायला महत्त्वाचे होते. आम्ही मुद्दाम होऊनच एक तेढा प्रश्न टाकला. 'भटजी, तुमच्या ग्रामोद्योगाला हव्या असलेल्या कच्च्या मालाच्या बदल्यात, सरकारने तुमच्या संघाला विकत घेतले आहे, असा काही जणांचा आरोप आहे!'

आमचा रोख माहिती घेण्यावर आहे की, कोणत्या पक्षाची बाजू घेण्यावर, याचा क्षणभर अदाजा घेत, जराही विचलित न होता भटजी म्हणाले, 'विकलेच जायचे होतो, तर आंदोलनाच्या सुरुवातीलाच सरकारने सौदेबाजी सुरू केली होती, तेव्हाच विकले गेलो असतो. थोडया नफ्या–तोटयासाठी आपण विकले जाऊ, अशी भीती ज्याना वाटते, त्यानी खरोखरच या फंदात पडू नये. आत्मविश्वासाचा प्रश्न आहे हा. आम्हाला कोण कशाने विकत घेणार? या जंगलसंपत्तीवर आमचा हक्क आहे आणि हक्काने आम्ही ती घेतो. यात कसली आहे कोणाची मेहेरबानी?' आवाजाची पट्टी जराही चढू न देता, पण धारदार आवाजात चडीप्रसादजी पुढे बोलू लागले वरून साधा-भोळा-गबाळा वाटणारा हा माणूस आतून अग्रुवृक्षासारखा मजबूत आहे, वास्तवाच्या घट्ट पायावर उभा आहे हे जाणवू लागले. 'आज काही लोक आंदोलनाचे पर्यावरणात्मक आणि आर्थिक असे अलग कप्पे करत आहेत; पण ते चूक आहे. आम्ही अडाणी असलो तरी आम्हालाही पर्यावरण थोडे-फार समजते; पण आम्ही ते पुस्तकातून नाही, तर जीवनाच्या रणागणातून शिकलो आहोत. त्यामुळे आम्ही पर्यावरण, आर्थिक प्रश्न, माणूस असे अलग-अलग कप्पे मानत नाही, तर एका अखड चक्राचे ते अविभाज्य घटक आहेत असे मानतो. आमचा निसर्गाशी सबध केवळ भाऊक नाही 'एक पेड दश पुत्र समान' असे पुराणातले दाखले ऐकून मनुष्य एक दिवस माना डोलवेल; पण म... ...तील भूक त्याला स्वस्थ बसू देणार नाही. म्हणूनच आर्थिक प्रक्रियेतूनच माणसाचा निसगाशी सबंध जोडला पाहिजे. मूल जसं आपल्या आईचं दूध पितं, रक्त शोषत नाही, त्याचप्रमाणे एका मर्यादेत वन–संपत्तीचा उपयोग करून घेणाऱ्या छोटया–छोटया उद्योगाचा आम्ही आग्रह धरतो. निसर्ग आणि पहाडी माणूस दोघांच्याही आवाक्यातले हे उद्योग आहेत. या प्रक्रियेत परस्पर प्रेम वाढीस लागते. सोन्याची अडी देणारी कोंबडीच मारून खाण्याची बुद्धी आमच्या पहाडी लोकाची नाही; पण या संबधाचे सोयर–सुतक नसलेले बाहेरचे ठेकेदार लोक उद्या भगवान् शंकराच्या जटाही उपटून विकतील–'

आम्ही मध्येच त्यांना अडवून म्हटलं, 'ही नुसती झाडे नाहीत, तर आंदोलनाचे खडे शिपाई आहेत!' हिंमत असेल तर कोणी हात लावून दाखवावा!

## व्यक्तिगत गरज आणि सामाजिक हित

'आम्ही बाहेरच्या लोकाच्या कुऱ्हाडी अडवू शकतो; पण खुद्द आमच्या लोकाचेच काय? मी कार्यकर्ता आहे, तसा गृहस्थही आहे. घरात चूल पेटवायला लाकूड नसताना, वन–रक्षणाच्या गोष्टी बायकोला कोणत्या तोडाने सागू? प्रमुख पेच, व्यक्तिगत गरज आणि सामाजिक हित यांच्या गुत्यात आहे. म्हणूनच त्याची सांगड घालणारी, माणसाला निसर्गाशी जोडणारी वन–शेतीसारखी योजना आम्ही वन–खात्याच्या सहकार्याने राबवत आहोत.' सरकारने संघाच्या मागणीनुसार गोपेश्वर गावातील १३३ कुटुबाना प्रत्येकी एक हेक्टर जमीन ९९ वर्षांच्या लीजने दिली आहे. अटी दोनच: तिथे शेती करायची नाही आणि जमीन विकायची नाही. पूर्वीच्या उजाड डोगर–उतारावर दीवारबंदी (दगडी कुंपण) करून, लोकानी आतल्या बाजूस खाद्यचारा–पाणी–सरपण देणारे, 'पंच-जीवनवृक्ष' लावले आहेत. डोळयात प्राण आणून त्याचे रक्षण करीत आहेत; पण स्थानिक लोकानीही शेतीसाठी जंगलाचा नाश केला आहे.

असे हे खडे सैनिक केवळ गोपेश्वराच्या डोगरावरच नाहीत, तर अलकनंदा–ऋषिगंगेच्या सवेदनाशील भागातही सर्वदूर पसरले आहेत. ज्या पाणलोट विभागातील जंगल–तोडीने पुराचा जबर तडाखा बसला, त्याच सवेदनाशील भागात जाऊन संघाचे कार्यकर्त्यांनी विद्यार्थी व खेडुतांच्या सहाय्याने मजनु, अंगु, ओक, भीमल, देवदार

आदींची सुमारे दीड लाख झाडे लावली आहेत. आपल्या परिश्रमांनी निसर्गाचा प्रकोप थांबविण्याचा आत्मविश्वास ते बोलून दाखवत आहेत. विद्यार्थ्यांच्या ' डालियो का दगड्या ' (वृक्ष–मित्र) संघटने-मार्फत गावोगाव वृक्ष–रोपण, वृक्ष–संवर्धनाचे कॅंपस् होत आहेत !

आम्ही आमच्या भटकंतीत या कामाची प्रत्यक्ष ओळख करून घेणारच होतो; पण बोलताना जाणवत होते. आपण केलेले काम फुगवून सांगण्याचा किंवा उगाच त्याचें अवडंबर माजविण्याचा या मंडळींचा खटाटोप दिसला नाही. आपण लावलेल्या झाडांचा प्रकार–यांची गाववार व्यवस्थित नोंद त्यांच्यापाशी आहे. तसेच अति–उत्साह व अज्ञान यामुळे पहिल्या काही वर्षांत बरीच झाडं मेली हे सांगण्याचा प्रांजळ-पणाही आहे. आपली संघटना अजून छोटी आहे, त्यामुळे पुऱ्य उत्तराखंडाची भाषा न करता, अगोदर फक्त चामोली जिल्हा आणि परिसर यापुरतीच आपली ताकद पणाला लावण्याचे भान त्यांना आहे. याबरोबर या विभागात आपल्या संघटनेच्या इच्छेविरुद्ध झाड काय, पण झाडाचे पानही तोडले जाणार नाही याचा जबर विश्वासही आहे. वन–विभागाला आज या भागात कुठेही कटाई करायची असेल तर पहिल्या प्रथम ते ' ग्राम स्वराज्य संघाला' त्याचा तपशील कळवतात. संघाचे कार्यकर्ते त्या स्थानाची बारकाईने तपासणी करून आपला अभिप्राय देतात. संघाच्या मताचा कधीही अनादर होत नाही. या व अशा गोष्टींना ' सौदेबाजी ' म्हणून हिणवणाऱ्या लोकांना चंडीप्रसादजी ठणकावून जबाब देतात ' ही कोणाची मेहेरबानी नाही तर आमच्या ताकदीची पावती आहे. एरवी जंगल-तोडीच्या आपल्या कार्य–योजना अत्यंत शास्त्रीय आहेत. अशा गमजा मिरवणारे सरकार, आमच्याकडे परत मत मागायला कशाला आले असते ? शिवाय आमची ताकद निव्वळ उपद्व्यापी नकारात्मक नाही, तर आम्हालाही वनरक्षणविद्येत गति आहे, याचा आमच्या प्रयत्नांतून प्रत्यय आल्याने आज आमच्या शद्बाला मान आहे !'

### पपोडे–घीके या तेलके

आपल्या विरोधकांबद्दल बोलताना त्यांनी एक गमतीदार गोष्ट सांगितली : 'आमच्या शाळेजवळ दोन हॉटेल्स होती. दोन्ही हॉटेल-मालक आवर्जून गिऱ्हाइकांना सांगायचे की दुसऱ्या हॉटेलातले पकोडे तेलातले आहेत. आमचे मात्र शुद्ध तुपातील आहेत !' मग थोडं थांबून हसून ते म्हणाले, 'हमारी हालत कुछ वैसीहि है। मगर सबसे अफसोस की बात यह है कि, हम किसीके पकोडे घी मे बने हुए **नही है।'**

दुपारी जरा उघाड पडल्यावर गावाबाहेर भटकायला गेलो.दोनतीन बोडक्या डोंगरांपैकी, अलीकडच्या डोंगरावर हिरवे हिरवे पुंजके दिसत होते,लोकांची वनशेती याच डोंगरावर आहे.आम्ही गोपेश्वरच्या पहिल्या वारीत पाहिलेला हा प्रयोग निश्चितच जोम धरत आहे. गावच्या एका अंगाला बांझ–बुराँझचे गच्च हिरवे जंगल होते. बुराँझचे एखादं-दुसरे फूल वसंतऋतूची चाहूल देत होते. हे खरे जंगलही बोडके होणार होते, पण गोपेश्वरच्या महिला मंगल- .लाने वाचवले. सर्वार्थाने मंगल असलेल्या या ' मंगल–दलाने ' केवळ जंगलच वाचवले नाही तर गोपेश्वरच्या खाणीतून काढल्या जाणाऱ्या दगडांमुळे भूस्खलन होते हे लक्षात आल्यावर आपले महिला–पहारेकरी नेमून कोसळणारा पहाडही वाचवला आहे. संध्याकाळी संघाचा राळ–कारखाना आणि रोप–वाटिका ( नर्सरी ) पाहिली. वृक्ष–रोपणाच्या प्रयत्नात केवळ सरकारी रोपट्यांवर वा मेहरबानीवर अवलंबून राहू लागायला नको म्हणून उपलब्ध जागेचा जास्तीत जास्त वापर करून चारा–सरपण–फळ देदेणाऱ्या अनेक रुंदपर्णी वृक्षांची रोपटी लावली आहेत, स्वावलंबनाने जगवली आहेत. आत्मविश्वासाचे हे रोपटे मला जास्त लोभसवाणे वाटले विश्वासक वाटले.




तिन्हीसांजेला अथितिगृहात परतलो. जेवायच्या अगोदर प्रार्थना होती. सर्वांना जबरदस्तीने नाही, अपने मर्जीसे। मला प्रार्थना मनापासून आवडतेही आणि नावडतेही. प्रार्थनेसारखे अपूर्ण काही नसते आणि प्रार्थनेसारखे संपूर्णही काही नसते. आपण आपली केलेली विनवणी असते ती.परमेश्वर केवळ देव निमित्त असतो.चंडीप्रसादजींनी म्हटलेली प्रार्थना मला अतोनात आवडते. मीरेचे आर्त भजन असो वा गांधीजींचे 'हे नम्रता के सागर—' असो शद्बांची शांत निरामय निरांजनं तेवतात. सूर दरवळतात. आत कुठे तरी शांत–शांत वाटतं आपण आपल्याला भेटतो.

प्रार्थना संपली की सुरू झाली–ही तर प्रार्थनेची सुरुवात– .उद्यापासून आपली यात्रा अलकनंदेच्या तीरावरून तीन नंबरच्या गटाबरोबर !

(क्रमशः)

## पुस्तके

# मी–पण माझे

### नाजुक विषयाची प्रसन्न मांडणी !

डॉ. सुरेंद्र बारलिंगे तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक आणि सौंदर्यशास्त्राचे पंडित म्हणून प्रसिद्ध आहेत. निवृत्तीचे काळात आणि तेही साहित्य सांस्कृतिमंडळाचे अध्यक्षपद सांभाळीत असता, त्यांनी 'मी-पण माझे' नावाची एक कुतुहलजन्य कादंबरिका लिहावी ही प्रशंसनीय गोष्ट आहे. मंडळाचे अध्यक्ष या नात्याने डॉक्टरसाहेबांच्या वाटचाला अलीकडे बरीच टीका आलेली आहे; पण डॉक्टरांना जे ओळखतात किंवा त्यांच्याशी संवाद करण्याचा ज्यांना योग येतो, त्यांना त्यांच्या विद्वत्तेचा, बहुश्रुततेचा आणि अभिजात रसिकतेचा प्रत्यय खचित येत असतो. डॉक्टरांचं सौंदर्यशास्त्रावरचं एक छोटं पुस्तक यापूर्वी वाचण्याचा मी यत्न केला होता; पण त्याचं आकलन होणं मला कठीण गेलं. खरं तर सौंदर्यशास्त्रावरची मराठीतील सर्वच पुस्तकं सौंदर्यदृष्टी असणाऱ्या रसिक मराठी वाचकाच्या डोक्यावरून जातात. सुंदर ललितकृती ही सौंदर्यशास्त्रविषयक ग्रंथापेक्षा सौंदर्याचा म्हणजेच निखळ आनंदाचा, समाधानाचा अधिक अनुभव देऊन जाते. इतकेच नव्हे तर वाङ्मयाभिरुचीही परिपुष्ट करू शकते असा अनुभव येतो. 'मी–पण माझे' ही डॉ. बारलिंगे यांची प्रौढपरिपक्व अवस्थेतील ललितकृती असा अनुभव वाचकांना देईल असा विश्वास वाटतो.

कादंबरिकेचा विषय मराठीत तरी अनोखा आहे. किंबहुना अनोखा विषय हेच तिचं वैशिष्ट्य, बलस्थान आहे. हा विषय आहे मानवी लिंगपरिवर्तनाचा म्हणजे काहीसा शरीरविज्ञानाचा, तर काहीसा मानसिक व्यथेचा. स्त्रीपुरुषांमधील नैसर्गिक आणि अनैसर्गिक समागम–सुखदुःखं हाही या कादंबरिकेचा एक पोटविषय म्हणता येईल. कुमुदनाथ नावाचा मेडिकल कॉलेजमधील एक मापुक विद्यार्थी, त्याच्या शरीरात आणि मनात उमलू पाहणारी स्त्रीत्वाची लक्षणं, त्या लक्षणांनुसार होणारं त्याचं स्त्रीसुलभ वर्तन, मित्रमैत्रिणी आणि आप्तस्वकीयात वावरताना होणारी त्याची कुचंबणा, दोलायमान अवस्था, शशी नावाच्या मित्रासंगे स्त्रीरूपात त्याने घेतलेला अनैसर्गिक उपभोग, त्या भोगातील असमाधानामुळे भारतीय समाजव्यवस्थेचं कवच फोडून लंडनला जाऊन त्याने करवून घेतलेलं स्वतःचं लिंगपरिवर्तन आणि अखेर ज्याने ऑपरेशन करून त्याला हक्काचं स्त्रीपण दिलं त्या गोऱ्या डॉक्टरशी झालेलं त्याचं सर्वार्थानं मीलन–असं थोडक्यात या कादंबरिकेचं सरळ कथानक आहे आणि ते साधन म्हणून वापरून डॉ. बारलिंगे यांनी आपल्या विषयाचं 'विणकाम' केलं आहे. अर्थात प्रसंगांचे व आठवणींचे धागेदोरे विणून.

या विणकामाचे सर्व धागे बारलिंगेच लिहितात त्याप्रमाणे अनुभवाचे आहेत. म्हणजे त्यांच्या पाहण्यात कागदपत्रांच्या आधारे जी केस आली तीच त्यांनी 'मी-पण माझे'त उलगडून, आपल्या विषयाला व्यथेचं रूप देऊन एक दीर्घ कथा आत्मनिवेदनपद्धतीने कथन केली आहे. गोदीचा गोंद्या झाल्याची कथा आपल्या देशात नवीन नाही. वृत्तपत्रांतून अशा वार्ता केव्हा तरी वाचायला मिळतात. डॉ. बारलिंगे यांची कथा गोदेचा म्हणून वावरणाऱ्या एका तरुण गोदीची आहे. स्वातंत्र्योत्तर अशा भौतिक प्रगतीच्या काळातली आहे. दिल्ली, ग्वाल्हेर, कुलुमनाली, लंडन, जिनिव्हा अशा पूर्व–पश्चिम विस्तीर्ण भागात ती घडते त्यामुळे साहजिकच अप्रगतप्रगत अशा दोन समाजवर्तुळातून ती गति घेते आणि अखेर पाश्चात्य संस्कृती ही नैसर्गिक सुखांना अधिक सामोरी जाणारी धीट, मुक्त संस्कृती आहे या निष्कर्षाप्रत ती येऊन पोचते. हा निष्कर्ष चुकीचा की बरोबर हे वाचकांनी ठरवायचे आहे.

डॉ. बारलिंगे यांनी एक नाजुक आणि अनोखा विषय–संयमाने, सूचकतेने आणि अभिजात रसिकतेने हाताळला याबद्दल प्रथम त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. कुमुदनाथ, कुमुद, काश्मिरा आणि सुमान स्टीव्ह–या चार बदलत्या अवस्थांतून आपल्या विषयाचं त्यांनी जे विणकाम केलं आहे त्यात गुंतागुंत किंवा कलाकुसर अशी नाहीच. कुमुदनाथाचं स्त्रीत रुपांतर होताना आणि स्त्री म्हणून त्याने जे सुखःदुख भोगलं त्याचं वर्णन करताना लेखकाने कुठेही भडक रंग वापरले नाहीत. साधी आणि सरळ निवेदनशैली असूनही तीत एक प्रकारची अभिरुची आहे. या कादंबरिकेतील पौराणिक कथांचे संदर्भ आणि शरीरविज्ञानविषयक काही पारिभाषिक इंग्रजी शब्द धावत्या शैलीत अगदी सहज खपून जातात. काही सौंदर्यस्थळांचा उल्लेख इथे आवर्जून करावासा वाटतो. उदाहरणार्थ–स्त्रीविषयक लक्षणांचे उल्लेख, स्वप्नातील प्रणयप्रसंग, धुक्यातून दिसणाऱ्या बालकाचे वत्सल दृश्य, सुकलेल्या वेणीच्या आठवणी, पेशंटची नाडी तपासताना आलेला अनुभव, शशीकडून मातृत्वाची अपेक्षा करताना आवळे–चिंचा खाण्याची होणारी वासना, बोटीने युरोपच्या केलेल्या सफरीतील मौजा, लिंगपरिवर्तन करणाऱ्या ऑपरेशनचे वेळी स्ट्रेचरच्या जागी दिसणारी शृंगारलेली गाडी, चर्चमधील विवाहसोहळा आणि डॉ. स्टीव्हबरोबरचं मधुमीलन–हे सारे प्रसंग सहजसुंदरपणे चित्रित झालेले आहेत. स्त्रीला स्त्री म्हणून जगण्यात, स्त्री म्हणूनच उपभोग घेण्यात, मातृत्व लाभण्यात तिचं मी–पण आहे आणि ते नाकारण्यात तिची व्यथा आहे–असं सांगणारी ही सुंदर भावनिक आणि तितकीच वैचारिक कथा आहे. लहान आकाराची, पण मोठ्या आशयाची, नाजुक अवघड विषयाची. साधीसुधी धावत्या शैलीतली, पण वाङ्मयीन आणि देहशास्त्रविषयक संदर्भाच्या चपखल उल्लेखांमुळे प्रसन्न वाटणारी.

कादंबरिका वाचून दोनतीन शंका मात्र उद्भवल्या. कुमुदनाथला स्त्रीत्वाची जी जाणीव तरुणपणी होत जाते तिच्या मुळाशी, आईच्या गर्भारपणी मुलीची वासना होणे हे कारण संभवते काय ? पृ. ४९ वर कुमुदच्या आईचे तोंडी मुलगीच व्हावी अशी कांक्षा प्रकट झालेली आहे म्हणून ही एक शंका. कुमुदनाथला मेडिकलमध्ये गेल्यावर, म्हणजे विशीनंतर एकाएकी स्त्रीत्वाची बाधा होऊ

लागते. चौदाव्या-पंधराव्या वर्षी त्याच्यातील स्त्री जागी कशी होत नाही ? कुमुदकडून शशी जे अनैसर्गिक सुख घेतो ते अपरिहार्य म्हणून, सवय म्हणून की त्या मार्गेच सुख अधिक मिळतं म्हणून ? समजा ऑपरेशनद्वारे लिंगपरिवर्तन करून आल्यावर कुमुद भेटती तर शशी नैसर्गिक सुखाकडे वळला नसताच का ? या कादंबरिकेची नायिका वैद्यककोर्सची छात्र आहे व ती पदवी प्राप्त करून घेते हे एकदा ध्यानी घेतलं की, तिची व्यथा स्वाभाविक वाटते की काहीशी कृत्रिम? वैद्यकी पेशाऐवजी अन्य स्तरातील नायिकेची योजना होती तर या कादंबरीची खोली अधिक वाढली असती वैज्ञानिक प्रगतीच्या व लोकशाही समाजवादी जीवनपद्धतीच्या काळात दिल्ली विद्यापीठातील एका छात्राचे नशिबी एवढी कुचबणा येईल का ? लिंगपरिवर्तन करून एक विवाहित स्त्री विद्यापीठाकडे सर्टिफिकेटवर नाव बदलून मागते व विद्यापीठ ठाम नकार देते–हा डॉ. बार्लिंगे याचा अपवादभूत अनुभव असेल, पण गॅझेटद्वारा नाव बदलून घेता येते व ते घेतल्यावर दोन्ही नावे लिहून व्यवसाय करता येतो. तेव्हा शेवटचा धक्का आणि विशेषत. शेवटचे पत्र–ही दोन्ही या कादंबरीला लागलेली बाडगुळे वाटतात पृ. ११० वरच नैसर्गिक कामपूर्तीवरच्या अनुभवानतर कादंबरी संपते. संपायला हवी; पण सपत नाही.

—म. श्री. दीक्षित

**मी–पण माझे**
लेखक–सुरेंद्र बार्लिंगे
श्रीविद्या प्रकाशन
किंमत : १५ रुपये

---

# फिनिक्स

## मेमरी–लेनमधून जाताना....

मागे वळून पाहण्यात एक प्रकारची गंमत असते. मेमरी–लेनमधील वागा अगदी इंद्रधनुष्याच्या रंगानी उठून दिसतात. आपल्या चका आपल्याला कळायला लागतात. इतरांच्या चकाबद्दल व आपल्या चुकाबद्दलही आपल्याला गमत वाटते. अशी कळत-नकळत मेमरी–लेनला एक प्रकारची विनोदाची झालर बसू लागते

चोवीस वर्षे ग्रथालय चालवल्यानंतर अशा अनेक बऱ्या-वाईट आठवणीची भाऊगर्दी होते आणि मग वाईट आठवणी तितक्या वाईटही वाटत नाहीत व सुखद आठवणी तेवढ्या धुद करणाऱ्याही वाटत नाहीत. यालाच मग इंडियन समर म्हटले जाते. शात व गहिऱ्या स्मृतीचे पटल. त्याच पडद्यावर मग आत्मचरित्र लिहिली जातात.

आमच्या ग्रंथालयाच एक वैशिष्टच म्हणजे कुणीही पुस्तके खराब केली तर ते आम्ही खपवून घेत नाही. कधीकधी डॉक्टर्स, एक्झिक्युटिव्हज्, मॅनेजर्स, बिल्डर्स, कॉन्ट्रॅक्टर्स अशा मोठमोठ्या लोकाशी संपर्क येतो. हे लक्षात ठेवायला हवं की, पुष्कळ वेळा प्रकाशझोतात येण्याच्या आधी नाव फार वाईट असतं आपल्या तत्त्वाला धरून ठेवणं व लोकाना पटवून देणं ही एक ब्रिक–बाय–ब्रिक बाब असते.

अशाच एका डॉक्टरनी आमचं एक पुस्तक थोडंसं खराब केलं. माणूस जर खरोखर पुस्तकप्रेमी असेल व त्याच्या हातून पुस्तक खराब झालं असेल तर ग्रंथपालाला त्याच्या अपराधी भावनेची लगेच चाहूल लागते; पण असल्या वेळी प्रसग फार बाका असतो. शेजारी चार-पाच वाचक उभे असतात. त्यातली एखादी सुदर स्त्रीही असू शकते ! डॉक्टरसाहेबाचं दापत्य आत शिरलं. एकदा पुस्तक माझ्या ॲसिस्टंटच्या हातात देऊ केलं. दुसऱ्यादा मला देऊ केलं वाचकाने खराब केलेलं पुस्तक अर्थात् शेवटी असतं हे मला माहीत होतं

आता आमच्या मदतनीस सौ. गोखलेंना व मला वाचकानी पुस्तक हातात दिलं की एक प्रकारची हाताची रिफ्लेक्स ॲक्शन सुरू होते. अगदी नकळत. आधी पुस्तकाच्या मज्जारज्जूवरून तर्जनी फिरवायची, मग पुस्तकाच्या मागे-पुढे जलद बोट फिरवायची, आगठ्याने पाने भरभर खाली येऊ द्यायची, पुस्तक मग आडवं बघायचं, तिडवं बघायचं! ( एकदा एक वाचक हताश होऊन बोलून उठला होता, ' मायक्रोस्कोप आणून देऊ का ? ' ) मला शेवटचे पुस्तक थोडे खराब झाल्याचे आढळल्यावर ते कुणी आणलं त्याची मनात नोद करून बाजूला ठेवून दिलं. मला डॉक्टरमहाशयांची सवय माहीत होती. लावून येत असत. मग निवड आरामशीर होत असे ! मला वाटलं गर्दी कमी झाली की सागू. या जगात इगोइतकं काहीच उत्तुंग नसतं !

लोखंड गरम असतानाच घाव घालायचे असतात, तसंच पुस्तक खराब झालं तर वाचकानी ते परत केल्यावर लगेच त्याच वेळेला सांगायच असतं. आपण जर ते नंतर वाचकाच्या निदर्शनास आणून देण्याचं ठरवलं तर एक तर वाचक यावावतीत कबूल होणार नाही. दुसरं म्हणजे समजा तो वाचक दहा-बारा दिवसानी आला तर खराब झालेल्या पुस्तकातील नेमका पाननबर व कधी कधी खुद्द खराब झालेलं पुस्तक परत सापडणं अवघड असतं. शिवाय Time is the greatest healer या उक्तीनुसार तेवढ्या दिवसानंतर ग्रथपालाचं दु:ख व उद्वेगही कमी होण्याची शक्यता असते !

त्या दिवशी सर्वच वाचक अगदी आरामशीर निवड करत होते. डॉक्टरसाहेबांची शेवटी निवड झाली. कदाचित् त्याना वाटलं असेल की खराब झालेलं ते पुस्तक माझ्या नजरेतून सुटलं असेल. तरीपण प्रिकॉशन म्हणून की काय त्यानी निवडलेली पुस्तकं फटकन् आपल्या पत्नीच्या हातात ठेवली व ते पटकन् पायरी उतरून खाली थांबले. मला त्यांना खराब झालेल्या पुस्तकाबद्दल एकही शब्द सांगण्याची संधीच मिळाली नाही. म्हणून मला त्यांच्या मिसेसनाच सागणं भाग पडलं मी त्यांच्या बायकोशी बोलत आहे हे पाहून डॉक्टरसाहेब परत आत आले. मग मी त्यानाही खराब झालेलं पुस्तक दाखवलं. मिडलक्लासमध्ये क्युरॉसिटी फार असते. जवळच एक सुंदर आणि देखणी स्त्री उभी होती ! तिला या सर्व प्रकरणात एकदम रस लागला व पुढे काय होते यासाठी डॉक्टर, त्याची बायको व माझ्याकडे ती आळीपाळीने बघायला लागली अर्थात् तिचे हात पुस्तकाच्या शेल्फला लागले होते व नजर आमच्याकडे. मी पण काय करू ? आत्ताची वेळ सरली की नंतर काहीच करता येण्यासारखं नव्हतं. म्हणून आमची थोडीशी वादावादी सुरू झाली. पुस्तक आधीच खराब असेल तर आमचं इनिशियल तिथं असतं असं मी डॉक्टरसाहे-

## ४ लाख ६३ हजार वाचकांची एकमुखी प्रशंसा




लेखक : वि. ग. कानिटकर

चौथी
डिलक्स
आवृत्ती

॥ पृष्ठसंख्या ५४० ॥ मोठा डबल क्राउन आकार ॥ भरपूर छायाचित्रे ॥

॥ मूळ किं. १४० रु. ॥ सवलतीत ९५ रु. ॥

चौथ्या डिलक्स आवृत्तीचे खास आकर्षण

# माइन काम्फ

या हिटलरच्या दुर्मिळ आत्मचरित्राची सचित्र ओळख

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

बाना सांगितलं. डॉक्टरसाहेब काही केल्या कबूल होईनात. आपल्या हातून पुस्तक खराब झाल म्हणजे आपण शिक (Chic) व पॉलिश्ड दिसावं अशी अर्थात् शहरातील बहुतेक लोकांची इच्छा असते. डॉक्टर त्या देखण्या स्त्रीकडे मध्येच एखादी चोरटी नजर टाकत होते असं माझ्या ध्यानात आलं. ती स्त्री अगदी किंचित् मोनालिसाटाइप हसत होती. माझ्या डोक्यात थोडा प्रकाश पडला व मी डॉक्टरसाहेबाना माझ्या छोट्या केबिनमध्ये बोलू असे सुचवले. आम्ही वर चढलो. डॉक्टरसाहेब खुर्चीवर बसले व त्यांनी हळूच एक सुस्कारा सोडला, "मिस्टर पोंडा, यू आर इपॉसिबल. झालं असेल थोडसं पुस्तक खराब. त्याला काय एवढं महत्त्व द्यायचं? मी तुम्हाला हात जोडतो!" असं म्हणून त्यांनी मला एक तोबा–टाइप, कोपरापासून नमस्कार केला! त्या सुंदर देखण्या स्त्रीने जर वेळीच पाय काढता घेतला असता तर आमच्यापुढे असा फेस–सेव्हिंग प्रश्न उपस्थित झाला नसता! त्या दिवसानंतर डॉक्टरसाहेब माझ्याशी अगदीच तुटकपणे वागले. त्याना जर पुस्तकाबद्दल काही माहिती हवी असेल तर नेटाने ते माझ्या ॲसिस्टंटलाच विचारीत आणि अर्थात् बऱ्याच वेळा ती दुभाष्यासारखी मलाच विचारते. मग मीही तिलाच माहिती देतो! इतकं नाव झालं व नाव इतक खराब झाल म्हणून अनेक वेळा मला कॉझ्मिक कैकाड्यासारख वाटतं! पण रिफाइन्ड कैकाड्याची कोण दखल घेतो?

*एक मस्तपैकी माणूस पूर्वी आमच्या ग्रंथा*लयात येत असे. फेस सेव्हिंगचा अजिबात प्रॉब्लेम नसलेला त्यांच्या डोक्यावर नेहमी एक टोपी सटोडियासारखी (शेअरबाजारात लिया–दिया करणारा दलाल) वाकडी घातलेली असायची. सतत पान आणि तंबाखू खाऊन दात अगदी तपकिरी झालेले हाफकोट व तलम धोतर, असा त्यांचा पोषाख चेहऱ्यावर नेहमीच एक सारं-असच घडणार अस एक हास्य! पुस्तकाचे भारी शौकीन! पूर्वी हाफ कोटाची डावी बाजू थोडीशी पुढे ओढून उजवा हात खिशात घालून, "किती देऊ?" असे विचारत. असे बरेच लोक भेटत असत. हे जोगळेकरसाहेब त्यातलेच एक. वाचनासाठी माझ्यापुढे त्यानी कैक वेळा असे खिशात हात घालून मला पैसे दिले होते. इतके का झाले? *वर्गणी कशाला वाढवली?* असं त्यांनी सात-आठ वर्षांत कधीच विचारलं नाही. ते जवळजवळ सात वर्षं आमचे मेंबर होते. अगदी त्यांना कॅन्सरनं नेलं तोवर! बऱ्याच वेळा ते पुस्तकावर चर्चा करत. त्याच्या घरीही शेकडो पुस्तकं होती. आमच कलेक्शन बघायला या असा अनेक वेळा त्यांनी मला आग्रह केला होता. मी ते बघूनही आलो होतो. रहाणी अगदी साधी. घरी कुशन नसलेलं लाकडी फर्निचर. घरात धड उजेडही फारसा नव्हता; पण पुस्तकांची अगदी तीन–चार कपाटं भरलेली! काही क्राफ्ट पेपरच्या कव्हरमध्ये तर काही ठोकळेबाज बाईंडिंगमधे, तर काहींच्यावर शाईने टायटल लिहिलेले. या साध्या माणसाने पुस्तकात येवढा पैसा टाकला हे बघून मला त्याच्याविषयी फार आदर वाटे.

ते वर्गणीच्या पुस्तकाखेरीज पुष्कळ वेळा जादा पैसे भरून आणखी पुस्तके व मासिके आमचे ग्रंथालयातून नेत असत. एकदा त्यांना जादा हवं असलेलं पुस्तक मी दुसऱ्या वाचकासाठी राखून ठेवले होते. त्यांनी पुस्तक मागितले तेव्हा मी त्याना तसे सांगितले. आमची बंद होण्याची वेळ होती म्हणजे आठ वाजले होते. त्याना गुरुवारी सकाळी मुंबईला जायचं होतं. जोगळेकर म्हणाले, 'मी तुमच पुस्तक निश्चित उद्या परत करीन. तुमच्या दाराला जी टपाल टाकण्याची फट आहे ना? त्यातून मी पुस्तक हळूच बुधवारी खाली सोडीन. कप्पी किंवा खोबणी नसली तरी तेवढ्याच सफाईने सोडीन!' समोरचा माणूस बघून गोष्टी बोलायच्या व करायच्या असतात. मी त्याच्या विनंतीला लगेच मान्यता दिली; पण त्याना थोड सावध केलं. 'जरा सांभाळून हे करा, बर का? समोरच्या लोकांनी कुणी पाहिलं तर आपल्याला डोक्याने थोडा औट वगैरे म्हणायचे. ..' त्याचं उत्तर म्हणून त्यांनी हे अस–घडणारच अस त्याच नेहमीच हास्य केल व ते पुस्तक घेऊन मार्गस्थ झाले.

ग्रंथालयाच दार बंद करताना मी एकटाच होतो जिथ त्याच पुस्तक खाली पडणार होत तिथं मी माझ्या बसण्याच्या खुर्चीच कुशन ठेवून मीही मार्गस्थ झालो

गुरुवारी दार उघडलं तेव्हा अर्थात कुशनवर दोरीसकट पुस्तक पडलेल होतं! काही दिवसानी त्यांची भेट झाली तेव्हा हम भी कुछ कम नही असे दाखवायला मी कुशन खाली कसे ठेवले होते ते सांगितले. त्याच लिमिटेड व नेहमीचं हास्य किंचितच रुंदावलं. 'मासिकाला अशी पुस्तकासारखी ट्रीटमेंट देऊ नका म्हणजे झालं!' असं ते जाता जाता म्हणाले.

एका हिंस्र श्वापदाने त्याच्या सावजाला मानगुटीत पकडून फरपटत न्यावं तसं नियतीनं या माणसाला छळलं! ते कॅन्सरने गेले. काही महिन्यांनी त्यांची बायको कॅन्सरने गेली. एकुलता एक मुलगा होता त्याची डिरेलमेंट झाली. बांधलेल्या घरावर अनेक प्रकारचे हक्क व हितसंबंध सांगितले गेले. अगदी तमाम लोकांस जाहीर करण्यात येते की इथपासून! मध्यमवर्गीयांचे दुःख काही खरं नसतं. आपणच निर्माण केलेलं असतं, आयुष्यभर कुरवाळण्यासाठी. विचारा हवं असलं तर अवचटाना!

तेही एक कॉझ्मिक कैकाडी होते; परंतु कॉझ्मिक कैकाड्यांना अवचटही नाहीत व मनेही नाहीत!

आमच्या ग्रंथालयात एक मोठे कागदाचे व्यापारी सभासद आहेत. ते बहुतेक नोकराकरवी पुस्तक किंवा मासिक बदलतात. त्यान काय हवं असतं त्याची यादी नेहमीच कागदाच्या एका अगदी बारीक चिटोऱ्यावर असते. एकदा तर त्यांनी कहर केला! त्यानी कागदाच्या बारीक पाकिटाच्या झडपेवर पाच–सहा पुस्तकं-मासिकांची यादी पाठवली. असं केल्यामुळं आम्हाला अक्षर ओळखणं कठीण होत असे. त्या दिवशी माझा ताबा सुटला. मी तो कागदाचा फ्लॅप अगदी वर धरून नोकराला म्हटलं, 'तुमचे मालक कागदाचे व्यापारी आहेत ना? मग थोड्या मोठ्या कागदावर का लिहीत नाही.' या वेळी ग्रंथालयात इतर अनेक वाचक उभे होते सर्वांनाच हसू आलं. तो नोकर पण हसायला लागला; परंतु मालकाकडे जाऊन त्याने ही हकीकत सांगितली असावी काही दिवसानी मालक आले तेव्हा त्यानी हा विषय उकरून काढला. 'चार लोकाच्या समोर असं बोलू नये. त्या दिवशी तुमचे सभासद उभे होते त्यापैकी एकानं आमच्या नोकराला ओळखलं मि. पोंडा, तुम्ही फोन का घेत नाही? असल्या गोष्टी निवांतपणे फोनवर सांगितलेल्या बऱ्या. माझा नंबर आहेच की तुमच्याकडे!'

—जे. एन. पोंडा

—फिनिक्स लायब्ररी, पुणे

हे प्रचंड बांधकाम बघून डोळे दिपून गेले. मनात आले माओने पण आपले मनुष्यबळ वापरून रशियन तंत्रज्ञांना अशक्य वाटणाऱ्या गोष्टी विलक्षण झपाट्याने करून दाखविल्या होत्या; पण त्याने धरणे आणि कालवे बांधले. आपणही हे मनुष्यबळ वापरून राजस्थानचा कालवा पुरा करू शकलो असतो...

■

१०–१५ वर्षांची कोवळी पोरे शेकडो फूट उंचीवरच्या घुमटाकार छताला सुशोभित करावयास वर चढताहेत. कारण कोणतेच यंत्र ते काम करू शकत नाही. पाय घसरून ही मुले आमच्या नजरेसमोर नारळाप्रमाणे खालच्या जमिनीवर फुटताहेत. साडेतीन हजार रुपयांची प्रचंड रक्कम त्यांच्या नातेवाईकांना देऊन त्यांचे हिशेब मिटवले जाताहेत. याच जमिनीवर काही महिन्यांनी चीनी–जपानी कसरतपटू आम्हाला आपले कर्तृत्व दाखवतील. मेलेली मनेसुद्धा बंड करून उठतात...

■

गर फरदौस बर रूए जमी अस्त
हमी अस्त हमी अस्त हमी हस्त

जमिनीवरचा स्वर्ग असलाच तर इथेच असेल असे ठामपणे सांगणारा लाल किल्ल्यातील हा शेर इंद्रप्रस्थ स्टेडिअमवर शोभून दिसेल.

■

या कसरतपटूंनी साऱ्या दिल्लीला वेड लावलंय. श्वास रोधून आणि काळजाचा ठोका चुकवत प्रत्येकजण त्यांची करामत पाहतोय. म्हाताऱ्या बिजींदरवर यावेळी कोण विश्वास ठेवणार ? सत्तर वर्षांचा हा डोंबारी साऱ्या दिल्लीकरांना ओरडून सांगतोय, अरे माझे डोके फुटेल, पण यातील प्रत्येक कसरत या वयात मी करून दाखवीन. या उड्या आमच्या रक्तात भरल्यात. फक्त चार वर्षे आम्हा शंभर डोंबाऱ्यांची जेवणाची काळजी घ्या. यातील प्रत्येक पदक माझ्या बिरादरीचे असेल...

■

हे सरदारजी धमाल लोक आहेत. ते स्वतःचे तरी बारा वाजवतील; नाहीतर एशियाडचे तरी....साऱ्या दिल्लीवर त्यांचा केवढा प्रचंड ताण आहे.

■

आरंभ, शुभारंभ ते सांगता–समारंभापर्यंतच्या काळात राजधानी दिल्लीत कोणकोणती नाटके घडली ?

सामान्य माणसाने बावचळून जावे, अस्वस्थ व्हावे अशा अनेक घटना एक वर्षाच्या काळात घडत गेल्या.

**डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर** सादर करीत आहेत या घटनांचे काही तुकडे

# सात आंधळे आणि एक अप्पू

**माणूस पुढील अंकात एक विशेष लेख**

**आकर्षक मुखपृष्ठ । अधिक पृष्ठसंख्या । किंमत नेहमीचीच दोन रुपये**

**विक्रेत्यांनी वाढीव मागणी त्वरित कळवावी.**